# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २०१६ ◆ वर्ष सोळावे ◆ अंक तिसरा


— *अनुक्रमणिका* —


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **अभिष्टचिंतन** | **८** |
| **साहित्यवार्ता** | **१४** |
| **पुरस्कार** | **३०** |
| **स्मरण** | **४२** |
| **अभिप्राय** | **४४** |
| *पुस्तक परिचय* | |
| **मृत्युवर मात!** | **४८** |
| **संवाद परमेश्वराशी भाग-२** | **७४** |
| **श्रद्धांजली** | **९२** |
| **बालनगरी** | **९५** |



संपादक :
सुनील मेहता

कार्यकारी संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.

वर्गणी
मनीऑर्डरने अथवा
ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

*मेहता पब्लिशिंग हाऊस*

संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

संपादकीय

# विज्ञानकथेची शताब्दी

मार्च १९१६मध्ये म्हणजे १०० वर्षांपूर्वी पहिली मराठी विज्ञानकथा मासिक मनोरंजनच्या अंकात प्रसिद्ध झाली. त्या कथेचे लेखक होते श्री. बा. रानडे आणि कथेचे नाव होते 'तारेचे हास्य.' प्रा. वामन मल्हार जोशी यांच्या 'अदृश्य किरणांचा दिव्य प्रताप' आणि 'वामलोचना' या दोन विज्ञानकथाही १९१६मध्ये 'नवपुष्प करंडक' या संग्रहात प्रसिद्ध झाल्या. आश्चर्याची बाब म्हणजे इंग्रजीतील पहिली विज्ञानकथा 'फ्रँकेन्स्टाईन' (लेखिका : मेरी शेली) इ. स. १९१८मध्ये प्रकाशित झाली. म्हणजे मराठी विज्ञानकथा ही इंग्रजीच्या आधी छापून आली. पुढे अर्थातच इंग्रजीमध्ये विज्ञानकथा खूपच बहराला आली; निरनिराळ्या विद्यापीठांत विज्ञानाच्या वेगवेगळ्या पैलूंवर संशोधनही मोठ्या प्रमाणावर होऊ लागले. अनेक विज्ञानकथाकारही लेखन करू लागले.

मराठीत हा कथाप्रकार फारसा रुजला नाही. विज्ञानाचा आपला अभ्यास फार मूलगामी क्वचितच झाला. त्यामुळे विज्ञानकथांमध्ये जे विज्ञान असे ते वरवरचे असे. किंवा अनुवाद-रूपांतर यावर भर असे. युरोपमध्ये व अमेरिकेत त्या मानाने विज्ञान रंजक पद्धतीने तरुण वाचकांपुढे कथात्मक रूपांत सातत्याने येत राहिल्याने आणि ज्युल व्हर्नसारख्या लेखकाने 'ऐंशी दिवसात जग प्रदक्षिणा,' 'चंद्रावर स्वारी,' 'समुद्राच्या तळाशी वीस हजार लीग,' 'फुग्यात बसून पाच आठवड्यात जगाचा प्रवास' यासारख्या कथाकादंबऱ्यांनी वाचकांना

आकृष्ट केल्याने विज्ञानकथा एक वाङ्मयप्रकार रुजत गेला. स्थळकाळाच्या मर्यादांवर मात करण्यात आणि विज्ञानातील वेगवेगळ्या संकल्पनांच्या आधाराने कथात्मक लेखन करण्यात पाश्चात्य लेखक-संशोधक सतत उपक्रमशील राहिले. एच. जी. वेल्सच्या 'दि इनव्हिजिबल मॅन' (अदृश्य माणूस)सारख्या कल्पनांनी त्यावेळच्या तरुणांच्या कल्पनाशक्तीला उंच भराऱ्या मारण्यास प्रेरित केले. विज्ञानकथा लेखकांना प्रसिद्धी आणि पैसा दोन्हींचा जणू ठेवाच गवसला. ज्युल व्हर्न हा फ्रेंच लेखक त्यावेळच्या युरोपिअन लेखकांमधला सर्वांत श्रीमंत लेखक मानला जाई. पुढे त्याच्या कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले. तेही आबालवृद्धांना मंत्रमुग्ध करणारे ठरले. 'स्टार वॉर्स'सरख्या मालिकाही लोकप्रिय ठरल्या. ज्युरासिक पार्क, ओडिसी, टाइम मशीन, परग्रहावरील सजीव प्राणी अशा कल्पनांना चित्रपटांनी दृश्य स्वरूप दिले.

विज्ञानातील अनेक असंभाव्य वाटणाऱ्या कल्पना प्रत्यक्षात उतरत आहेत असे दाखवले. ज्युल व्हर्नने चंद्रावर स्वारी १८६५ मध्ये दाखवली, त्यानंतर शंभर वर्षांनी प्रत्यक्ष मानवाने चंद्रावर पाऊल ठेवले. त्यामुळे विज्ञान आणि कल्पना यांच्यातले अंतर कमी कमी होत गेले. हॉलिवुडच्या चित्रपट निर्मात्यांची फँटसीवजा, अद्‌भुतरम्य अशा कथाकल्पनांचा पाठपुरावा करण्यास प्रोत्साहन दिले. कार्ल सागान, इसाक ॲसिमोव्ह वगैरे लेखकांनी हॉलिवुडच्या निर्मात्यांपुढेही नवनवी आव्हाने ठेवली.

इंटरनेटने या आव्हानांना आणखी व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून दिले.

विज्ञानकथांनी आभासात्मक जग समोर आणून ठेवले. नव्या तंत्रज्ञानाने नव्या कल्पनारम्य जगात सहज फेरफटका मारता यावा अशी मायानगरी जणू संगणकाच्या एका बटणाच्या अंतरावर आणून ठेवली.

माहिती-तंत्रज्ञान-इंटरनेट क्षेत्रातील कंपन्या आता कल्पक तरुणांच्या शोधात आहेत. त्यांना विज्ञानकथा लिहिणाऱ्या, अचाट कल्पनाशक्ती

असणाऱ्या, भन्नाट आयडिया लढवणाऱ्या प्रतिभावंतांची गरज आहे. ऑक्युल्स या आभासी वास्तवाच्या क्षेत्रातील संस्थेने रेडी प्लेयर बन या विज्ञानकथेतील कल्पना वापरून, नव्या पदवीधारकांना चित्रपटाच्या दृष्टीने प्रतिभा चालवा असे आवाहन केले आहे.

मायक्रोसॉफ्टने होलोलॅन्स हा हेडसेट तयार करून स्टार ट्रेकमधील सिम्युलेटर हेड-डेक रूमची उभारणी सुरू केली आहे. कल्पनाशक्ती हवीच; प्रतिभा हवीच असे नाही असे ऑक्युल्सचा एक संस्थापक पालमर लुके मानतो. त्याची कंपनी फेसबुकने २ अब्ज डॉलर्सला विकत घेतली. विज्ञानकथांमुळे नवनव्या कल्पना लढवायला मिळतात असे तो म्हणतो.

पुढचे दशक आभासी वास्तवाचे, व्हर्च्युअल रिॲलिटीचे आहे असे त्याचे म्हणणे आहे. नवे उद्योगपती, साहसी गुंतवणूकदार आशावादी आहेत. तंत्रज्ञानात त्यामुळे मोठीच भर पडणार आहे. पंतप्रधान मोदी यांच्या उत्साहाने नव्या स्टार्टअप कंपन्यांच्या उत्साहाला त्यामुळे उधाण आले आहे. भारतीय तरुण वर्गाच्या कल्पकतेला सर्व जग जणू साद घालत आहे. अमेरिकेत आयटी क्षेत्रात पन्नास हजारावर भारतीय तरुण काम करीत आहेत. स्टार्ट अप कंपन्यांच्या स्थापनेतही भारतीयांची संख्या मोठी आहे. ऑक्युल्ससारख्या उपयुक्त ॲप्स बनविणाऱ्या भारतीयांसाठी त्यामुळे हे अस्मान ठेंगणे ठरू शकेल.



# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

पहिला मजला, खानापूर रोड, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, टिळकवाडी, बेळगाव -५९०००६. टेलिफोन क्र.(०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पायर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

स्टार बझार, पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१

शॉप नं. जी. १५, प्रोझोन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६. संपर्क. ९८९०३९७१९८ / ९९६०३०९८०८

अधिक माहितीसाठी संपर्क **wordpowerbookshop@gmail.com**

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर-
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अँन्ड्रॉइड टॅब्लेटवर!




**Online पुस्तके खरेदी करा www.mehtapublishinghouse.com**

**Find us on: facebook®**

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

अभिष्टचिंतन

# अमृताचा दिनू...



**मराठीतील एक ज्येष्ठ, कल्पक व नवोपक्रमशील प्रकाशक श्री. अनिल मेहता दि. ३ मार्च २०१६ रोजी वयाची पंचाहत्तरी पूर्ण करत आहेत. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा लेख :**

तरुण पिढी वाचत नाही... माहितीच्या विस्फोटात पुस्तकवाचनाकडे लोकांनी पाठ फिरवली आहे... वाचनसंस्कृती लोप पावली आहे का... अशा चर्चा नेहमी ऐकायला मिळतात. पुस्तकविक्रीच्या संदर्भात प्रकाशकांमधून

निराशेचा सूर वाटतो, अशा वेळी वाचकांना आपण चांगलं, कसदार साहित्य दिलं तर वाचक त्याचं स्वागत नक्कीच करतात, या विश्वासाच्या बळावर चार दशकांहून अधिक काळ मराठी साहित्याचं दालन समृद्ध करणारे प्रकाशक श्री. अनिल मेहता ३मार्च रोजी वयाची पंचाहत्तरी पूर्ण करत आहेत. मराठी प्रकाशन क्षेत्राचा दीर्घ काळ अनुभव असणाऱ्या श्री. मेहतांची प्रकाशक म्हणून अत्यंत समृद्ध कारकीर्द आहे.

१९६५ मध्ये कोल्हापुरात 'अजब पुस्तकालय' या दुकानाद्वारा पुस्तकविक्रीच्या व्यवसायात उतरलेल्या मेहतांनी सुमारे ५१वर्षं सरस्वतीची अखंड सेवा करत पुस्तक विक्री, प्रकाशन व वितरण या क्षेत्रात गगनभरारी घेतली आहे. या प्रवासादरम्यान त्यांनी अनेक नवे उपक्रम व संकल्पना साकार करतानाच, अनुवादक व लेखकांची जबरदस्त फळी घडवली आहे.

श्री. मेहता मूळचे निपाणीचे. पुण्याच्या 'बीएमसीसी'मधून बी.कॉम झाल्यानंतर त्यांनी पुणं सोडलं आणि ते निपाणीला घरच्या दुकानात बसू लागले. पण काहीतरी वेगळा व्यवसाय करावा ही इच्छा, महत्त्वाकांक्षा आणि झेप घेण्याची उमेद त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. निपाणीतील नामवंत उद्योगपती व मेहता कुटुंबाचे स्नेही श्री. देवचंद शहा यांना अनिलभाईंनी मनातील स्वप्न बोलून दाखवताच देवचंदजींनी त्यांना भरघोस मदत केली. केवळ मार्गदर्शन व प्रोत्साहनच नव्हे, तर देवचंदजींनी त्यांना आरंभीचं भांडवल उभं करायला मदत केली व कोल्हापुरात जागाही मिळवून दिली. इथून मेहतांच्या व्यावसायिक वाटचालीचा आरंभ झाला.

कोल्हापुरात भाऊसिंगजी रोडवर भवानी मंडपाच्या कमानीलगत त्यांनी सुरू केलेल्या दुकानात मुख्यत्वे पाठ्यपुस्तकं व इतर विविध वस्तू, स्टेशनरी अशा साहित्याची विक्री होत असली तरी त्यांनी तिथं ललित साहित्य उपलब्ध करून द्यायला सुरूवात केली. श्री. मेहता स्वतः उत्तम वाचक आहेत, त्यांचा व्यासंग उत्तम आहे. शिवाय स्वभाव बोलका, त्यामुळे साहजिकच या ठिकाणी विद्यार्थी व शिक्षकांबरोबरच साहित्यप्रेमींचा राबता सुरू झाला. काही काळातच त्यांनी या व्यवसायात उत्तम जम बसवला, लोकसंग्रहही वाढवला आणि 'मागाल ते पुस्तक हजर' असा मापदंड निर्माण केला.

या दुकानात पुस्तकं व गाईडस् नुसती विकण्यापेक्षा आपण स्वतःच ती प्रकाशित करावीत, अशी कल्पना काही महिन्यांतच त्यांच्या मनात

आली. त्यानुसार त्यांनी कोल्हापूर आणि परिसरातल्या तरुण प्राध्यापकांना गाठून त्यांच्याकडून गाईड्स लिहून घेतली आणि ती प्रकाशित केली. ही त्यांच्या प्रकाशन विश्वातील वाटचालीची मुहूर्तमेढ होती. धडाडी, महत्त्वाकांक्षा, अफाट मेहनत घेण्याची तयारी, परिपूर्णतेचा ध्यास या यशस्वितेसाठी आवश्यक असणाऱ्या सगळ्या आयुधांनिशी ते या व्यसायात उतरले. या व्यवसायात चांगली मिळकत व स्थैर्य लाभल्यावरही ते गप्प बसले नाहीत. त्यांनी कोल्हापुरातील नवोदित लेखकांचं साहित्य प्रसिद्ध करायला सुरुवात केली.

त्यानंतर १९७१ मध्ये त्यांनी बापूसाहेब गावडे या गोष्टीवेल्हाळ कलावंताची 'दसऱ्याचं सोनं' ही कादंबरी प्रकाशित केली. त्यादरम्यान डॉ. आनंद यादव लेखक म्हणून नावारूपाला येत होते. त्यांच्याशी मेहतांचा कॉलेजजीवनापासूनचा स्नेह होता. मेहतांनी त्यांच्यापुढं त्यांचं पुस्तक प्रकाशित करण्याचा प्रस्ताव मांडला, तेव्हा त्यांनी पुस्तक द्यायचं कबूल केलं; मात्र त्यांनी मेहतांना प्रकाशनाचं नाव बदलावं व पुण्यात व्यवसाय सुरू करावा, अशा दोन मुख्य सूचना केल्या. पुण्यात सुबक छपाई, अनुभवी चित्रकार, संपादक, मुद्रितशोधक, आधुनिक यंत्रणा या गोष्टी कोल्हापूरपेक्षा चांगल्या व अधिक प्रमाणात उपलब्ध होणार होत्या.


मेहतांच्या गाठीशी पुस्तकविक्रीचा अनुभव होता; पण पुस्तकाची निर्मिती, वितरण, संपर्क या बाबतीत त्यांना बराच खटाटोप करावा लागणार होता. जवळ खूप मोठं आर्थिक पाठबळ नाही, या क्षेत्राची फारशी माहिती नाही अशा परिस्थितीत त्यांनी मोठ्या धडाडीनं अनिश्चिततेच्या अंधारात उडी घेण्याचा निर्णय घेतला आणि १९७६ मध्ये 'मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे' या प्रकाशन संस्थेची स्थापना केली. डॉ. आनंद यादव यांचा 'माळावरची मैना' हा विनोदी कथासंग्रह हे 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चं पहिलं पुस्तक. त्यानंतर आजअखेर या प्रकाशन संस्थेनं जवळपास ६००० पुस्तकं प्रकाशित केली आहेत.

हा प्रवास जरी अभिमानास्पद आणि भरभराटीचा दिसत असला तरी तो सोपा, सहजसाध्य नक्कीच नव्हता. मेहता या साऱ्या प्रतिकूलतेतही नेटानं मार्ग काढत राहिले आणि व्यवसायाची वृद्धी करत ठामपणे पाय रोखून उभे राहिले. बदलत्या प्रवाहांचा वेध घेणं, नव्या गोष्टी आत्मसात करणं, प्रचंड चिकाटी, फोकस, माणसं जोडणं, वस्तुनिष्ठ विचारसरणी,



धोका पत्करण्याची तयारी, अशा उद्योजक बनण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक गुणवैशिष्ट्यांनिशी मेहता मराठी साहित्याचं दालन समृद्ध करत, चित्रशाळेजवळच्या फ्लॅटमधील एका मदतनिसाच्या मदतीनं चालणारं ऑफिस ते आज माडीवाले कॉलनीतील ५०च्या वर स्टाफ असलेलं प्रशस्त, देखणं, अत्याधुनिक ऑफिस हा मोठा पल्ला पार करत खूप उंचीवर पोहोचले आहेत.

प्रकाशन व्यवसायात पाय रोवण्यासाठी धडपड करत असताना , त्यासाठी कोल्हापूर-पुणे सतत वाऱ्या करत दोन्ही आघाड्या सांभाळताना त्यांनी मराठी वाचकांसाठी अनुवादित पुस्तकांचा खजिना खुला करायला प्रारंभ केला. मेहता मराठी साहित्यात अनुवादाचे 'पायोनिअर' ठरले आहेत! १९७३ मध्ये अजित वाडेकर यांच्या पुस्तकाचा 'क्रिकेटच्या मैदानावर मी ' हा कै. माधव मोर्डेकर यांनी केलेला मराठी अनुवाद मेहतांनी प्रकाशित केला. त्यानंतर आजअखेर नानी पालखीवाला, डॉ. किरण बेदी, अरुण शौरी, नारायण मूर्ती, तसलिमा नसरिन, शोभा डे, हिलरी क्लिन्टन, सुधा मूर्ती, अरुंधती रॉय, चेतन भगत, मलाला युसूफजई, सचिन तेंडूलकर अशा अनेक दिग्गजांच्या पुस्तकांचे मराठी



अनुवाद मेहतांनी प्रकाशित केले आहेत. वि. स. वाळिंबे, व. पु. काळे, द. मा. मिरासदार, राजन गवस, शांता शेळके, इंदिरा संत, राणजित देसाई, कमलाबाई ओगले, विश्वास पाटील, व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, रत्नाकर मतकरी, इंद्रजित भालेराव... त्यांच्या लेखक-कवींची यादी अशी बरीच मोठी आहे. यांतील कितीतरी लेखकांचं पहिलं पुस्तक मेहतांनी प्रकाशित केलं आहे. त्याचबरोबर मेहतांनी अनुवादकांची फळी घडवली आहे. अनुवादासाठी पुस्तकं मिळवताना मेहतांनी संबंधित लेखकांशी थेट संपर्क साधण्याची पद्धत ठेवली आहे. या लेखकांचा स्नेह ही मोठी भेटही मेहतांना लाभली आहे.

अनुवादित पुस्तकांच्या संदर्भातील त्यांचे कल्पक उपक्रम त्यांच्या प्रकाशन संस्थेसाठी महत्त्वाचे ठरले आहेतच, शिवाय ते मराठी प्रकाशन विश्वातही लक्षवेधी व मार्गदर्शक बनले आहेत. मेहतांनी केवळ अनुवादित पुस्तकंच मराठी वाचकांपर्यंत पोहोचवली नाहा, तर त्यांनी लेखक-अनुवादक व वाचक यांचा प्रत्यक्ष संवाद घडवला आहे. किरण बेदी, जसवंत सिंग, अरुण शौरी, नानी पालखीवाला, तसलिमा नसरिन अशा लेखकांचा वाचकांशी प्रत्यक्ष परिचय घडवणाऱ्या कार्यक्रमांद्वारा त्यांनी वाचकांशी निराळंच नातं जोडलं आहे.

त्यांचा असाच एक कल्पक उपक्रम म्हणजे 'टी-बुक क्लब' आणि 'मेहता मराठी ग्रंथजगत' हे हाऊस मॅगझिन.

'टी-बुक क्लब' योजनेत मेहता अनुवादित पुस्तकं वाचकांना निम्म्या

किमतीत देतात. या क्लबचे हजारांवर सभासद आहेत व त्या क्लबचा नियमित वाचक वर्ग आहे.

मेहता पुस्तकाच्या निर्मितीच्या दर्जाबाबतही काटेकोर असतात. त्यांना 'एफआयपी'चा पुस्तकनिर्मितीसाठी अनेकदा पुरस्कार मिळाला आहे. १९९७मध्ये 'मेहता पब्लिशिंग हाऊस'ला मराठी प्रकाशन क्षेत्रात अत्यंत मानाचा समजला जाणारा 'वि. पु. भागवत' पुरस्कार मिळाला आहे.

१९८२ सालापासून अनिल मेहतांनी 'वर्ल्ड बुक फेअर'ला हजेरी लावायला सुरुवात केली, तेव्हापासून त्यांच्या कक्षा आणखी विस्तारल्या आहेत. मेहतांनी परदेशात मराठी पुस्तकांचा स्टॉल लावायला सर्वप्रथम सुरुवात केली. त्यांनी 'मराठी प्रकाशक परिषदेचं अध्यक्षपद १५ वर्षं भूषवलं असून, ते फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स'च्या पश्चिम विभागाच्या उपाध्यक्षपदीही बऱ्याच वेळा विराजमान झाले आहेत. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन प्रकाशकांच्या परिषदा, नॅशनल कन्व्हेन्शन यांसारखे उपक्रम पुण्यात आयोजित केले आहेत. पायरसी, कॉपी राईट अशासारख्या सद्यःस्थितीत महत्त्वाच्या ठरणाऱ्या विषयांवर विचारविनिमय व प्रबोधन करण्यासाठीही त्यांनी कार्यक्रम घेतले आहेत.

अशा प्रकारे चौफेर दृष्टी ठेवून, संपर्काचा परीघ विस्तारत, नवनवी शिखरे सर करत मेहतांचं कार्य सुरू आहे. आता त्यांनी प्रकाशन संस्थेची सगळी सूत्रं त्यांचे सुपुत्र सुनील यांच्या हाती सोपवली आहेत. मेहता पब्लिशिंग हाऊस इंग्रजी प्रकाशनातही उतरलं आहे.

चौफेर वाचन, चौफेर नजर आणि समाजाची गरज ओळखून विविध विषयांवरील पुस्तकं प्रकाशित केल्यास या व्यवसायाला उत्तम भवितव्य आहे,'असा त्यांचा आशावाद आहे, अनुभव आहे व विश्वासही आहे.

आज अमृतमहोत्सवी टप्प्यावर ते पूर्वीच्याच उत्साह व ऊर्जेनं कार्यरत आहेत. परिपूर्णतेचा ध्यास आणि समर्पित वृत्तीनं जवळपास अर्ध शतक पुस्तकांच्या विश्वात २४ x७ रममाण असणाऱ्या श्री. अनिल मेहतांना दीर्घायुरारोग्य लाभो, ही ईश्वरचरणी प्रार्थना व त्यांना अनेक शुभेच्छा!

**– सुप्रिया वकील**




✍ **बालभारती सुवर्णमहोत्सव**

बालभारतीचा यंदा सुवर्णमहोत्सव आहे. संस्थेचा शतकमहोत्सव सुरू झाला तरी बालभारती ही 'बालभारती'च राहणार, संस्थेच्या कामांसाठी खर्चाची काळजी करण्याची गरज नाही, संस्थेने आपला नफा कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी वापरावा. निवृत्त कर्मचाऱ्यांनीही आपल्या मागण्यांसाठी संस्थेच्या नियामक मंडळांच्या बैठकांमध्ये येण्याची वा आजूबाजूला गर्दी करण्याची गरज नाही.

बालभारती आणि राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद अर्थात 'एससीईआरटी' यांच्या विलीनीकरणाचा प्रस्ताव बारगळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. राज्याचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी त्याविषयी सूचक वक्तव्य केले असून, सुवर्णमहोत्सवच नव्हे, तर शतकमहोत्सव सुरू झाला तरी बालभारती 'बालभारती'च राहणार,' असे स्पष्ट केले.

'बालभारती'च्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या उद्घाटन समारंभामध्ये तावडे यांनी त्याविषयीची भूमिका जाहीर केली. संस्थेच्या आजी-माजी कर्मचाऱ्यांनी तावडे यांच्या या वक्तव्याचे स्वागत केले.

'बालभारती' ही केवळ छपाईपुरती मर्यादित ठेवून, संस्थेकडे असणारी अभ्यासक्रम संशोधनाची जबाबदारी 'एससीईआरटी'च्या तज्ज्ञांकडे सोपवण्याची बाब सरकारच्या विचाराधीन होती. पाठ्यपुस्तकांची विक्री आणि त्यामधून मिळणारा मोठा नफा 'बालभारती'च्याच आजी-माजी कर्मचाऱ्यांसाठी वापरावा, शिक्षण खात्यातील बालचित्रवाणीसारख्या इतर संस्थांना सक्षम करण्यासाठी अन्य योजना राबवल्या जाव्यात, अशी मागणीही लावून धरली जात होती. त्या पार्श्वभूमीवर

तावडे यांचे हे वक्तव्य संस्थेच्या कर्मचाऱ्यांना दिलासा देणारे आहे.

## ✍ आर. के. लक्ष्मण यांचे बालेवाडीत स्मारक

प्रसिद्ध व्यंगचित्रकार आणि रंग-रेषांद्वारे राजकीय, सामाजिक विषयांतील विसंगती अचूक हेरणाऱ्या आर. के. लक्ष्मण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बालेवाडीत त्यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. येत्या दीड वर्षांत हे स्मारक पूर्ण होईल, अशी अपेक्षा असून, त्यासाठी दीड कोटी रुपयांच्या खर्चास स्थायी समितीने मंजुरी दिली.

लक्ष्मण यांचे गेल्या वर्षी जानेवारीत निधन झाले. सेनापती बापट रस्त्यावरील सिम्बायोसिस संस्थेच्या आवारात त्यांच्या कार्टूनचा अविभाज्य घटक असलेल्या 'कॉमन मॅन'चा पुतळा उभारण्यात आला आहे. बालेवाडीतील सर्व्हे क्र. २४/४ व येथील मोकळ्या जागेत लक्ष्मण यांच्या नावे स्मारक उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. त्याचे, १ कोटी ५२ लाख रुपयांचे टेंडर स्थायी समितीने मान्य केले असून, 'सलिम कन्स्ट्रक्शन' तर्फे हे काम केले जाणार आहे. 'रंगरेषांच्या दुनियेत आयुष्यभर कार्यरत राहिलेल्या लक्ष्मण यांचे स्मारक त्यांच्यासारख्या श्रेष्ठ कलावंताला साजेसे असेल. त्यांच्या स्मारकातून नव्या पिढीलाही प्रेरणा मिळेल,' अशी अपेक्षा स्थायी समितीच्या अध्यक्षा अश्विनी कदम यांनी व्यक्त केली.

आर. के. लक्ष्मण स्मारकाच्या प्रवेशद्वारावरच 'कॉमन मॅन'चा भव्य पुतळा साकारण्यात येणार आहे. तळमजल्यावर पार्किंगच्या सुविधेसह 'हॉल ऑफ फेम' अंतर्गत लक्ष्मण यांच्या व्यंगचित्रांचे दालन उभारले जाणार आहे. चारशे चौरस फुटांचा प्रदर्शन हॉल, आर्टिस्ट पॉईंट, कॅफेटेरिया, दोनशे आसनक्षमता असणारे खुले प्रेक्षागृह (ॲम्फी थिएटर) ही या स्मारकाची काही वैशिष्ट्ये असतील.

स्मारकाची रचनाही वेगळ्या पद्धतीने केली जाणार असून येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने बाहेरील भिंतीची रचना केली जाणार आहे. यावरही लक्ष्मण यांची काही व्यंगचित्रे प्रदर्शित केली जातील.

## ✍ ऋषभदेव मूर्तीसाठी दहा ग्रंथांचा अभ्यास

मांगीतुंगी (जि. नाशिक) येथील जैन तीर्थंकर भगवान ऋषभदेव यांच्या १०८ फुटांच्या मूर्तीची नोंद लवकरच गिनेस बुकमध्ये केली जाणार आहे.

या संदर्भात मूर्तीची रचना निश्चित करण्यासाठी ग्रीक तत्त्वज्ञानासह पाली, संस्कृतसह दहा भाषांतील ग्रंथांचा अभ्यास करण्यात आला. जैन साध्वी ज्ञानमती माताजी व त्यांच्या सहकाऱ्यांनी भगवान ऋषभदेवांच्या विश्वातील सर्वांग सुंदर मूर्तीची रचना निश्चित केली आहे.

अत्यंत टणक मानल्या जाणाऱ्या काळ्या बसाल्ट पाषाणात डोंगर कापून तयार केलेली ही मूर्ती अन्य मूर्तींच्या तुलनेत अधिक टिकाऊ व सर्वांगसुंदर मानली जात आहे. १०८ फूट उंचीची मूर्ती तयार करण्याचा निर्णय झाल्यावर संस्कृत, माडपत्रांवरील ग्रंथ, तमीळ, कन्नड, तेलगू, वैष्णव ग्रंथ, द्रविड, हीडा, ग्रीक मायथॉलॉजी आदी ग्रंथांतील वर्णनांचा अभ्यास करून मूर्तीचे परिमाण निश्चित करण्यात आल्याने ही मूर्ती सर्वांग सुंदर झाली आहे.

## ✍ 'नेट न्यूट्रॅलिटी' कायम

इंटरनेट वापराच्या स्वातंत्र्याचा संकोच करण्याच्या प्रयत्नांना टेलिकॉम अॅथॉरिटी ऑफ इंडियाने (ट्राय) दणका दिला असून, नेट निरपेक्षता (नेट न्यूट्रॅलिटी) कायम राखण्याचा निर्णय दिला आहे. वेगवेगळ्या प्रकारचा डाटा वापरण्यासाठी मोबाईल ऑपरेटर कंपन्यांनी देऊ केलेल्या प्रस्तावांवर 'ट्राय'ने बंदी घातली आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांना दररोज ५० हजार रुपये असा दंड आकारला जाईल. यामुळे वेगवेगळ्या प्रकारचा डाटा वापरण्यासाठी इंटरनेट ग्राहकांच्या खिशाला जादा तोशिष बसण्याच्या शंकांना पूर्णविराम मिळणार आहे.

इंटरनेट सेवेसाठीच्या भेदभावपूर्ण दरआकारणीवर प्रतिबंध घालणारा 'प्रोहिबिशन ऑफ डिस्क्रिमिनेटरी टेरिफ फॉर डाटा सर्व्हिसेज रेग्युलेशन, २०१६' आदेश 'ट्राय'ने जारी केला. आपल्या नेट न्यूट्रॅलिटीचा निर्णय सुनावताना या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांना दंड आकारला जाईल, असा सज्जड इशाराही दिला आहे. एखाद्या सेवादाता (सर्व्हिस प्रोव्हायडर) कंपनीने या आदेशाचा भंग केल्यास कंपनीला 'टेरिफ प्लॅन' रद्द करण्यास सांगितले जाईल आणि मर्यादा उल्लंघनाच्या दिवसापासून दररोज पन्नास हजार रुपये याप्रमाणे जास्तीत जास्त ५० लाख रुपयांच्या दंडाची आकारणी केली जाईल, असे 'ट्राय'चे अध्यक्ष आर. एस. शर्मा यांनी सांगितले.

नियम उल्लंघन करणाऱ्या कंपन्यांना दररोज ५० हजार रुपये ते जास्तीत

जास्त ५० लाख रुपयांपर्यंत दंड.

इंटरनेटवरील सर्व प्रकारची माहिती ग्राहकांना एकसमान दराने मिळणार.

'डाटा'साठी वेगवेगळ्या दर आकारणीच्या योजना बंद होणार.

नैसर्गिक संकटांच्या काळातच इंटरनेट डाटा वापराचे दर कमी करण्याची कंपन्यांना मुभा असेल.

तुम्ही जर इंटरनेट प्लॅन घेतला असेल, तर प्रत्येक साईटवरील 'डाटा' एकसारख्या वेगाने 'ॲक्सेस' करता येईल.

टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडर कोणीही असला तरी एकसारख्या वेगानेच 'डाटा' उपलब्ध होईल.

नेट न्यूट्रॅलिटी या शब्दाचा पहिल्यांदा उल्लेख २००३ मध्ये करण्यात आला. इंटरनेटवरील डाटाच्या बाबतीत टेलिकॉम कंपन्या व सरकार कोणताही भेदभाव करणार नाहीत, त्याला नेट न्यूट्रॅलिटी म्हणता येईल, असे त्या वेळी कोलंबिया विद्यापीठातील प्रा. टीम वू यांनी म्हटले होते.

## ✍ चाळीस भाषांत अनुवाद सुविधा

अनुवादाचे काम कायम रुक्ष मानले जाते, त्यातही कायदेशीर-आर्थिक-वैद्यकीय संदर्भातले अनुवाद अधिकच. तरीही अनुवाद सुविधेसारख्या अनोख्या क्षेत्रात उतरून सुप्रिया देशपांडे यांनी अल्पावधीत मान्यता मिळविली आणि या कामाबद्दल आयएसओ दर्जा प्रमाणपत्राची मोहोरही उमटविली. महापालिकेतील सुस्थित नोकरी सोडून या क्षेत्राकडे वळलेल्या देशपांडे यांच्याकडे आज ४०हून अधिक भाषांचे अनुवाद होतात..

अनुवाद फक्त कथा-कादंबऱ्यांचाच असतो, असे आपल्याला वाटते. पण साहित्याच्या पलीकडेही कायदा, अर्थ, वैद्यकीय, तंत्र अशा अनेक क्षेत्रांत अनुवादाची गरज भासत असते. विविध क्षेत्रांतली ही गरज ओळखूनच सुप्रिया देशपांडे यांनी वयाच्या ४८व्या वर्षी 'होन्याकू रेमिडीज' या ट्रान्सलेशन ब्यूरोची स्थापना केली. आज अवघ्या सात वर्षांत त्यांची कंपनी जगभरातील १५०० हून अधिक ग्राहकांना ४०पेक्षा जास्त भाषांमधील अनुवाद सुविधा पुरवीत आहे. त्यासाठी ८० अनुवादकांचा ताफा त्यांच्याकडे आहे.

मुंबई महापालिकेतील करनिर्धारण व संकलन विभागात काम करीत असताना सुप्रिया यांना विविध कागदपत्रांचा इंग्रजीतून मराठी, हिंदी अनुवाद

करावा लागे. हे कागद न्यायालयीन किंवा आर्थिक क्षेत्राशी संबंधित असत. कामाचा भाग म्हणून अनुवाद करत असताना एकतरी परदेशी भाषा आली पाहिजे, म्हणून त्यांनी फ्रेंच आणि जपानी भाषा आत्मसात केल्या. जपान फाउंडेशनच्या दोन परीक्षाही उत्तीर्ण झाल्या. मराठी-हिंदीबरोबरच जपानी भाषेतीलही छोटे-मोठे कायदेविषयक कागद इंग्रजीत अनुवादित करायला सुरुवात केली. त्यांना बाहेरून अनुवादासाठी विचारणा होऊ लागली. तेव्हा २००७ मध्ये त्यांनी स्वेच्छानिवृत्ती घेऊन स्वत:ची अनुवाद कंपनी स्थापन केली.

सुप्रिया देशपांडे यांनी ठेवलेले आपल्या कंपनीचे 'होन्याकू रेमिडीज' हे नावही बोलके आहे. 'होन्याकू म्हणजे जपानी भाषेत अनुवाद.' सुरुवातीला त्या स्वत:च हिंदी, मराठी, इंग्रजी, फ्रेंच आणि जपानी भाषेत अनुवाद करायच्या. मागणी वाढल्यावर सर्व भारतीय भाषांबरोबरच जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, रशियन, युक्रेनियन, इटालियन, इंडोनेशियन, अरेबिक, चायनीज, कोरियन, पोलिश या भाषा जाणणाऱ्यांचाही त्यांनी शोध घेतला. गेली सहा वर्षे दोन फार्मास्युटिकल कंपन्या त्यांच्या ग्राहक आहेत. शिवाय आणखी चार कंपन्यांची भर पडली आहे. या कंपन्यांची नवी उत्पादने बाजारात येतात, तेव्हा ते ते राज्य किंवा देशानुसार स्थानिक भाषेत त्यांची माहिती द्यावी लागते. विविध जाहिरात कंपन्यांची माहितीपत्रकेही ग्राहकांच्या सोयीसाठी जाहिरात कंपन्यांना वेगवेगळ्या भाषांत प्रसिद्ध करावी लागतात.

एसएमएस, ई-मेल यांचाही एकच मजूकर वेगवेगळ्या भाषांत अनुवादित करून हवा असतो, प्रत्येकी वेळी हा मजकूर कुणाच्या उपयोगासाठी आहे, त्याचे प्रयोजन काय, हे जाणून त्यानुसारच अनुवादात सहजता आणवी लागते. वेगवेगळ्या स्तरांतील ग्राहकांना अनुवादित मजकूर सारख्याच प्रमाणात आपला वाटायला हवा, ही काळजी घ्यावी लागते. तसेच प्रकाशनप्रक्रियेत विविध लिपींनुसार काही तांत्रिक समस्या येत नाहीत ना, याबाबतही काटेकोर रहावे लागते. २००९मध्ये त्यांच्या कंपनीला 'आयएसओ ९००१-२००८ हे दर्जा प्रमाणपत्रही मिळाले. आता आणखी एक पाऊल टाकून त्यांनी मुलुंडमध्ये 'कायझेन लिंग्विस्टिक्स' या बॅनरखाली परदेशी भाषांचे कोचिंग, ऑडिओ ट्रान्सक्रिप्शन या सेवाही सुरू केल्या आहेत.

## ✍ विकिपीडिया

'घर जाके गुगल कर लो, मेरे बारेमे विकिपीडियामें पढ लो... दोन वर्षांपूर्वी गाजलेल्या 'लुंगी डान्स'मध्ये शाहरुख 'विकिपीडिया'ला वाखाणतो. विकिपीडिया' हे काय प्रकरण आहे? हा आहे एक सर्वसामान्यांचा जगातील सर्व माहिती सर्वांपर्यंत, सर्वांच्या भाषेत पोचविण्याचा पूर्ण निरपेक्ष सहकारी उपक्रम, चौदा वर्षांपूर्वी सुरू झाला तेव्हा अर्थपंडितांनी बजावले, मानवप्राणी निखालस स्वार्थी आहे. तेव्हा ज्यातून कुणालाही आर्थिक लाभ नाही, असा हा उपद्‌व्याप लवकरच कोलमडणार.

पण अर्थपंडित काहीही म्हणोत, मनुष्यप्राणी सगळ्यांच्या भल्यासाठी नि:स्वार्थीपणे अनेक करामती करून दाखवतो. गेल्या अर्धशतकातला सॉफ्टवेअरच्या उत्क्रांतीचा इतिहास बघा. आरंभी 'मायक्रोसॉफ्ट'सारख्या कंपन्या बहुतांश सॉफ्टवेअर आपल्या मुठीत ठेवत होत्या. त्यात हवे तसे बदल करून आपल्या सोयीप्रमाणे इतर कोणीही वापरू शकत नव्हते. पण या निर्बंधाविरुद्ध बंड पुकारत एक विनामूल्य खुल्या सॉफ्टवेअरची चळवळ उभी राहिली. काहीही मोबदल्याची, नावलौकिकाची अपेक्षा न करता उत्तमोत्तम सॉफ्टवेअर बनवून कुणालाही हवे तसे वापरायला किंवा रूपांतर करून घ्यायला निष्णात तज्ज्ञ सादर करू लागले. ही चळवळ आज इतकी फोफावली आहे, की गुगल सारख्या व्यापारी कंपन्याही मोठ्या प्रमाणात असे मोफत सॉफ्टवेअर उपलब्ध करून देऊ लागल्या आहेत.

या खुल्या सॉफ्टवेअरबरोबरच 'वर्ल्ड वाइड वेब' उपजले आणि लोकांना जगभरची निरनिराळी माहिती, ज्ञान, कलाकृती सहज सामोरी येऊ लागली. ज्यावर कॉपीराइट नाही असे कालिदासाचे 'मेघदूत', 'एकनाथी भागवत', शेक्सपिअरचे हॅम्लेट', अजंठ्याचा पद्मपाणी' वेबवर भराभर चढविण्यात आले. मग २००० मध्ये वेबवर 'एन्सायक्लोपिडीया ब्रिटानिका' च्या धर्तीवर पण पूर्ण विनामूल्य 'नूपीडिया' नावाचा ज्ञानकोश घडविण्याचा कल्पना पुढे आली. आरंभी त्यात केवळ विशेषज्ञांनी लिहिलेले लेख असतील अशी संकल्पना होती. पण विद्वजन जितके सरस्वतीपूजक, तितकेच लक्ष्मीपूजक असतात. विनामूल्य लेख लिहा या आवाहनाला प्रतिसाद न मिळाल्याने २००१ मध्ये 'विकीपीडिया' नावाचा एक सर्वसमावेशक उपक्रम सुरू करण्याचे ठरवले गेले. विचार केला गेला की विद्वानही खूपसे ज्ञान इतरांनी लिहिलेले वाचूनच

कमावतात, मग सामान्यजनही ते करू शकतील. यात चुका होतील, पण हे लेखन सर्वांना तपासायला, सुधारायला उपलब्ध करून देऊ; अशा पडताळणीतून चुका दुरुस्त होतील, विशेषज्ञांनी लिहिलेल्या दर्जाचेच लेख बनू शकतील. लवकरच सिद्ध झाले की हे सहज शक्य आहे. नेचर या प्रतिष्ठित वैज्ञानिक पत्रिकेने केलेल्या अभ्यासात आढळून आले की, 'विकिपीडिया'तील लेख हे 'एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिका'च्या लेखांच्या तोडीचेच आहेत. काही वैद्यकशास्त्र पत्रिकांच्या अभ्यासातूनही हा निष्कर्ष निघाला.


हे सगळे पन्नास साठ हजार उत्साही 'विकिपीडिया' कारांच्या लेख सुधारण्याच्या, नवे लेख लिहिण्याच्या खटाटोपाचे फलित आहे. या आधुनिक संप्रदायातील मंडळींनी आपली नेटकी आचरणनियमावली आखून सर्वसहमतीने अंमलात आणली आहे. 'विकिपीडिया'तील लेखांत स्वत:च्या निरीक्षणांचा समावेश केला जात नाही. कोठे तरी, शास्त्रीय साहित्यातील अथवा सर्वांसमोर येणाऱ्या वृत्तपत्रांतील, टीव्हीवरील विश्वसनीय बातम्यांतून ही माहिती संकलित केली जाते. मग ते संदर्भ देत कोणतीही बाजू न घेता केवळ वास्तवाच्या आधारावर जे उभे राहते ते चित्र रेखाटले जाते. विक्री म्हणजे भराभर, तेव्हा 'विकिपीडिया'तील लेख नुसते विश्वसनीयच नसतात, तर झपाट्याने उभे राहतात. २००४ डिसेंबरमध्ये सुनामी लोटल्यालोटल्या, मुख्यत: बातम्यांच्या आधारे दोन दिवसांत १००० लोकांनी भर घालत सुनामीवरचा उत्तम लेख तयार केला.

'विकिपीडिया' हेही फेसबुक 'ट्विट्र'सारखेच सामाजिक संवादपीठ आहे.

'विकिपीडिया'त प्रत्येक लेखाबरोबर एक चर्चेचे पान असते, त्यावर मुख्य लेखाची शिस्त बाजूला ठेवून जास्त मोकळेपणे वादावादी चालू शकते. 'विकिपीडिया'त कोणीही नाव नोंदवू शकतो आणि नाव नोंदवताच तिला किंवा त्याला एक उपयोगकर्त्याचे पान प्राप्त होते. त्याद्वारेही निरनिराळे संवाद शक्य आहेत. पण 'विकिपीडिया'त फेसबुक वर होऊ शकते तसे एकांगी, पूर्वग्रहदूषित, भरकटणारे लेखन शक्य नाही. त्यामुळे अमेरिका, युरोपात या संवादपीठाला वेगळेच महत्त्व आले आहे. इथल्या राजकीय नेत्यांवरच्या, पक्षांवरच्या लेखात लोक त्यांची परखड झाडाझडती घेतात. उदा. निवडणुकीच्या वेळी त्यांनी काय आश्वासने दिली व नंतर ती पाळली की मोडली हे पुराव्यानिशी नमूद केले जातो. 'विकिपीडिया'त मुक्तद्वार असल्याने आरंभी राजकारण्यांनी आपल्या हस्तकांद्वारे आपल्याला गैरसोयीचे उल्लेख काढून टाकण्याची शिकस्त

८वी आवृत्ती

# फ्रीडम अॅट मिडनाइट




**मूळ लेखक:-** डॉमिनिक लॉपिए
**आणि** लॅरी कॉलिन्स

**अनुवाद :-** माधव मोर्डेकर

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

'भारतावर राज्य करण्याची जबाबदारी ब्रिटिश वंशावर नियतीने कशी काय सोपवली हे एक अतर्क्य, अगम्य असे गूढच आहे.'

—रुड्यार्ड किपलिंग

'नियतीशी आपण अनेक वर्षांपूर्वी एक करार केलेला होता. आज तो क्षण आला- आपल्या वचनबद्धतापूर्तीचा. त्या वेळी केलेली आपली ती प्रतिज्ञा आज पूर्ण होत आहे... आजच्या या दिवशी, जेव्हा घड्याळात मध्यरात्रीचा टोला पडेल, त्या वेळी जग झोपेत असेल एकीकडे पण आपल्या भारतात मात्र प्रत्येक जण एका नव्या जीवनाचा व स्वातंत्र्याचा अनुभव घेण्यासाठी जागा असेल. इतिहासात असा एखादा क्षण येतो, पण तोही क्वचितच! त्या क्षणी आपण 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' म्हणत एका नव्या वळणावर पदार्पण करतो. तो क्षण असतो एका युगान्ताचा, राष्ट्रात्म्याच्या जागृतीचा - ज्याचा आवाज सतत दाबून धरण्यात आलेला होता - हुंकार कानी पडण्याचा हा एक अलौकिक क्षण आहे.'

—जवाहरलाल नेहरू
१४ ऑगस्ट १९४७ च्या मध्यरात्री भारताच्या
घटना समितीसमोर भाषण करताना

केली. परंतु 'विकिपीडिया'त लेखांच्या सर्व आवृत्त्या लेखाच्या इतिहासाच्या पानावर जपलेल्या असतात व कोणत्या संगणकाद्वारे बदल केले गेले याचीही नोंद असते. तेव्हा राजकारण्यांचे हे गैरवर्तन लोकांच्या डोळ्यात भरून त्यांची नाचक्की झाली, ते वठणीवर आले.

'विकिपीडिया'चे उद्दिष्ट जगातील सर्व माहिती सर्व ज्ञान सर्वांना त्यांच्या, त्यांच्या भाषेत उपलब्ध करून देणे हे आहे. आज मराठीसह भारतातील एकवीस भाषांत 'विकिपीडिया' उपलब्ध आहे. 'विकिपीडिया'वर कोणत्याही सरकारची पकड नाही, जाहिराती नसल्याने पैशाचा दबाव नाही, तेव्हा निर्भीडपणे वस्तुस्थिती पुढे आणण्याचे हे अत्युत्कृष्ट माध्यम आहे. पण 'फेसबुक', 'ट्विटर' प्रेमी भारतीय या प्रभावी संवादपीठाचा काहीच उपयोग करून घेत नाहीत. आपले नेते निवडणुकीच्या वेळी भरमसाट आश्वासने देऊन मग आमच्या कानी सात खडे म्हणण्यात तरबेज आहेत. आपण 'विकिपीडिया'द्वारे युरोप-अमेरिकेच्या नागरिकांप्रमाणेच त्यांच्या कारकिर्दीच्या वास्तवाचे चित्रण करायला आरंभ केला तर कदाचित त्यांचाही लगाम खेचला जाईल! असे पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांना वाटते.

## ✍ टॉप टेन वृत्तपत्रे

'रजिस्ट्रार ऑफ न्यूजपेपर्स इन इंडिया'च्या (आरएनआय) अहवालानुसार देशातील सर्वाधिक खप असणाऱ्या 'टॉप टेन' वृत्तपत्रांत 'सकाळ'च्या पुणे आवृत्तीने स्थान पटकावले आहे. मराठी भाषिक वृत्तपत्रांमध्ये तर 'सकाळ' पुणे अव्वल स्थानीच आहे; तर देशातल्या प्रांतीय भाषिक वृत्तपत्रांत 'सकाळ' तिसऱ्या स्थानावर आहे. देशात वृत्तपत्रांची वाढ ५.८ टक्के या वेगाने होत आहे.

देशातील वृत्तपत्रांच्या नोंदणीची सर्वोच्च संस्था असलेल्या 'आरएनआय'च्या 'प्रेस इन इंडिया' या अहवालानुसार, एका आवृत्तीच्या सर्वाधिक खपाच्या भाषिक वृत्तपत्रांच्या (हिंदी, इंग्रजी वगळून उर्वरित) भारतातील 'टॉप टेन'च्या यादीत स्थान पटकावण्याचा मान मराठी वृत्तपत्रांमध्ये केवळ 'सकाळ'च्या पुणे आवृत्तीला मिळाला आहे. या श्रेणीत पश्चिम बंगालमधील 'आनंदबझार पत्रिका' आणि 'वर्तमान' या दैनिकांबरोबरच तीन हिंदी आणि चार इंग्रजी दैनिकांचा समावेश आहे.

उत्तर प्रदेशात १६ हजार १३० प्रकाशनांची नोंदणी करण्यात आली आहे. तर दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्रात १४ हजार ३९४ प्रकाशनांची नोंदणी झाल्याचे अहवालात म्हटले आहे. तिसऱ्या क्रमांकावर दिल्ली असून, तेथे १२ हजार १७७ प्रकाशनांची नोंदणी झाली आहे.

महाराष्ट्रात मराठी व अन्य भाषांत मिळून ९०४ नियतकालिकांच्या २.२९ कोटी प्रती प्रसिद्ध होतात. त्यापैकी पहिल्या ५० नियतकालिकांमध्ये 'सकाळ'च्या पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, मुंबई आणि नाशिक या 'लखपती' आवृत्त्यांचा समावेश आहे. देशातील एकूण दैनिकांपैकी हिंदी वृत्तपत्रांचे दैनिक वितरण ४७.७१ टक्के आहे. दुसऱ्या क्रमांकावरील इंग्रजी दैनिकांचा खप ११.४० टक्के आहे. मराठी दैनिके उर्दू व तेलगू भाषांनंतर पाचव्या स्थानी आहेत.

प्रेस इन इंडिया २०१४-१५ या अहवालातील माहितीनुसार, वृत्तपत्रे आणि नियतकालिकांची सर्वाधिक नोंदणी हिंदी भाषेत (४२ हजार ४९६) झाली असून, दुसरा क्रमांक इंग्रजी भाषेतील (१३ हजार ६६१) प्रकाशनांचा आहे. २०१३-१४ या वर्षात सर्व प्रकाशनांतर्फे मिळून एकूण ४५ कोटी पाच लाख ८६ हजार २१२ प्रतीचे देशभरात वितरण करण्यात आले. २०१४-१५ मध्ये ही संख्या ५१ कोटी पाच लाख २१ हजार ४४५ प्रती एवढी होती.

सोशल मीडियाचा वाढता वापर, इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांचे आव्हान आणि भारतात दाखल झालेली नव माध्यमे (न्यू मीडिया) यांच्यामुळे मुद्रित माध्यमांच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाल्याचा दावा तज्ज्ञ करत असले तरी भारतातील वास्तव मात्र त्यापासून दूर जाणारे आहे. २०१४-१५ या वर्षात मुद्रित माध्यमांमध्ये ५.८ टक्के वाढ झाली आहे. चालू वर्षी ५ हजार ८१७ नव्या प्रकाशनांची नोंदणी झाली असून, देशातील एकूण मुद्रित प्रकाशनांची संख्या आता एक लाख पाच हजार ४४३ वर पोचली आहे. खपाचा विचार केल्यास हिंदी भाषेतील प्रकाशनांच्या २५ कोटी ७७ लाख ६१ हजार ९८५ प्रती दर दिवशी वितरीत केल्या जातात.

## ✍ सिनेलेखकांचा हक्कांसाठी संघर्ष

बॉलिवूडमध्ये येऊ लागलेल्या 'वजीर', 'पिकू'सारख्या वेगळ्या

विषयांचे मुख्य श्रेय जाते ते चौकटीपलीकडचा विचार करणाऱ्या लेखकाला. सशक्त कथा-पटकथा लिहिणाऱ्या या लेखकांच्या हक्कांसाठी फिल्म रायटर्स असोसिएशनने (एफडब्लूए) कात टाकायचे ठरवले आहे. त्यासाठी असोसिएशनच्या मूळ घटनेत आमूलाग्र बदल करण्याचा प्रयत्न होत आहे.

पटकथालेखकांना न्याय मिळवून देण्यासाठी १९५६ साली ही संघटना सुरू झाली होती. कॉपीराइट कायद्यात २०१२ साली सुधारणा करण्यात आल्यानंतर पटकथा लेखकांना त्यांचे हक्क देण्यात आले. कलाकृतीत लेखकाला महत्त्व असले, तरी त्यांना बऱ्याचदा दुय्यम वागणूक मिळावी इथपर्यंत प्रत्येक गोष्टीसाठी त्यांना झगडावे लागते. अशावेळी संघटनेच्या घटनेत काही बदल करणे गरजेचे झाल्याचे मत व्यक्त होत होते. म्हणूनच घटनेची पुनर्रचना करण्यात येत आहे. याबाबत बोलताना फिल्म रायटर्स असोसिएशनचे सरचिटणीस कमलेश पांडे म्हणाले, 'गेल्या अनेक महिन्यांपासून एक समिती या बदलांवर काम करत आहे. तिचे काम जवळपास पूर्ण झाले असून लवकरच हा मसुदा आम्ही सगळ्या सदस्यांसमोर ठेवणार आहोत. लेखकांच्या हितासाठी हे बदल होणे आवश्यक आहे.'

**बदलातले महत्त्वाचे मुद्दे**

कॉपीराइट्स : लेखकांच्या कॉपीराइट्सविषयी कुठेही रीतसर माहिती दिलेली नाही. रॉयल्टीसह कॉपीराइट्सची सगळी माहिती या घटनेत समाविष्ट केली जाईल.

नव्या सुविधांवर भर : त्यामुळे आरोग्य, शिक्षण यांसारख्या सुविधांवर नव्या घटनेत विशेष भर देण्यात येईल.

वादांवर तोडगा : एखाद्या निर्मात्याने मानधन रखडवल्याच्या तक्रारी अनेक लेखक संघटनेकडे घेऊन येतात. काही बडे लेखक वगळता बहुतांश लेखकांना निर्माता-दिग्दर्शकांच्या जाचक अटी स्वीकाराव्या लागतात. अशावेळी त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी किंवा अशा प्रकारच्या वादांवर तोडगा काढण्यासाठी सध्याच्या घटनेत आणखी तरतूदी करण्यात येणार आहेत.

## ✍ साहित्यिकांच्या भूमिकेला शरद पवार यांचे समर्थन

''भारत हा सहिष्णू देश आहे. विविधता हा या देशाचा पाया आहे; पण सध्या भारताला हिंदुराष्ट्र करण्याचा अट्टहास सुरू असून, ही भावना

देशासाठी घातक आहे.'' अशा शब्दांत 'राष्ट्रवादी'चे अध्यक्ष शरद पवार यांनी साहित्यिकांच्या भावनेचे समर्थन केले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये देशभरातील ७० इतिहास संशोधक व साहित्यिकांची शरद पवार यांच्यासोबत तब्बल पाच तास मॅरेथॉन बैठक झाली. या वेळी देशात सध्या वस्तुनिष्ठ इतिहासाचे विद्रूपीकरण सुरू असल्याची खंत या इतिहास तज्ज्ञांनी व्यक्त केली.

सध्या वस्तुनिष्ठ इतिहासात मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्याचा डाव खेळला जात असून, महापुरुषांचे संदर्भदेखील हिंदुराष्ट्राशी जोडले जात असल्याचे मत या बैठकीत व्यक्त करण्यात आले. दलित, आदिवासी, वंचित, उपेक्षित यांचा खरा इतिहास बदलण्याचे षड्यंत्र सुरू असून, राष्ट्रीय संदर्भग्रंथामध्ये हा बदल छुप्या पद्धतीने होत असल्याचा आक्षेप या इतिहास तज्ज्ञांनी घेतला. भारतीय इतिहासाचे विद्रूपीकरण रोखावेच लागेल, असा निर्धार या बैठकीत झाला. यावर बोलताना शरद पवार यांनी राष्ट्रीय स्तरावरील इतिहास संशोधन संस्था स्थापन करण्याची गरज असल्याचे स्पष्ट केले.

मात्र, भारताला हिंदुराष्ट्र म्हणून जगाच्या समोर स्थापित करणाऱ्या शक्तींचा बिमोड करावाच लागेल. त्यासाठी देशभरातल्या इतिहास तज्ज्ञ व संशोधकांनी राष्ट्रव्यापी चळवळ उभारल्यास सहकार्य करण्याची ग्वाही पवार यांनी दिली.

इतिहासाचा गैरवापर करून हिंदुराष्ट्र म्हणजेच भागवत राष्ट्र, अशी व्याख्या करण्याचा खटाटोप सुरू असल्याचा सूरही या वेळी लावला. तब्बल ५८ वर्षानंतर देशभरातल्या इतिहास तज्ज्ञ व संशोधकांनी एकत्र येऊन विचारमंथन केल्याने आगामी काळात सांस्कृतिक संघर्ष शिगेला पोचेल, असे मानले जात आहे.

या बैठकीला इशरत आलम, डॉ. डेव्हिड, डॉ. शेषन, शिरीन मुसवी, प्रो. श्रीसंत, इंद्रजित सावंत, डॉ. मोलानी, श्रीमंत कोकाटे, प्रा. घोघरे वगैरे ७० इतिहास संशोधक उपस्थित होते.

## ✍ वर्षभरात शेतीविषयक २०४ पुस्तके प्रकाशित

कथा, कादंबऱ्या, पाककला, ज्योतिषशास्त्र, प्रवास वर्णन, संत साहित्य या विषयांवरील पुस्तकांना मराठी वाचकांकडून नेहमीच पसंती दिली गेली

आहे. आता याच जोडीला शेतीविषयक पुस्तकांचा उल्लेख करायला हवा. गेल्या वर्षभरात शेतीविषयक २०४ पुस्तके प्रकाशित झाली असून त्यांच्या विक्रीचा झपाटाही वाढत आहे.

यात शेतीतील अर्थशास्त्र, उत्पादनातील आधुनिक तंत्रज्ञान, आरोग्यदायी भाजीपाला, दूध उत्पादनातील व्यवस्थापन, औषधी वनस्पतींची लागवड, आधुनिक कुक्कुटपालन या विषयांतील पुस्तकांना सर्वाधिक मागणी आहे. मागील वर्षांच्या तुलनेत हे प्रमाण ३० ते ३५ टक्क्यांनी वाढले आहे.

## ✍ 'पोर्न-कॉम' पटांचा उदय

'क्या कूल है हम'चा तिसरा सिक्वल आणि सनी लिऑनचा 'मस्तीजादे' या दोन 'ॲडल्ट कॉमेडी' या गोड नावाखाली स्थिरस्थावर झालेल्या चित्रपटांच्या प्रसिद्धी कार्यक्रमांनी एकच धमाल उडवून दिली आहे.

'क्या कूल है हम' चित्रपटाने तर एक पाऊल पुढे जात पहिलावहिला 'पोर्न कॉम' चित्रपट असल्याची जाहिरात केली आहे. लैंगिक विषयाची विनोदी पद्धतीने मांडणी करणाऱ्या या चित्रपटांना एक मोठा प्रेक्षकवर्ग आहे हे लक्षात आल्यानेच व्यावसायिक चौकटीत या शैलीतील चित्रपटांना बसवण्यावर दिग्दर्शक इंद्रकुमार, बालाजी प्रॉडक्शनसारख्या मातब्बरांचे प्रयत्न सुरू आहेत.

'क्या कूल है हम ३'च्या पोस्टरवर तो 'पोर्न कॉम' असल्याची जाहिरात करण्यात आली आहे. चित्रपटाची पोस्टर्सही विषयानुसार बोलकी आहेत. त्यांच्या प्रसिद्धीसाठी आफताब - तुषार यांनी यूट्युबवरून 'आइस बकेट' सारखेच कंडोमचे आव्हानही दिले आहे. इतकी आक्रमक जाहिरातबाजी तीही एका 'पोर्न कॉम' चित्रपटासाठी?...

यावरून एक गोष्ट सहज लक्षात येते ती म्हणजे 'पोर्न कॉम' पटांचा किंवा 'ॲडल्ट कॉमेडी' पटांचा हा जॉनर (प्रकार) सेट व्हावा, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. सात-आठ वर्षांपूर्वी 'मस्ती' चित्रपट प्रदर्शित झाला तेव्हा त्याला यश मिळाले होते. मात्र, तेव्हा 'पती, पत्नी और वो'च्या धर्तीवरचा विनोदी चित्रपट एवढेच मर्यादित स्वरूप होते. नंतर प्रदर्शित झालेला 'क्या कूल है हम' जास्त बोल्ड होता. तोही यशस्वी ठरला. तब्बल सात वर्षांनी २०१४ ला 'मस्ती'चा बोल्ड सिक्वल प्रदर्शित झाला आणि चित्रपटाने १०० कोटी रुपयांची कमाई करत नवा विक्रम केला.

त्याआधी प्रदर्शित झालेल्या 'क्या कूल है हम' चा दुसरा सिक्वलही चांगला चालला. दरम्यानच्या काळात पोर्न स्टार सनी लिऑन आणि तिच्या चित्रपटांचीही बॉलीवूडला सवय झाली. पूर्वी फक्त हॉलीवूडपुरते मर्यादित असलेले 'सेक्स कॉमेडी' चित्रपट सध्या बॉलीवूडमध्ये 'ॲडल्ट कॉमेडी'पट म्हणून स्थिरावले. हॉलीवूडच्या चित्रपटांपेक्षा इथल्या 'ॲडल्ट कॉमेडी' पटांची मांडणी संयत असल्याने प्रेक्षकांचाही या चित्रपटांना चांगला प्रतिसाद मिळतो आहे हे निर्माते दिग्दर्शकांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे गेल्या वर्षी 'शौकीन'चा रिमेक प्रदर्शित झाला. हर्षवर्धन कुलकर्णी दिग्दर्शित 'हंटर'लाही संमिश्र प्रतिसाद मिळावा.

यावर्षी 'क्या कूल है हम'चा तिसरा सिक्वल 'पोर्न कॉम' म्हणून प्रदर्शित झाला आहे. त्यानंतर लगेचच फक्त २७ बिकीनी आणि दोन ड्रेस घालून संपूर्ण चित्रपट पूर्ण करणाऱ्या सनी लिऑनचा 'मस्तीजादे' हा मिलाप झवेरी दिग्दर्शित चित्रपट आणि 'ग्रँड मस्ती' हा तिसरा मस्तीपटही प्रदर्शित होतो आहे. या तिन्ही चित्रपटांनी तिकीटबारीवर चांगली कमाई केली. तर कधीकाळी 'सी' ग्रेड चित्रपट म्हणून मर्यादित असणाऱ्या या चित्रपटांचे नवनवे जॉनरप्रयोग बॉलीवुडला पहायला मिळतील.

## ✍ संदीप खरे यांचे 'मोबाइल ॲप'

पायरसी आणि अनेक कारणांनी सध्या अडचणीत आलेला सीडी व्यवसाय नव्या युगाची गरज म्हणून आता 'डिजिटल' स्वरूपात जगभरातील रसिकांपर्यंत पोहोचणार आहे. त्यासाठीच 'संदीप खरे'ज वर्ल्ड या मोबाइल ॲपची निर्मिती करण्यात आली आहे. यापूर्वी 'संदीप खरे ऑफिशियल पेज' या संदीपच्या सोशल पेजला इंटरनेटवर प्रचंड 'लाइक्स' मिळाले आहेत. मराठी साहित्यामध्ये कवीचे स्वत:चे वैयक्तिक ॲप ही कल्पना प्रथमच साकार होत आहे. सध्या 'गुगल प्ले'वर उपलब्ध असलेले हे ॲप लवकरच 'आय ट्यून' आणि 'ॲमेझॉन'वरही उपलब्ध होणार आहे. जेथे पुस्तके, सीडी पोहोचू शकत नाहीत आणि कार्यक्रमही होऊ शकत नाही अशा ठिकाणी ही कविता पोहोचू शकेल, अशी आशा संदीप खरे यांनी व्यक्त केली.

## ✍ जनकवी पी. सावळाराम यांचे चरित्र

'जनकवी पी. सावळाराम यांच्याविषयी कुत्सितपणे लिखाण झाल्याने त्यांना न्याय मिळाला नाही. नकारात्मकतेने लिहिण्याची आपल्या लोकांना खोडच आहे, अशा समीक्षकांपासून लेखक, कवींचे रक्षण व्हावे,' असा टोला माजी साहित्य संमेलनाध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी ११ फेब्रुवारी रोजी लगावला.

'सावळाराम यांच्या कवितेला गदिमा, शांता शेळके, सुधीर मोघे यांच्या कवितेची सर नाही, अशी टीका समीक्षकांनी केली; पण हे म्हणजे मुलगी सुंदर असताना दुसऱ्या मुलीसारखे गाल व ओठच नाहीत, असे म्हणण्यासारखे आहे,' अशा शब्दांत डॉ. मोरे यांनी समीक्षकांची खिल्ली उडवली.

लोकमंगल ग्रुप शिक्षण संस्था व बाळाजी आवजी चिटणीस चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने लेखक मधू पोतदार यांनी लिहिलेल्या 'जनकवी पी. सावळाराम' या चरित्राचे प्रकाशन डॉ. मोरे यांच्या हस्ते झाले. बालगंधर्व संगीत रसिक मंडळाचे अध्यक्ष सुरेश साखवळकर, ज्येष्ठ पत्रकार महावीर जोंधळे, पी. सावळाराम यांचे चिरंजीव संजय पाटील, लेखक पोतदार, ट्रस्टचे अध्यक्ष शिरीष चिटणीस, विवेक म्हेत्रे, संजय चिटणीस उपस्थित होते. आनंद देशमुख अध्यक्षस्थानी होते.

'मराठीमध्ये चरित्रांची परंपरा चांगली आहे. गायक, अभिनेते, दिग्दर्शक यांचे चरित्र लिहिले गेले आहे; पण गीतकाराचे चरित्र आढळत नाही. सावळारामांविषयी देखील जास्त लिहिले गेले नाही व जे लिहिले ते नकारात्मकतेतून आहे,' अशी टीका डॉ. मोरे यांनी केली. 'गीतकाराला चांगला संगीतकार मिळाला तर गाण्यांना प्रतिष्ठा मिळते. वसंत प्रभूंसारखे संगीतकार सावळाराम यांना लाभल्याने त्यांची गाणी अविस्मरणीय ठरली,' याकडे त्यांनी लक्ष वेधले.

प्रास्ताविक शिरीष चिटणीस यांनी केले. सूत्रसंचालन धनंजय कुलकर्णी यांनी केले. संजय चिटणीस यांनी आभार मानले.

❖

८वी आवृत्ती




# गंमतगोष्टी

**द. मा. मिरासदार**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

खासबातमीचं भांडवल करणाऱ्या किसन न्हाव्याची तऱ्हा...
पंचनाम्यात दुरुस्ती कशी करायची याचे प्रात्यक्षिक घेणारा नारायण कॉन्स्टेबल...
दिल्लीला प्रदर्शन पाहण्यास निघालेल्या पाटलांनी घेतलेले विशेष 'दर्शन'....
डिगूनानांच्या क्रियाकर्माला केवळ पैशांमुळे मिळालेला 'वारस'....!
नवशिक्षणशास्त्राचा प्रयोग बासनात गुंडाळून;
पुन्हा 'विद्या येई'चा पाठ गिरवणारे नवशिका शिक्षक...
वधूसंशोधनाऐवजी 'बुद्रुक' का 'खुर्द' या फेऱ्यातच अडकलेला वर...
अन् लगीन घरात सफाईने हात मारून सर्वांसमक्ष पोबारा करणारा 'भामटा'....
...या आणि अशाच इरसाल पात्रांचा आपल्या ग्रामीण शैलीतून मागोवा घेणाऱ्या द.मा. मिरासदारांच्या 'गंमत गोष्टी'!




**✻ असिफ कपाडियांना 'ग्रॅमी' पारितोषिक**

भारतीय वंशाचे ब्रिटिश दिग्दर्शक असिफ कपाडिया यांच्या माहितीपटाला ५८व्या ग्रॅमी पारितोषिक वितरण सोहळ्यात 'सर्वोत्तम संगीत चित्रपट' विभागात पारितोषिक मिळाले. 'ॲमी' या माहितीपटासाठी त्यांना हे पारितोषिक पटकावले.

कपाडिया यांनी दिवंगत गायिका ॲमी वाइनहाउस हिच्यावर हा माहितीपट बनवला आहे. त्यांच्या या माहितीपटाला 'बाफ्ता' मध्येही पारितोषिक मिळाला होते.

प्रसिद्ध सतारवादक आणि पं. रविशंकर यांच्या कन्या अनुष्का शंकर हिलाही तिच्या 'होम' या भारतीय रागसंगीतावर आधारित अल्बमसाठी 'ग्रॅमी'मध्ये 'बेस्ट वर्ल्ड म्युझिक अल्बम' या विभागात नामांकन मिळाले होते. मात्र, तिला पारितोषिक मिळू शकले नाही. अँजेलिक किड्जो हिला 'सिंग्ज' या अल्बमसाठी या विभागातील पारितोषिक मिळाले. अनुष्काने 'होम' हा अल्बम पं. रविशंकर यांना आदरांजली म्हणून तयार केला आहे.

**✻ साहित्य अकादमी पुरस्कार**

'साहित्य अकादमी पुरस्कारांना खरे तर सन्मान असे म्हणायला हवे. हा सन्मान अहस्तांतरणीय असून, हा सन्मान लेखकांना पुढच्या पिढीच्याही नावाने करता येत नाही. तसे ते करू शकत नाहीत,' अशा शब्दांत साहित्य अकादमीचे अध्यक्ष विश्वनाथ प्रसाद तिवारी यांनी अकादमी 'पुरस्कार वापसी' करणाऱ्यांना कानपिचक्या दिल्या.

विख्यात लेखक व अकादमीचे माजी अध्यक्ष गोपीचंद नारंग यांनी तर 'कोठे गेली ती ॲवॉर्ड वापसी ब्रिगेड?' अशी तीव्र भावना व्यक्त करून संबंधितांवर थेट हल्ला चढविला. 'फिक्की' सभागृहात साहित्य अकादमीचे अध्यक्ष तिवारी, उपाध्यक्ष चंद्रशेखर कंबार, सचिव डॉ. के. श्रीनिवास राव आणि प्रा. नारंग यांच्या उपस्थितीत एका दिमाखदार समारंभात हे पुरस्कार वितरण झाले. अरुण खोपकर (मराठी), उदय भेंब्रे (कोकणी), सायरस मिस्त्री (इंग्रजी) यांच्यासह २३ भाषांतील साहित्यिकांना एक लाख रुपये, शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यावर काही लेखकांनी वाढत्या असहिष्णुतेबद्दल सुरू केलेल्या 'पुरस्कार वापसी'वर साहित्य अकादमीच्या पदाधिकाऱ्यांनी मौन बाळगले होते. मात्र त्यांच्यासह नारंग यांनीही साहित्य अकादमीचा सन्मान लेखकांच्या साहित्यकृतींना, रचनांना समाजाकडून मूल्यभावाने मिळालेला आदर आहे व त्याचा अनादर करण्याचा अधिकार त्यांना स्वत:लाही नाही, अशी भावना व्यक्त केली.

प्रा. नारंग म्हणाले, साहित्य अकादमी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंतच्या उत्तमोत्तम साहित्यकृतींसाठी समान वागणूक ठेवते. मात्र अकादमीकडूनही चुका होऊ शकतात. नोबेल, बुकर पुरस्कारांमध्येही चुका होत नाहीत काय, असा सवाल त्यांनी केला.

### * अरुण खोपकर यांचा गौरव

ज्येष्ठ लेखक व दिग्दर्शक अरुण खोपकर यांना मराठी भाषेसाठीचा २०१५ चा साहित्य अकादमी पुरस्कार दिल्लीमध्ये प्रदान करण्यात आला. 'संस्मरणे' या साहित्य प्रकारात अरुण खोपकर लिखित निबंध संग्रह 'चलत चित्रव्यूह' या मराठी पुस्तकाची निवड करण्यात आली होती. देशातील २३ प्रादेशिक भाषांतील विविध साहित्य प्रकारातील पुरस्कार प्रदान करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ उर्दू साहित्यिक गोपीचंद नारंग प्रमुख पाहुणे होते. कोकणी भाषेसाठी उदय भेंब्रे यांच्या 'कण पर्व' या पुस्तकाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला.

### * मधू मंगेश कर्णिक, चंदू बोर्डे यांना 'कर्मयोगी' पुरस्कार

दमाणी साहित्य पुरस्काराच्या धर्तीवर दमाणीपटेल प्रतिष्ठानच्या पहिल्या

'कर्मयोगी' पुरस्कारांची घोषणा प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केली. पुरस्कार विजेत्यांमध्ये ज्येष्ठ साहित्यिक मधू मंगेश कर्णिक, ज्येष्ठ क्रिकेटपटू चंदू बोर्डे आणि गायिका वैशाली भैसने-माडे यांचा समावेश आहे.

कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीदिनी (ता. २७ फेब्रुवारी रोजी ) या पुरस्कारांचे वितरण डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात झाले. प्रत्येकी ५१ हजार रुपये, स्मृतिचिन्ह असे पुरस्कारांचे स्वरूप आहे. साहित्य, कला आणि क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल या पुरस्काराने गौरविण्यात आले. कर्णिक यांचे 'करूळचा मुलगा' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. बोर्डे यांनी १९६९ पर्यंत भारतीय संघाचे प्रतिनिधित्व केले. भैसने-माडे या 'सारेगमप २००८' मध्ये उत्कृष्ट गायिका म्हणून विजेत्या ठरल्या.

### * सुमेध रिसबूड यांना 'साहित्य पुरस्कार'

डॉ. स्नेहसुधा कुलकर्णी यांनी आपल्या आईच्या स्मरणार्थ दीर्घकाळ साहित्यसेवा करणाऱ्या व्यक्तीस गेल्या दोन वर्षांपासून साहित्य पुरस्कार देण्यास सुरुवात केली. यावर्षीचा वत्सला बाळकृष्ण अंबाडे यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा साहित्य पुरस्कार मुंबई स्थित सुमेध रिडबूड (वडावाला) यांना नगरच्या प्रा. डॉ. लीला गोविलकर यांच्या हस्ते देण्यात आला.

२०१५ साली प्रकाशित झालेल्या मराठी कादंबरीचा पुरस्कार डॉ. अमित बिडवे यांच्या 'दिल दोस्ती डॉक्टरी' या पुस्तकाला देण्यात येणार आला. परीक्षक म्हणून अंजली कुलकर्णी यांनी काम पाहिले.

### * डॉ. दामोदर खडसे यांना साहित्य अकादमी पुरस्कार

प्रसिद्ध साहित्यिक डॉ. दामोदर खडसे यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांनी सदानंद देशमुख यांच्या 'बारोमास' या कादंबरीचा हिंदी अनुवाद केला आहे. अकादमीने एकूण २३ भाषांतील अनुवादासाठीचे पुरस्कार जाहीर केले आहेत. मराठीत अनुवादासाठीचा पुरस्कार नंतर जाहीर केला जाणार आहे.

कवी, कथाकार, अनुवादक डॉ. खडसे यांनी आतापर्यंत २० मराठी पुस्तकांचे हिंदी अनुवाद केले असून, त्यात दया पवार, शिवाजी सावंत, जयवंत दळवी, भारत सासणे, राम नगरकर, शरणकुमार लिंबाळे आदी साहित्यिकांच्या

पुस्तकांचा समावेश आहे. पुरस्कारप्राप्त कादंबरी अकादमीनेच प्रकाशित केली आहे. त्यांच्या मूळ हिंदी कादंबरी 'काला सूरज'ला राष्ट्रपतींतर्फे 'राष्ट्रीय साहित्य पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

### * बालकथा 'दोस्ती'स पुरस्कार

श्रीमती मधुमती शिंदे यांच्या बालकथा विभागातील 'दोस्ती' या मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित पुस्तकास प्रा. चंद्रकुमार नलगे सार्वजनिक ग्रंथालय, कोल्हापूरतर्फे देण्यात येणारा सन २०१५-१६साठीचा 'उत्कृष्ट वाङ्मयनिर्मिती ग्रंथ पुरस्कार' जाहीर झाला आहे.

### * प्रा. डॉ. र. बा. मंचरकर स्मृती जीवनगौरव पुरस्कार

नामवंत समीक्षक व लेखक प्रा. डॉ. वा. पु. गिंडे यांना जाहीर झाला आहे. स्मृतिचिन्ह व रोख ११००० रु. असे या पुरस्काराचे स्वरूप असून, प्रा. डॉ. लीला गोविलकर यांच्या अध्यक्षतेखाली व प्रा. डॉ. भाऊसाहेब कराळे यांच्या प्रमुख उपस्थितीत तो प्रदान करण्यात येईल.

या प्रसंगी प्रा. डॉ. अविनाश सांगोलेकर लिखित 'मराठी गझल : १९२० ते १९८५' व 'साहित्यचिंतन' तसेच प्रा. डॉ. एकनाथ ढोणे लिखित 'लोकहितवादी- गोपाळ हरी देशमुख' या पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले.

### * 'छावा' आणि 'हाच माझा मार्ग' या पुस्तकांना पुरस्कार

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेल्या 'छावा' व 'हाच माझा मार्ग' या पुस्तकांना 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार' २८ फेब्रुवारी २०१६ रोजी प्रदान करण्यात आला.

अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ, पुणे यांच्यातर्फे दर वर्षी देण्यात येणारा २०१३-२०१४ चा 'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार' ललित साहित्यासाठी 'छावा' या शिवाजी सावंत लिखित पुस्तकास, तसेच ललितेतर साहित्यासाठी 'हाच माझा मार्ग' या सचिन पिळगांवकर लिखित पुस्तकास देण्यात आला. स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

### * 'सेव्ह अंटार्क्टिका'साठी 'अवनी'ची निवड

''बर्फाच्छादित पर्वत, वादळी वारे या वातावरणाशी सामना करीत

अंटार्क्टिकाचा प्रवास होत असतो. अशा या प्रवासाबद्दल आजपर्यंत फक्त ऐकले व वाचले होते. धैर्य, साहस यांची कसोटी पाहणाऱ्या अशा आव्हानात्मक अंटार्क्टिका माहिमेसाठी माझी निवड झाली. हे समजल्यावर मला खूप आनंद झाला.'' असे पुण्याच्या अवनी अवस्थीने सांगितले.

वैश्विक तापमानवाढीमुळे (ग्लोबल वॉर्मिंगमुळे) अंटार्क्टिकावर होत असलेला परिणाम प्रत्यक्ष तेथे जाऊन समजावून घेण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येणार आहे. मोहिमेचे प्रमुख रॉबर्ट यांनी १९८४ मध्ये अंटार्क्टिका मोहीम केली होती. त्या काळात बर्फाच्छादित असलेला हा परिसर आता वैश्विक तापमानवाढीमुळे (ग्लोबल वॉर्मिंगमुळे) वितळत चालला आहे. हा बर्फाच्छादित भाग असाच वितळत राहिला, तर जगाला खूप मोठ्या संकटाचा सामना करावा लागेल. अंटार्क्टिकाला वाचविण्यासाठी काय करायला हवे या विषयावर तज्ज्ञांची मार्गदर्शनपर व्याख्याने होणार आहेत.''

''या आधी टेरी या संस्थेने घेतलेल्या पुनर्निर्मिती (रिसायकल) या पर्यावरणरक्षण विषयक स्पर्धेत मला विजेतेपद मिळाले. या स्पर्धेच्या बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमादरम्यान माझी सर रॉबर्ट स्वान यांच्याशी भेट झाली. त्यानंतर स्वान आणि मी ई-मेलच्या माध्यमातून संपर्कात होतो. माझी पर्यावरण या विषयातील आवड पाहून त्यांनी या मोहिमेसाठी माझी निवड केली. मोहिमेवरून परत आल्यावर पर्यावरणाच्या रक्षणासाठी काय केले जावे यासाठी शाळा व महाविद्यालयामध्ये जाऊन माहिती सांगणार आहे.'' मोहिमेसाठी अवनीला आठ लाख पस्तीस हजार रुपये खर्च येणार आहे. मोहिमेसाठी लागणारा ८० टक्के खर्च लोकवर्गणीतून मिळवावा अशी अट संस्थेकडून घालण्यात आली आहे.

### * यशोदा वाकणकर यांना बाजोरिया पुरस्कार

पुण्यातील संवेदना फाउंडेशन एपिलेप्सी सपोर्ट ग्रुपच्या संस्थापक संचालक यशोदा वाकणकर यांना या वर्षीचा एच. सी. बाजोरिया पुरस्कार १४ फेब्रुवारीला विशाखापट्टणम येथे एपिलेप्सी कॉन्फरन्समध्ये देण्यात आला. या कॉन्फरन्समध्ये भारतभरातील मेंदूतज्ज्ञ आणि एपिलेप्सी क्षेत्रात काम करणारी माणसे जमतात. पुरस्कार मिळालेल्या व्यक्तीस तिच्या कामाविषयी आणि एपिलेप्सी क्षेत्रातील तिच्या नवीन अनुभवांविषयी बोलण्याची संधी मिळते.

**५वी आवृत्ती**

# कमोदिनी

## रणजित देसाई




**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

कमोदिनी हा रणजित देसाई यांच्या दहा कथांचा संग्रह आहे. मानवी जीवनात प्रेम ही एक महत्त्वाची भावना आहे. दोन व्यक्तींमध्ये काय नाते आहे त्याप्रमाणे या प्रेमाचे स्वरुप बदलते. पती-पत्नी, प्रियकर-प्रेयसी, गुरू-शिष्या अशा संबंधातच नाही; तर कोठीवर जाऊन प्रेम करण्याच्या संबंधातसुद्धा प्रेमाचे वेगळे कंगोरे दिसतात.

या संग्रहामधील बहुतेक कथा विविध घटनांमधून या भावनेचा शोध घेणाऱ्या आहेत.

कथेतील पात्रांच्या प्रभावी चित्रणातूनदेखील मानवी भावनांचा वेध घेतला जातो. 'अखेर' या कथेमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या उत्कट देशभक्तीचा घेतलेला मागोवा हे याचेच उदाहरण आहे.

वाकणकर यांना स्वत:ला एपिलेप्सीचा त्रास होता. त्यातून त्या पूर्ण बाहेर आल्या. फेब्रुवारी २००४ मध्ये त्यांनी संवेदना फाउंडेशन या संस्थेची स्थापना केली. एपिलेप्सी सपोर्ट ग्रुप, एपिलेप्सी सल्ला केंद्र, एपिलेप्सी विवाह मंडळ असे उपक्रम या संस्थेतर्फे राबविले जातात.

*** पारोमिता गोस्वामी यांना 'अवचट संघर्ष सन्मान'**

चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदीसाठी यशस्वीपणे लढा देणाऱ्या पारोमिता गोस्वामी व स्वत:हून व्यसनातून बाहेर पडत गेली २५ वर्षे अनेकांना व्यसनमुक्त करण्यासाठी मदत करणारे प्रमोद उदार यांना यावर्षीचा डॉ. अनिता अवचट स्मृती संघर्ष सन्मान पुरस्कार देण्यात आला. पंधरा हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप असून, पुरस्काराचे हे १८ वे वर्ष आहे.

मूळच्या कलकत्त्याच्या असलेल्या पारोमिता गोस्वामी या 'श्रमिक एल्गार' संस्थेच्या माध्यमातून चंद्रपूर जिल्ह्यात दारूबंदी विरोधात गेली अनेक वर्षे लढा देत आहेत. तर प्रमोद उदार हे स्वत: व्यसनमुक्तीतून बाहेर पडलेले असून गेली २५ वर्षे ते व्यसनाधीन नागरिकांच्या व्यसनमुक्तीसाठी काम करीत आहेत.

*** राधा यादवाडकरला कटकमध्ये पारितोषिके**

राधा यादवाडकर हिने कटक (ओडिशा) येथे झालेल्या अखिल भारतीय बहुभाषिक स्पर्धेत शास्त्रीय गायन आणि नाट्यछटा विभागांत पारितोषिके पटकावली.

ग्लोबल थिएटर अकादमीतर्फे गेली २० वर्षे ओरिसामध्ये शास्त्रीय गायन, नाटक, नृत्याच्या राष्ट्रीय पातळीवर स्पर्धा घेतल्या जातात. राधाने शास्त्रीय गायन विभागात राग भीमपलास सादर करून आपल्या आवाजाने प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. यात तिने द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

तसेच नाट्यछटा विभागात तिने 'द्रौपदीहरण' ही नाट्यछटा सादर केली. विशेष म्हणजे ही नाट्यछटा तिने स्वत:च लिहून दिग्दर्शित केली. यात तिला तृतीय पारितोषिक मिळाले. ती गोळवलकर प्रशालेत सहावीमध्ये शिकते. सुरेखा गंगापूरकर आणि प्रमोद रानडे यांच्याकडे गाण्याचे प्रशिक्षण घेत तिने आत्तापर्यंत तीन बाल नाट्ये लिहिलेली असून त्यांचे प्रयोगही झालेले आहेत.

**✽ अमृतमहोत्सवानिमित्त चाफेकर यांचा सत्कार**

वंचित विकास संस्थेचे संस्थापक विलास चाफेकर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त त्यांचा जाणीव युवा व विधायक, पुणे यांच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.

**✽ पं. बक्षी यांना पुरस्कार**

राज्याच्या सांस्कृतिक संचालनातयातर्फे पुण्यातील ज्येष्ठ गायक विजय बक्षी यांना कंठसंगीत आणि कलाक्षेत्रात एकनिष्ठपणे प्रदीर्घकाळ केलेल्या कामगिरीसाठी रत्नागिरी येथील स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहामध्ये सांस्कृतिक मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. एक लाख रुपये, स्मृतीचिन्ह आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

**✽ थिंकिंग आउट लाऊड**

५८व्या ग्रॅमी संगीत पुरस्कारांमध्ये रॅपर केड्रिक लॅमरने पाच पुरस्कार पटकावत बाजी मारली, तर टेलस स्विफ्टच्या १९८९या अल्बमला 'सर्वोत्कृष्ट अल्बम' चा पुरस्कार मिळाला. लॅमरला या पुरस्कारांसाठी ११ तर, स्विफ्टला पाच नामांकने मिळाली होती.

लॅमरचा 'टू पीप्स अ बटरफ्लाय' हा अल्बम स्पर्धेत होता, मात्र स्विफ्टच्या महिला सबलीकरणासंदर्भातील अल्बमने आघाडी मिळवली. ब्रुनो मार्स आणि निर्माता मार्क रॉन्सन यांच्या 'अपटाऊन फॅक' या गीताला 'रेकॉर्ड ऑफ द इअर' पुरस्कार मिळाला. ब्रिटिश गीतकार व गायक एड शिरनच्या 'थिकिंग आउट लाउड' या गाण्याला पुरस्कार मिळाला.

**ग्रॅमी पुरस्कार विजेते :**

ट्रेनॉर (बेस्ट न्यूज आर्टिस्ट), केंड्रिक लॅमार (बेस्ट रॅप अल्बम), मार्क रॅन्सन फिट (बेस्ट पॉप), स्क्रिलेक्स, डिप्लो आणि जस्टिन बायबर (बेस्ट डान्स रेकॉर्डर) टेलर स्विफ्ट (१९८९) (बेस्ट पॉप वोकळ अल्बम), सिराइस, गोस्ट (बेस्ट अल्टरनेटिव्ह म्युझिक अल्बम), ब्युटी बिहाडं दी मॅडनेस (बेस्ट अर्बन कॉन्टेपररी अल्बम), हेमिल्टन (बेस्ट म्युझिकल थिटर अल्बम)

**✽ अरुण दाते यांना राम कदम पुरस्कार**

शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान आणि दरोडे जोग प्रॉपर्टीज यांच्या

वतीने देण्यात येणारा स्वर्गीय राम कदम कलागौरव पुरस्कार यंदा प्रसिद्ध ज्येष्ठ भावगीत गायक अरुण दाते यांना देण्यात आला. एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

संगीत क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. मराठी संगीताला सातासमुद्रापार नेण्याची किमया करणाऱ्या स्वर्गीय राम कदम या हुन्नरी कलाकाराच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा पुरस्कार दिला जातो. यापूर्वी जगदीश खेबुडकर, सुलोचना कदम यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

### ✻ यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार

राज्य सरकारतर्फे उत्कृष्ट मराठी वाङ्मयनिर्मितीसाठी दिले जाणारे स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०१४ देण्यात आले. एक लाख व ५० हजार रुपये अशा दोन विभागांत हे पुरस्कार आहेत. उत्कृष्ट साहित्यनिर्मितीला प्रोत्साहन मिळावे यासाठी दर वर्षी उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कार दिले जातात.

काव्य विभागातील प्रथम प्रकाशनाचा एक लाख रुपयांचा कवी केशवसुत पुरस्कार मनोहर जाधव यांच्या 'तीव्र एकातातल्या जीर्ण काळोखात' या संग्रहाला, याच विभागातील ५० हजारांचा बहिणाबाई चौधरी पुरस्कार विनायक येवले यांच्या 'ठसे बदललेल्या मुक्कामावरून' या संग्रहाला मिळाला. नाटक-एकांकिका विभागातील राम गणेश गडकरी पुरस्कार प्रा. मधू पाटील यांच्या 'कामस्पर्शिता-पाच एकांकिका'ला देण्यात आला. कादंबरी विभागात एक लाख रुपयांचा हरी नारायण आपटे पुरस्कार राजन खान 'रजे हो ऊर्फ मुद्दाम भरकटलेली कथा'ला आणि प्रथम प्रकाशन विभागातील ५० हजारांचा श्री. ना. पेंडसे पुरस्कार व्यंकट पाटील यांच्या 'घात' या कादंबरीला मिळाला.

### ✻ पुरस्कार

**लघुकथा विभाग : दिवाकर कृष्ण पुरस्कार :** विनिता ऐनापुरे (कथा तिच्या) प्रथम प्रकाशन (लघुकथा) - ग. ल. ठोकळ पुरस्कार : मनस्विनी लता रवींद्र (ब्लॉगच्या आरशापल्याड)

**ललित गद्य -** ललित विज्ञान : अनंत काणेकर पुरस्कार : अमृता सुभाष (एक उलट... एक सुलट), प्रथम प्रकाशन - (ललित गद्य) - ताराबाई शिंदे पुरस्कार : रवी अभ्यंकर (पन्नाशीचा भोज्या)

**विनोदी वाङ्मय : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार :** मंगला गोडबोले (ऋतू हिरवट) (चरित्र) - न. चिं. केळकर पुरस्कार : प्रा. नीलकंठ पोलकर (ज्ञानसूर्य डॉ. डी. वाय. पाटील).

**आत्मचरित्र - लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार :** म. सु. पाटील (लांबा उगवे आगरी).

समीक्षा - यशोदा भागवत (ग्राफिक डिझाइनचे गारुड); विजय नाईक (साऊथ ब्लॉक दिल्ली शिष्टाईचे अंतरंग).

**इतिहास :** डॉ. माया पाटील (शहापूरकर) मंदिर-शिल्पे मराठवाड्यातील काही शिल्पे आणि मंदिर स्थापत्य.

**भाषाशास्त्र व्याकरण :** डॉ. सुधीर रा. देवरे

(अहिराणीच्या निमित्ताने : भाषा).

अन्य पुरस्कार पुढीलप्रमाणे : महात्मा जोतिराव फुले पुरस्कार : डॉ. निवास पाटील (शोध देवकणाचा),

गजेंद्र प्रभाकर बडे (योजनांची विकासगंगा भाग : १ शेतीच्या योजना)

डॉ. जे. के. पवार (अर्थायन), राजीव साने (गल्लत गफलत गहजब), मंगला कुलकर्णी (शिक्षणातून स्वयंपूर्णतेकडे),

संतोष शिंत्रे (विज्ञानाधारित निसर्ग संवर्धन-संरक्षण),

रा. ना. चव्हाण पुरस्कार : संपादन अरुणा ढेरे (स्त्री-लिखित मराठी कथा १९५० ते २०१०); अनुवादक वर्षा गजेंद्रगडकर (दोन क्षितिजे), सुकन्या आगाशे (मागोवा मिथकांचा).

**बालसाहित्य :** बालकवी पुरस्कार : शं. ल. नाईक (माकडोबाची वरात),

सुरेश वांदिले (बेअर्ड काका),

डॉ. भा. ल. महाबळ (चोरानं खोकला नेला!),

मंगला नारळीकर (गणित गप्पा - भाग १),

डॉ. भगवान अंजनीकर (कुशल सारथी नरेंद्र मोदी),

स्मिता भागवत (सावन घन बरसे)

### * भाषाप्रेमी प्रा. हर्दवाणी

प्रा. लक्ष्मण हर्दवाणी यांना भारत सरकारच्या 'राष्ट्रीय सिंधी भाषा विकास परिषद' या संस्थेकडून 'जीवन गौरव पुरस्कार' ७ फेब्रुवारी २०१६ रोजी इंदूर मुक्कामी देण्यात आला.

सिंध प्रांतात जन्माला आलेले हर्दवाणी फाळणीच्या कचाट्यात सापडल्यामुळे लहानपणीच आपल्या आई-वडिलांसोबत मजल दरमजल करत महाराष्ट्रात आले. तेव्हापासून त्यांना मातृभाषा सिंधीची साथ न सोडता मराठीलाही आपलेसे केले. पुण्यातून एम. ए. पूर्ण झाल्यावर ते नगरच्या महाविद्यालयात हिंदीचे प्राध्यापक झाले आणि तिथपासून त्यांनी आपल्या वेगळ्या कार्याला प्रारंभ केला.

व्यापारासाठी प्रसिद्ध असलेल्या सधन सिंधी समाजात जन्म घेऊनही त्यांनी विद्येची कास धरली आणि ते तिच्याशीच एकनिष्ठ राहिले आहेत. वर्गात शिकवण्याचे काम तर सारेच प्राध्यापक करतात; पण प्रा. हर्दवाणी यांनी या व्यतिरिक्तही खूप कार्य केले. हिंदी विषयाचे अध्यापन उत्कृष्टपणे करताना त्यांनी आपली मातृभाषा सिंधी आणि राज्यभाषा मराठी यांच्याकडे पूर्ण लक्ष दिलेच नाही, तर दोन्ही भाषांची सेवाही केली.


ज्ञानेश्वरी, दासबोध अशा मराठीतील अक्षरवाङ्मयाचे त्यांनी त्याच शैलीत सिंधी भाषेत रसाळ भाषांतर केले. त्यांनी आजपर्यंत ९० ग्रंथांची निर्मिती केली आहे. त्यात मराठी-सिंधी आणि सिंधी-मराठी असे शब्दकोशही आहेत.

सिंधीच्या संदर्भात त्यांचा दृष्टिकोन अतिशय स्वच्छ आहे. सिंधी भाषेची मूळची लिपी देवनागरी असल्याने तिचे लेखन आणि मुद्रण देवनागरीतच झाले पाहिजे, असा त्यांचा आग्रह पहिल्यापासूनच होता आणि आजही आहे. आपल्या या तत्त्वासाठी त्यांनी आंदोलनच केले आहे. या मताच्या आग्रहाखातर त्यांनी आपली सारी सिंधी पुस्तके देवनागरीतून मुद्रित केली आहेत आणि चार दशके त्यांनी आपली सारी पुस्तके स्वखर्चाने प्रकाशित केली. सिंधी, मराठी, हिंदी भाषेतील सुमारे ९० पुस्तके त्यांनी स्व-खर्चानेच लोकांना भेट म्हणून पाठवून आपण सिंधी भाषाप्रेमी आहोत, पण व्यापारी नाही हे समर्थपणे सिद्ध केले आहे.

डॉ. अविनाश बिनीवाले आणि हर्दवाणी दोघांनी मिळून जर्मन-मराठी-सिंधी असा शब्दकोश सिद्ध केला. या कामाच्या काळात त्यांची सुखद अशी आणखीच स्वभाववैशिष्ट्ये जाणवली. असा सर्जनशील, कष्टाळू, सुस्वभावी मित्र लाभला, आज पंच्याहत्तरीतही त्यांचे कार्य सुरू आहे आणि सिंधी साठी सर्व स्तरावर देवनागरीचा उपयोग व्हावा, यासाठीचा लढाही.

❖

**६वी आवृत्ती**




# फाशी बखळ

## रत्नाकर मतकरी

**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

''मनाची टोचणी चालूच होती.
आपण एका माणसाला मरू दिलं, फासावर लटकावलं,
हे मनाला खातच होतं. कुठंही दोरी दिसली, की ते सारं आठवायचं.
मग हाताचा चाळा सुरू व्हायचा.
सहज दोरीची गाठ मारली जायची. माझं वागणं शहाणपणाचं नव्हतं,
हे माझं मलाच कळत असे.
पण दोरी पाहिली, की ती रात्र डोक्यात फिरायची.
आणि घरात सगळीकडे दोऱ्या; चिकाच्या पडद्याला दोरी, ताक घुसळायला दोरी, अंघोळ करायला घरामागच्या विहिरीवर जावं, तर चांगला जाडजूड दोरखंड.
त्या दोरखंडाचा गच्च फास कळशीभोवती आवळताना, ती रात्र डोळ्यांसमोर यायची. जीव गलबलायचा.
मी रहाट गडगडत सोडून द्यायचा आणि तळापासून थोड्या अंतरावर कळशी तशीच लोंबकळत ठेवायचा.
अधांतरी... फाशी गेलेल्या माणसासारखी.''
गूढकथेला मानवी मनाचे कंगोरे देणाऱ्या आणि त्यामुळेच मराठी कथासाहित्यात अढळपद मिळवणाऱ्या,
रत्नाकर मतकरी यांच्या कथांचा आगळावेगळा संग्रह.



# स्मरण

# अरुण टिकेकर...

मराठी वृत्तपत्रसृष्टीला, संदर्भसंपन्न व्युत्पन्न संपादकांची देदीप्यमान परंपरा लाभली आहे. १९व्या शतकाच्या पूर्वार्धात १८३२ साली बाळशास्त्री जांभेकर यांनी 'दर्पण' हे मराठीतले पहिले वृत्तपत्र सुरू केले. आजपर्यंत अनेक दिग्गज संपादक ह्या वृत्तपत्रसृष्टीला लाभले. लयदार, अर्थघन लेखन करून ज्यांनी अभिरुची संपन्न ग्रंथांची निर्मितीसुद्धा केली, अशा काही थोड्या श्रेष्ठ संपादकांमध्ये अरुण टिकेकर ह्यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. माधव गडकरी ह्यांच्या नंतर लोकसत्तेची धुरा अरुण टिकेकर ह्यांनी अप्रतिमपणे सांभाळली. संपादकीय कौशल्यातून लोकसत्तेला एक नवे रूप दिले.

अरुण टिकेकर यांचे १९ जानेवारी २०१६ ह्या दिवशी वयाच्या एकाहत्तराव्या वर्षी दु:खद निधन झाले.

मराठी आणि इंग्रजी भाषेवर त्यांचे जबरदस्त प्रभुत्व होते. एकोणिसाव्या शतकातल्या सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक तसेच साहित्यक्षेत्रावर मन:पूत प्रेम करणाऱ्या मित्रांची त्यांनी एक "Nineteenth century club" नावाची संघटना निर्माण केली होती. ग्रंथांवर प्रेम करणापरी माणसे भेटली की टिकेकरांना तर विठ्ठलभेटीचा आनंद व्हायचा. 'महाराष्ट्र टाइम्स'च्या गोविंद तळवलकरांप्रमाणे ते ब्रिटिश संस्कृतीशी मनाने मिसळून गेले होते.

अरुण टिकेकर ह्यांचे ग्रंथप्रेम हीच त्यांची खरी ओळख होती.

त्यांना व्यासपीठ गाजवण्याचा छंद नव्हता तर हाताशी ग्रंथ घेऊन, एकांतात ग्रंथानंदात बुडून जाण्याचा, अभ्यासपूर्ण ग्रंथलेखनाचा छंद होता. समर्थ रामदासस्वामींनी आपल्या दासबोधातल्या 'लेखनक्रिया निरूपणनाम' समासात एक अप्रतिम विचार मांडला आहे की,

ऐसा ग्रंथ जपोनी ल्याहावा । प्राणिमात्रांस उपजे हेवा ।
ऐसा पुरुष तो पाहावा । म्हणती लोक ।।

दासबोध: १९:१:१२ ।।

समर्थ म्हणतात की, आपण जेव्हा ग्रंथलेखन करतो तेव्हा संदर्भाची नीट काळजी घेत, विचारांशी थेटपणे भिडत, वेधक भाषेत ग्रंथलेखन करावे. समर्थांचे हे लेखकावरचे भाष्य अरुण टिकेकरांना शतप्रतिशत लागू होते. अरुण टिकेकरांचे 'तारतम्य', 'जन-मन', 'अक्षरनिष्ठांची मांदियाळी', 'स्थल-काल', 'बखर मुंबई विद्यापीठाची' असे एकाहून एक अप्रतिम ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. पण ज्ञानसंपन्न, लेखनसमृद्ध संपादकाला 'पद्म' पुरस्कार वा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद लाभले नाही. अरुण टिकेकर ह्यांच्या आयुष्यातला सर्वोत्तम आनंद एकच होता आणि तो म्हणजे हवे असणारा दुर्मिळ ग्रंथ मिळवणे आणि तो लगोलग वाचून काढणे.

अरुण टिकेकर भारतात आणि परदेशात अनेक ठिकाणी गेले. तेथे गेल्यावर स्थलदर्शन न करता, तेथील पुस्तकांची दुकाने शोधून उत्तमोत्तम ग्रंथ निवडून खरेदी करीत असत. त्यांचा अत्यंत मैत्रीपूर्ण सहवास मिळाला हेच मी माझे भाग्य समजतो. विद्वत्ता, विनम्र वृत्ती, सर्वसमावेशक दृष्टी, अभिजात रसिकता, रसाळ शब्दवैभव अशा उत्कृष्ट गुणांनी मंडित असणाऱ्या अरुण टिकेकरांची अनुपस्थिती ह्या पुढे पदोपदी जाणवेल. स्वत:ला आगरकरांचे पाईक म्हणवून घेणारे, साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले नसले तरी 'एशियाटिक सोसायटी'चे सहा वर्षे अध्यक्षपद भूषविलेले अरुण टिकेकर खरे विद्वान लेखक-संपादक होते हे मात्र निश्चित...

**— वामन देशपांडे**
डोंबिवली (पूर्व)

## अभिप्राय

# व्यवस्थेविरुद्ध बंड

**'एकाकी बंड'** ही कहाणी आहे एका धाडसी स्त्रीची. कॅथरिन बोल्कोव्हॅक ही अमेरिकेतील नेब्रास्का राज्यातील माजी पोलिस अधिकारी. तिचा जन्म बोल्कोव्हॅक घराण्यातला, ती वडिलांच्या घराण्याकडून क्रोएशिअन तर तिची आई मूळची ओहायो राज्यातील रहिवासी, पण तिच्या आईवडिलांबरोबर अनेक वर्षे दक्षिण आफ्रिकेत वास्तव्य केलेली. भावंडात दुसरी असणारी कॅथरिन लहानपणापासूनच तब्येतीने एकदम धडधाकट. सहा फूट सणसणीत उंची आणि दणकट बांधा असणाऱ्या कॅथरिनला फूटबॉल, व्हॉलिबॉल असे धसमुसळे खेळ मनापासून आवडायचे. भरपूर व्यायाम करायचा आणि भरपूर आहार घ्यायचा असा तिचा लहानपणापासूनचा क्रम होता.

पदवीधर होण्याच्या आतच लग्न करून वयाच्या तेविसाव्या वर्षापर्यंत ती तीन मुलांची आई झाली. सुरुवातीची काही वर्षे तिने हॉटेलमध्ये नोकरी केली. लग्नानंतर दहा वर्षातच तिने घटस्फोट घेतला आणि ती नवऱ्यापासून विभक्त झाली. अपयशी ठरल्याच्या भावनेने तिला घेरून टाकले. त्याच सुमारास वर्तमानपत्रात आलेल्या लिंकन पोलिस खात्याच्या एका जाहिरातीने तिचे लक्ष वेधून घेतले १९८९ मध्ये तिने मुलाखत दिली आणि तिची निवड झाली. कामाला सुरुवात केल्यानंतर जणू त्याच कामाकरता आपला जन्म झाला आहे, एवढी आत्मीयता तिला त्या कामाबद्दल वाटू लागली. तिच्या निडर कार्यपद्धतीमुळे तिला 'झेना' (एक लढाऊ राजकन्या) असं टोपणनावही मिळालं.

आठ नऊ वर्षं सलग काम केल्यानंतर गुन्हेगार आणि त्यांच्या जगाशी कामामुळे येणारा सततचा संपर्क आणि त्यातील धोके यापासून दूर जावंसं

तिला वाटू लागलं आणि त्याच वेळेस तिच्या पोलिसस्टेशनात डीनकॉर्प कंपनीची 'युनो'च्या 'इंटरनॅशनल पोलिस टास्क फोर्स बोस्निया' मध्ये एक वर्षाकरता, निवृत्त पोलिस अधिकाऱ्यांच्या भरतीविषयीची जाहिरात झळकली. तिने लगेच अर्ज पाठवला.  प्रशिक्षणाकरता तिची निवड झाली, इतकंच नव्हे तर त्यातूनही ठणठणीत तब्येत आणि खणखणीत मन याच्या जोरावर 'आयपीटीएफ'मध्ये ती दाखल झाली.

वयाच्या अडतिसाव्या वर्षी एका वर्षाकरता मुलांपासून दूर ५००० मैलांवर असलेल्या ठिकाणी जाण्याचा तिचा निर्णय सोपा नक्कीच नव्हता. परंतु मुलांनीच तिला मनापासून धीर आणि पाठिंबा दिला आणि जून १९९९ मध्ये ती तिच्या पथकाबरोबर बोस्नियातील सारायेव्हो शहरात 'यूनो' च्या कार्यालयात दाखल झाली. इथे आयपीटीएफ तर्फे निवडले गेलेले आणि 'यूनो'च्या ४५ सभासद देशांमधून आलेले २००० पोलिस अधिकारी एकत्र आले. इथे या सर्वांकडे जी कामगिरी सोपवण्यात आलेली होती तिला त्या भूप्रदेशातील अनेक वर्ष चाललेल्या युद्धाची पार्श्वभूमी होती.

१९९२ च्या सुरुवातीला युगोस्लाव्हिया देशातील साम्यवादाचं, कम्युनिस्ट सत्तेचं उच्चाटन झालं, परंतु त्याच वेळी सर्बिया प्रांताच्या  अध्यक्षाची सत्ता प्रबळ होत होती. या दोन गोष्टींमुळे बोस्निया आणि हरझेगोव्हिया या दोन प्रांतांनी युगोस्लाव्हियापासून स्वतंत्र व्हायचं ठरवलं. त्या दोन प्रांतात पूर्वीपासूनच कॅथालिक पंथाचे क्रोएटस , सनातनी वृत्तीचे सर्ब आणि मुस्लिम असे भिन्नधर्मीय लोक एकत्र नांदत होते. पण एप्रिल १९९२ नंतर हे सर्व चित्रच बदलत गेले. सर्बियन लोकांनी सारायेव्हो शहरातील मुस्लिम आणि क्रोएटस समुदायांवर हल्ले करायला सुरुवात केली. जिथे जिथे बोस्नियन नागरिक राहात होते तिथे-तिथे हे हल्ले चालू होते. शेवटी तर सर्बियन हुकूमशहाने सारायेव्हो शहराची नाकेबंदी करून शहराला सैनिकांचा वेढा घातला, राजधानीच्या शहराची सर्वांत जास्त काळ  केलेली ही नाकेबंदी ठरली. शेवटी डिसेंबर १९९५ मध्ये 'डेटन शांती करारा'ने साडेतीन वर्ष चाललेल्या या एकतर्फी युद्धाचा शेवट झाला आणि बोस्निया आणि हरझेगोव्हिया असे दोन नवे देश अस्तित्वात आले.

'डेटन शांती करारा'प्रमाणे 'यूनो' च्या सुरक्षा समितीने बोस्निया आणि हरझेगोव्हिया या देशात मनुष्य हिताची कामं करणं अपेक्षित होतं. त्यात युद्धात निर्वासित झालेल्या लोकांची सोय बघणं, जमिनीत पेरलेले सुरुंग

नष्ट करणं, मानवी हक्कांची जपणूक करणं, निवडणूक घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणं, आर्थिक व्यवस्थेची पुनर्रचना करणं, रस्ते, नागरी आणि पायाभूत सुविधा यांची पुनर्बांधणी करणं, पोलिस यंत्रणा नव्याने उभारणं, त्याकरता पोलिस भरती करणं आणि त्या निवडलेल्या उमेदवारांचं प्रशिक्षण करणं अशीही अनेक कामांची यादी होती.

त्याकरता बोस्नियात 'इंटरनॅशनल पोलिस टास्क फोर्स' (आयटीपीएफ) आणि नागरी कामांकरिता कार्यालय स्थापन करण्यात आलं. 'आयटीपीएफ' तयार करण्याकरता 'यूनो'ला सभासद देशांच्या अंतर्गत पोलिस यंत्रणेतून माणसं पुरवण्यात आली. अपवाद होता तो अमेरिकेचा. कारण त्या देशात पोलिस व्यवस्था ही त्या त्या शहराची आणि राज्याची जबाबदारी असते. म्हणून तिथे अशी भरती करण्याकरता 'डीन कॉर्प' या खाजगी संस्थेला कंत्राट देण्यात आलं.

'डीन कॉर्प'तर्फे कॅथरिन सारायेव्होत दाखल झाली, पण तिला केवळ कार्यालयीन कामात रस नव्हता. म्हणून तिने मानवी हक्क जपणुकीसंबंधीचं कामाचं क्षेत्र निवडलं, त्याकरता इलिझा गावात तिची नेमणूक करण्यात आली. तिथे तिच्याबरोबर व्हेनेटा नावाची एक अमेरिकन सहकारीही होती. तिच्यावर आता युद्धकाळात घर सोडून पळून गेलेल्या लोकांचं पुनर्वसन करण्याची किचकट जबाबदारी होती. कारण युद्धापूर्वी युगोस्लाव्हियातील बोस्नियात सर्ब लोक, क्रोएटस, आणि मुस्लिम लोक वेगवेगळ्या भागात वस्त्या करून राहात होते. परंतु युद्धानंतर सर्वत्र अंदाधुंदी माजली होती. निर्वासितांच्या छावणीत जीवनावश्यक वस्तूंचा प्रचंड तुटवडा होता. त्यांची सोय लावण्याचं काम कॅथरिनला दिवसभर पुरून उरायचं. याशिवाय बोस्नियातील पोलिस खात्याची पुनर्उभारणी करण्याचं कामही तिच्याच विभागाकडे सोपवण्यात आलेलं होतं. मुळातच अतिशय कमी वेतनावर काम करणाऱ्या तिथल्या पोलिस खात्यात लाचखाऊपणा आणि भ्रष्टाचार याला ऊत आला होता. पोलिसांची नागरिकांशी वर्तणूक मग्रूरीची आणि उर्मट होती. याला वळण लावण्याच्या अतिशय अवघड कामात कॅथरिन तिच्या सहकाऱ्यांसमवेत गुंतली.

त्यानंतर काही काळातच तिच्यातील गुणवत्ता हेरून तिच्यावर स्त्रियांवरील हिंसाचाराची परिणामकारक उकल करणं अशा स्वरूपाची जबाबदारी सोपवण्यात आली. आणि ऑक्टोबर १९९९ ते डिसेंबर १९९९ या कालावधीत झेनिया या सारायेव्होच्या उत्तरेला असलेल्या गावात तिने आपल्या कामाची सूत्रे हाती

घेतली. या ठिकाणी प्रसंगी जीव धोक्यात घालून कॅथरिनने अत्यंत घृणास्पद गोष्टींचा शोध लावला, 'डीन कॉर्प'सारख्या खाजगी भाडोत्री सैनिकांच्या कंत्राटदाराबरोबर, 'यूनो' आणि अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याबरोबर साटंलोटं असणाऱ्या अधिकाऱ्यांची मानवी व्यापारात अडकलेल्या स्त्रियांना जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करायला भाग पाडण्याची कृत्ये तिने उघडकीला आणली.

ही गोष्ट 'डीन कॉर्प'लाच काय, पण अमेरिकन परराष्ट्र खात्यालाही परवडण्याजोगी नव्हती. परिणामी लवकरच तिची पदावनती करून तिला कामावरून काढून टाकलं गेलं.

पुढे जिवाला धोका उत्पन्न झाल्यामुळे कॅथरिनने बोस्निया सोडलं आणि ती मायदेशी, अमेरिकेला परतली. पण मुळात एक धडाडीची पोलिस अधिकारी असलेल्या कॅथरिनने आपल्या शोधाचे सर्व पुरावे जपून ठेवले होते. त्यांच्या भक्कम आधारावर तिने 'डीन कॉर्प' कंपनीविरुद्ध खटला दाखल केला आणि तो जिंकला. 'डीन कॉर्प' कंपनीची काळी कृत्यं उजेडात आणण्यात ती यशस्वी झाली.

'द व्हिसलब्लोअर' या मूळ इंग्रजी कादंबरीचा हा मराठी अनुवाद आहे. मुळात या पुस्तकाच्या कथनाचा आवाका मोठा आहे. त्याला वस्तुस्थितीतील राजकीय संदर्भ आहेत. त्यामुळे अनुवादाचं काम कौशल्याचं होतं. ते ठीक झालं आहे. परंतु काही वेळा शैली बोजड वाटते. ती अधिक सहज असायला हवी होती असं जाणवतं. एरवी बातम्या ऐकतांना ज्यांची नावं आपल्या कानावर पडली तरी आपण ज्यांची फारशी दखल घेत नाही अशा देशांपैकी एका देशातील घडामोडी मराठी वाचकांपर्यंत आवर्जून पोचवल्याचं श्रेय या पुस्तकाला द्यावंच लागेल.

**पुस्तक परिचय :** शुभदा चंद्रचूड

**एकाकी बंड**

**मूळ लेखक:** कॅथरिन बोल्कोव्हॅक
आणि कॅरी लीन
**अनुवाद:** सिंधू जोशी
**प्रकाशन:** मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे ४११०३०
**पृष्ठे :** २२०, **किंमत :** २५० रुपये
**(लोकसत्ता).**




प्रतिकूल परिस्थितीशी झगडून रुग्णांची
आयुष्यं वाचवणारे डॉक्टर
आणि त्यांचे वैद्यकीय चमत्कार!

# मृत्यूवर मात!




संजय गुप्ता एम.डी. असून, ते 'न्यूरोसर्जन' म्हणून प्रॅक्टिस करतात. ते 'ग्रेडी मेमोरिअल हॉस्पिटल'मध्ये न्यूरोसर्जरीचे 'असोशिएट चीफ' आहेत. शिवाय अटलांटामधील 'एमरी युनिव्हर्सिटी हॉस्पिटल'मध्ये ते साहाय्यक प्राध्यापक आहेत. 'टाइम' मासिकात ते स्तंभलेखन करतात. सीएनएन आणि सीबीएसवरील कार्यक्रमांतही त्यांचं मोठं योगदान असतं.

विविध वैज्ञानिक जर्नल्समधून त्यांचं साहित्य प्रकाशित झालं आहे. २००९ मध्ये त्यांना अमेरिकन मेडिकल असोसिएशनतर्फे 'हेल्थ कम्युनिकेशन अचिव्हमेंट ॲवॉर्ड' देण्यात आलं. २००६ मध्ये तर त्यांच्या आरोग्यविषयक रिपोर्ट्सना तीन पारितोषिकं मिळाली. याव्यतिरिक्त, त्यांना 'एमी'(Emmy), 'पीबडी' आणि 'द ड्युपॉन्ट' पारितोषिक मिळाली.

२००४ मध्ये ॲटलांटा प्रेस क्लबने डॉ. गुप्तांना 'जर्नालिस्ट ऑफ द इयर' म्हणून गौरवलं. 'द नॅशनल प्रेस फोटोग्राफर्स असोसिएशन'चं 'द ह्युमॅनिटेरिअन ॲवॉर्ड', 'द नॅशनल हेल्थकेअर कम्युनिकेटर्स'चं 'गोल्ड ॲवॉर्ड' आणि 'द इंटरनॅशनल हेल्थ ॲन्ड मेडिकल मीडिआ'चं 'फ्रेडी' (Freddie) नावाचं पारितोषिकही त्यांना मिळालं आहे. 'चेसिंग लाइफ' या त्यांच्या पहिल्या पुस्तकाला न्यू यॉर्क टाइम्सच्या 'सर्वाधिक खपाच्या पुस्तकां'च्या

यादीत स्थान मिळालं आहे. डॉ. गुप्ता, ‘द अमेरिकन असोसिएशन ऑफ न्यूरॉलॉजिकल सर्जन्स’, ‘काँग्रेस ऑफ न्यूरॉलॉजिकल सर्जन्स’, ‘द कौन्सिल ऑफ फॉरिन रिलेशन्स’ अशा अनेक संघटनांचे सदस्य आहेत. ते ‘द अमेरिकन बोर्ड ऑफ न्यूरोसर्जरी’चे नीतिज्ञ (diplomat) आहेत, ‘द अमेरिकन कॉलेज ऑफ सर्जरी’चे फेलो आहेत आणि प्रमाणित वैद्यकीय अन्वेषक (investigator) आहेत. डॉ. संजय गुप्ता ‘द लान्स आर्मस्ट्राँग लिव्हस्ट्राँग फाउंडेशन’चे बोर्ड सदस्य आहेत.




मूळ लेखक
**संजय गुप्ता, एमडी**

संशोधक
**कॅलिब हेलरमन**

अनुवाद
**गौरी गाडेकर**

# मृत्यूला चकविणारे प्रा. झेयाद बाराझांजी

## जीवन आणि मृत्यू यांच्यातील सीमारेषा

*मला माझ्या कार्यामधून अमरत्व मिळवायचं नाही. मला न मरून अमर व्हायचं आहे.*

**– वूडी ॲलन**

हृदयाची धडधड थांबते, तो अंत नसतो. खरंतर ती फक्त संकटाची नांदी असते. असं आढळून आलं आहे की, जीवन आणि मृत्यू हे फक्त काळ्या आणि पांढऱ्या रंगांचं चित्र नाही. त्या दोन्ही रंगांच्या मध्ये एक करडा रंगही असतो. एक पुसटसा तटस्थ प्रदेश. तिथे माणूस धड मेलेलाही नसतो की, धड जिवंतही नसतो. यावर ताबा मिळवून मृत्यूला चकवण्यासाठी, प्रथम आपल्याला ती प्रक्रिया समजून घेतली पाहिजे.

झेयाद बाराझांजींना आठवणारी सर्वांत शेवटची गोष्ट म्हणजे शांतता. त्याच्या तीस सेकंद आधी ते नेहमीसारखा दुपारचा व्यायाम करत होते. धापा टाकत ट्रेडमिलवर जॉगिंग करता-करता मान वळवून 'सीएनएन'वर निवडणुकीचे निकाल बघत होते. अचानक त्यांचं टीव्हीवरचं लक्ष उडालं आणि त्यांच्या पावलांचा दाणदाण आवाज, यंत्राची घरघर, नेहमीच्या गतीने धावायचा प्रयत्न करताना पडलेल्या ताणामुळे जोरजोरात होणारा श्वासाचा आवाज या गोष्टींनी त्यांचं लक्ष वेधून घेतलं. त्या मंगळवारी त्यांना धावत-धावत डोंगर चढत असल्यासारखं वाटू लागलं. म्हणून त्यांनी वीस मिनिटांतच जॉगिंग आटोपून मशीन बंद केलं. वाङ्मयाचे निवृत्त प्राध्यापक असलेले बाराझांजी ब्रॉंक्सच्या स्पॉयटन डायविल विभागातील त्यांच्या घराजवळच्या गजबजलेल्या जिममध्ये होते. आजूबाजूला इतरांची थट्टामस्करी चालली होती. वजनांचा खणखणाट ऐकू येत होता; पण तीस सेकंदातच सगळे आवाज बंद झाले. नीरव शांतता पसरली.

यानंतर काय झालं, ते त्यांना आठवत नाही. नंतर लोकांनी त्यांना सांगितलं, त्यामुळे त्यांना ते कळलं होतं. तेव्हा तिथे असणारी एक बाई तर जन्मात ही गोष्ट विसरणार नाही. आधीच्या मिनिटाला ती बाई व्यायाम करत होती आणि पुढच्याच मिनिटाला तिला डोळ्यांच्या कोपऱ्यातून अस्पष्ट दिसलं की, पांढरा बनियन आणि हेडबॅन्ड लावलेला सडपातळ वयस्क माणूस शेजारच्या ट्रेडमिलच्या तळाशी लोळागोळा होऊन पडला आहे. डझनभर लोकांनी त्यांना असं पडताना पाहिलं. दोघांनी आपल्या सेलफोनवरून मदतीसाठी फोन केला. ॲथलेटिक ट्रेनर आणि जिमचे व्यवस्थापक युआन एकेवारिया यांनी लगेचच भिंतीवरचा स्वयंचलित डिफिब्रिलेटर काढला आणि ते धावतच बाराझांजींच्या बाजूला गेले.

कोपराने गर्दीला बाजूला सारून एकेवारिया गुडघे टेकून बसले आणि त्यांनी डिफिब्रिलेटरची विद्युताग्रं (इलेक्ट्रोड्स) बाराझांजींच्या छातीला लावली. त्या उपकरणाचा सिग्नल मिळाल्यावर त्यांनी त्या बेशुद्ध माणसाच्या छातीवर शॉक दिला. विजेचे लागोपाठ दोन झटके – प्रत्येक झटका २०० जूलचा – दिल्यावर लोळागोळा झालेल्या त्या देहात हालचाल झाली. प्रत्येक झटका बाराझांजींच्या छातीवरच्या घर्मबिंदूंतून, छातीच्या हाडातून त्यांच्या निश्चल हृदयापर्यंत जात होता. त्या शॉकने हृदयाचं आकुंचन होत होतं. त्यापाठोपाठ अजून एक आकुंचन, मग आणखी एक. त्या ट्रेनरने श्वास रोखून धरला, तोच बाराझांजींच्या हृदयाचे ठोके आपणहून पडायला सुरुवात झाली. त्यांच्या हृदयाचं स्पंदन पुन्हा चालू झालं. जीवन-मृत्यूमधील सीमारेषा पुरेशी सरकली होती.

प्राध्यापक जरासे कण्हले. अजूनही ते बेसावध होते; पण त्यांच्या हृदयाने त्यांच्या त्रेसष्ट वर्षं वयाच्या धमन्यांमधून किंचितसा रक्तप्रवाह पाठवायला सुरुवात केली होती.

चार-एक मिनिटांतच आपत्कालीन वैद्यकीय तंत्रज्ञांचा गट हातात स्ट्रेचर घेऊन, बास्केटबॉल कोर्ट ओलांडून धावत-पळत आला. दोन मिनिटांतच श्वासाची नळी त्यांच्या घशात घालून, त्यांना स्ट्रेचरवर ठेवून ते लोक बाहेरच्या रस्त्याला लागले होते.

मृत्यूविषयी, मृत किंवा जिवंत अशा ठाम शब्दांत विचार करायची

आपल्याला सवय आहे. म्हणजे आपण या क्षणी आहोत आणि लगेच आपण गेलो. आपल्या कल्पनेतील मृत्यूचा क्षण असा असतो : खलनायक किंवा नायक किंवा सैनिक धापा टाकत अखेरचे शब्द बोलतो, हात पुढे पसरतो... शेवटी डोळे फिरवतो आणि आपल्याला कळतं की, सगळं संपलं आहे. अशीच एक कर्करोगाची रुग्ण. सभोवार तिचे कुटुंबीय बसले आहेत. तिच्या डोळ्यांआड ज्योत फडफडते आणि विझून जाते. हे सगळं आपण हजारो कथांमधून वाचलेलं आहे, सहस्त्रावधी चित्रपटांतून पाहिलेलं आहे, इआर (ER) या मालिकेच्या शंभर भागांमधून बघितलेलं आहे. धोक्याची घंटा वाजते. मॉनिटरवरील वर-खाली होणाऱ्या रेषा सपाट होतात. मृत्यूची वेळ : पहाटेचे २.१५.

जीवन निसटून जायला काही मिनिटांचा कालावधीही पुरेसा असतो. हृदयाचे ठोके थांबले की, हळूहळू रक्तप्रवाह थांबतो. मेंदू किंवा इतर अवयवांपर्यंत रक्त पोहोचू शकत नाही. दोन मिनिटांतच सगळं मंदावतं. गंमत म्हणजे आपल्या शरीराच्या आत चाललेल्या या प्रचंड उलथापालथीची आपल्याला जाणीवही नसते. रक्ताअभावी तडफडणारा सर्वांत पहिला अवयव म्हणजे मेंदू. सुदृढ अवस्थेत शरीरात घेतल्या जाणाऱ्या प्राणवायूपैकी वीस टक्के प्राणवायू एकटा मेंदू वापरतो. खरंतर त्याचं वस्तुमान अख्ख्या शरीराच्या फक्त दोन टक्के एवढंच असतं.

**प्राणवायूअभावी अवघ्या दहा सेकंदांतच मेंदूचं कार्य थंडावतं. प्राणवायूच्या अभावामुळे किंवा मेंदूकडून इशारे न मिळाल्याने इतर अवयवही ढासळू लागतात.** श्वासपटलाचे स्नायू आकुंचन-प्रसरण पावायचे बंद झाल्यामुळे शरीरात हवा येत नाही. मूत्रपिंडांचं रक्तशुद्धीकरणाचं कार्य थांबतं. त्याच वेळी शरीरातील पेशींमध्ये रासायनिक प्रक्रियांची गुंतागुंतीची शृंखला सुरू होते आणि त्यात त्या पेशी बळी पडतात.

मरणाची प्रक्रिया ही अशी आहे. मोटार अपघात, रक्तवाहिनीतील अडथळा वा शरीरात एखाद्या जागी आलेली गाठ (ट्यूमर) अशा कोणत्याही कारणाने मृत्यू आला, तरी हृदयाची धडधड थांबली की, आयुष्य संपलं अशीच सर्वसाधारण समजूत असते. अशा प्रकारचे जीवनाचे अंत मी

५वी आवृत्ती

नानी पालखीवाला

# वुई, दि नेशन

## वाया गेलेली वर्षे

अनुवाद:
वि.स.वाळिंबे




**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

'निद्रिस्त महाशक्ती' असे ली कुआन यू यांनी भारताचे वर्णन केले होते. समाजवादाची नशा ओसरल्यामुळे, सुदैवाने भारत दीर्घ निद्रेतून हळूहळू जागा होत आहे. त्यामुळे लवकरच तो आंतरराष्ट्रीय पटावर आपले न्याय्य स्थान संपादन करील, असा विश्वास वाटतो. भारताचे दुखणे काय आहे, त्याच्यापाशी केवढी उदंड क्षमता आहे, त्याला केवढा वैभवशली वारसा लाभलेला आहे, इतिहास आणि निसर्ग या दोन्ही बाबतींत तो किती समृद्ध आहे, याचे अत्यंत मार्मिक विवेचन या पुस्तकात करण्यात आले आहे. भारताच्या उदात्त राज्यघटनेपासून, या देशाला वेळोवेळी भेडसावत गेलेल्या मानवनिर्मित समस्यांपर्यंत अनेक विषयांचा वेध लेखकाने आपल्या अजोड बुद्धिमत्तेच्या बळावर अचूक रीतीने घेतला आहे. पालखीवाला यांनी केवळ समस्यांचेच सूचन केले आहे असे नाही; आपल्या वैशिष्ट्यपूर्ण व्यासंगाच्या आणि विविध क्षेत्रांतील सखोल अनुभवाच्या आधारे त्यांच्या सोडवणुकीची दिशाही सांगितली आहे.

जो देश इतिहास विसरतो, त्याच्या नशिबी त्या इतिहासाची पुनरावृत्ती अनुभवण्याची वेळ येते, असे सर्वच विचारवंत मानतात.त्या दृष्टीनेच पालखीवाला यांनी गेल्या दहा वर्षांच्या वाटचालीसंबंधी या ग्रंथात मागोवा घेतला आहे.

थोडक्यात सांगायचे, तर सर्व व्यक्तींना सर्व प्रसंगी उपयुक्त ठरावे, असे हे पुस्तक आहे.

आजपर्यंत इतक्यांदा पाहिलेले आहेत की, त्यांची मोजदाद करणंही मी सोडून दिलेलं आहे.

मी पाहिलेला पहिला मृत्यू मला अजूनही आठवतो. तेव्हा मी मिशिगन विद्यापीठात मेडिकलच्या तिसऱ्या वर्षाला होतो. तो रुग्ण जवळजवळ माझ्याच वयाचा होता. इमर्जन्सी रेडिओवर पुकारा होत होता, 'तेवीस वर्षांचा बेलगाम ड्रायव्हर मोटारअपघातात जखमी. मोटारीची पुढची काच (विन्डशिल्ड) फुटलेली आणि स्टिअरिंग व्हील वाकलेले आढळले.' हा सर्व तपशील महत्त्वाचा आहे, हे त्या वेळीही माझ्या लक्षात आलं. छातीने स्टिअरिंग व्हील वाकवणं किंवा डोक्याने पुढची काच फोडणं यासाठी विलक्षण जोर लागतो. मला आठवतं आहे की, ट्रॉमा सर्जन्स, न्यूरोसर्जन्स आणि ऑर्थोपेडिक सर्जन्स सगळे धावत आले. या सर्वांनी त्याला ताब्यात घेतला. त्याचं रक्त बदलणं, रक्तस्राव थांबवणं, त्याच्या मेंदूतील दाब कमी करणं, यासाठी ते प्रयत्नांची शिकस्त करत होते. अगदी झंझावातासारखी धडपड चालली होती त्यांची. आणि... अचानक त्याचं हृदय थांबलं ...आणि यांचे प्रयत्नही. तो अंत होता, हे सर्वांनाच ठाऊक होतं.

शेवटी मेडिकल कॉलेजात आणि नंतरही प्रशिक्षणभर आम्हाला हेच तर शिकवलं होतं. पण ते खरोखरच तसं नसेल तर? त्या तेवीस वर्षांच्या तरुणाला आणि त्याच्यासारख्या लक्षावधी लोकांना जीवन-मरणामधील रेषा सरकवण्यासाठी आणखी थोडा वेळ देता आला असता तर? त्या तरुणाचा मृत्यू पाहिल्यापासून मी नेहमी हाच विचार करत आलो आहे : ती रेषा सरकवता येईल का?

झेयाद बाराझांजींनी आपण मृत्यूला कसं चकवलं, त्याची कथा मला आपुलकीने आणि अतिशय उत्साहाने सांगितली. आम्ही ब्राँक्स येथील त्यांच्या घरी होतो. आजूबाजूला त्यांचे मित्र आणि कुटुंबीय बसले होते.

बाराझांजी हे अनुवादक आणि कोलंबियातील निवृत्त प्राध्यापक होते. १९७०मध्ये ते सिरिया सोडून इथे येऊन स्थायिक झाले होते. त्यांचं दोन बेडरूम्सचं घर कलाकुसरींच्या वस्तू आणि स्मृतिचिन्हांनी भरलेलं होतं. न्यू यॉर्क आणि मध्यपूर्वेच्या दरम्यान आयुष्यभर केलेल्या प्रवासाची ती साक्ष होती. वातावरणात स्वादिष्ट वास दरवळत होता. त्यांची पत्नी

राउआ सिरियातील खास पक्वान्नांच्या मेजवानीची तयारी करण्यात गुंतली होती. स्वयंपाक तयार होत आला होता. मी वाकून स्वयंपाकघरातील गजबजीचा, ग्लासांच्या किणकिणण्यांचा कानोसा घेतला. अधूनमधून आमच्या बोलण्यात खंड पडत होता. बाराझांजी मधे-मधे दार उघडायला उठत होते. आलेल्या मित्रांच्या पाठीवर थापा मारत होते, त्यांचे कोट हँगरला अडकवत होते.

मूर्तिमंत चैतन्य असलेला हा माणूस काही काळापूर्वी मृत होता, यावर विश्वास ठेवणं कठीण होतं. पण खरोखरच तसं घडलं होतं. त्यांचं हृदय रक्ताचं अभिसरण करू शकत नव्हतं. त्यांचा मेंदू सिग्नल पाठवत नव्हता. ते कसलाही विचार करू शकत नव्हते. नि:संशय हा मृत्यू आहे. कदाचित आपण त्याविषयी जो विचार करतो, तसा हा नसावा.

तत्काळ होणाऱ्या मृत्यूविषयी बरंच काही बोललं गेलं आहे : ''सॉरी, ती लगेचच मरण पावली.'' वगैरे... पण प्रत्यक्षात तत्काळ मृत्यू असं काही नसतंच. एक डॉक्टर या नात्याने मी खात्रीपूर्वक सांगतो की, हृदयाची धडधड थांबणं, हा अंत नसतो. मृत्यू ही एकच घटना नसते, तर ती एक प्रक्रिया असते. या प्रक्रियेत खंड पाडता येतो. एवढंच नव्हे, तर ती प्रक्रिया उलट फिरवता येऊ शकते. आणि चित्तथरारक गोष्ट म्हणजे या प्रक्रियेच्या दरम्यान कोणत्याही क्षणी, अटळ वाटणारा हा गतिक्रम आपण बदलू शकतो. नेमक्या याच गोष्टींचा शोध आपण या पुस्तकात घेणार आहोत – मृत्यूला चकवण्याची शक्यता.

'बॅलीज टोटल फिटनेस'समोरच्या फुटपाथच्या बाजूने ॲम्ब्युलन्स कर्कश सायरन देत निघाली, तेव्हा बाराझांजी 'करड्या भागा'त होते. ते मरण पावले नव्हते; पण खऱ्या अर्थाने जिवंतही नव्हते. तोपर्यंत रक्तप्रवाहाअभावी गुदमरून त्यांच्या हृदयातील लक्षावधी पेशी मरण पावल्या होत्या. या इजेची परिणती, वाळवीने पोखरल्यामुळे कोसळणाऱ्या झाडासारखी होणार की काय, याचं अनुमान त्या वेळी करता येत नव्हतं. त्रेसष्ट वर्षांहून जास्त काळ सततच्या, प्राणवायूच्या आहारावर पोसलेल्या पेशींपैकी नक्की किती टक्के पेशी, सुरुवातीच्या काही मिनिटांच्या महत्त्वाच्या काळात उपासमारीने तडफडल्या तेही एवढ्यातच कळू

शकणार नव्हतं. मृत्यूच्या दिशेने चाललेली वाटचाल उलट्या बाजूने फिरवता येईल का, हेही कळायला मार्ग नव्हता.

बाराझांजींच्या जागी तुम्ही, मी किंवा आपली आई वा वडीलही असू शकले असते. एका दृष्टीने पाहिलं तर बाराझांजींच्या बाबतीत जे घडलं, ते विलक्षण होतं. पण दुसऱ्या बाजूने पाहिलं, तर आपणा सर्वांच्या बाबतीत शेवटी हेच घडतं. आयुष्य ही ठरावीक मुदत असणारी अवस्था आहे, काहीही चिरंतन नसतं आणि आपल्या जन्माबरोबरच आपल्याला अंताकडे नेणारी दीर्घ वाटचाल सुरू होते, असं म्हटलं जातं. मला वाटतं, प्रत्येकाला आयुष्यात कधी ना कधी हा प्रश्न पडतच असेल, ''हे सगळं असंच घडायला हवं का?'' आपण जेव्हा बाराझांजींच्या कहाणीचा अभ्यास करतो, तेव्हा आपण तुमच्या-माझ्या मरणाला चकवण्याची शक्यता पारखत असतो.

तुमच्या हातात आहे, खळबळजनक आणि झपाट्याने बदलत चाललेल्या विज्ञानाच्या क्षेत्राचा शोध घेणारं, रोमांचक वैद्यकीय कहाण्यांचं पुस्तक. याच्या पानापानांतून तुम्हाला जाणवेल जीवन आणि मृत्यूमधील बारीकशी सीमारेषा आणि भेटतील सीमारेषेच्या अलीकडे रोग्यांना थोपवून धरण्यासाठी जिवाचं रान करणारे डॉक्टर. या सीमारेषेवर 'तळ्यात-मळ्यात' करून आलेल्या लोकांनी पाहिलेले-ऐकलेले त्यांचे अनुभव वाचून तुम्हाला त्या सीमेविषयी अधिक माहिती मिळेल. आश्चर्यकारक आव्हानं स्वीकारणाऱ्या शास्त्रज्ञांशीही आम्ही तुमचा परिचय करून देऊ. आपल्याला अजून सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळाली नसली, तरी कधी ना कधी ती नक्कीच मिळतील, असा विश्वास बाळगणारे हे निग्रही, आद्य संशोधक खरोखरच आशावादी आहेत.

अगदी गर्भाशयापासून ते पार मृत्युशय्येपर्यंत, जीवन-मरणाविषयीच्या आपल्या समजाला छेद देणारे आधुनिक विज्ञानाचे असंख्य मार्ग या पुस्तकात आढळतील. तुमच्या लक्षात येईल की, आरंभरेषा आणि समाप्तीरेषा या काळ्या दगडावरील रेषा नसतात. त्या वाळूवर काढलेल्या रेषा असतात. वैद्यकीय ज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रत्येक नव्या लाटेबरोबर त्या सरकत जातात. मृत्यूला जाणून घ्यायच्या आणि त्याला पुढे ढकलायचा मार्ग शोधण्याच्या या प्रवासात आपण जीवन आणि

त्यापलीकडे जे काही आहे ते, यांच्यामधल्या करड्या, तटस्थ प्रदेशाचा थांग लावण्याचा प्रयत्न करणार आहोत.

*बाराझांजींचं काय झालं, ते सांगण्यापूर्वी आम्ही तुमचा परिचय दुसऱ्या एका शोधकाशी करून देणार आहोत. ती त्या 'करड्या' तटस्थ प्रदेशात गेली होती आणि ती कथा सांगायला ती जिवंत राहिली. त्या दूरवरच्या पर्वतउतारावर ती अपघातानेच पोहोचली. ते एक वेगळंच जग होतं. कडाक्याची थंडी आणि जवळजवळ अंधार अशा वातावरणातच काम करणं, खेळणं हे तिकडच्या लोकांच्या अंगवळणी पडलेलं असतं. तो डोंगरउतार हा आपल्या या असामान्य सफरीचा पहिला थांबा आहे.*

## हृदय थांबण्याचा क्षण

*तो वर गेला आणि त्या मुलावर निजला. त्याच्या*
*तोंडावर त्याने स्वत:चं तोंड ठेवलं. त्याच्या डोळ्यांवर*
*स्वत:चे डोळे. त्याच्या हातावर स्वत:चे हात ठेवले.*
*त्याच्या शरीरावर तो स्वत: पसरला आणि त्या*
मुलाचे शरीर हळूहळू गरम झाले.

- २ किंग्ज ४:३४ केजेव्ही

माइक मर्ट्झ, ॲरिझोनामधील ग्लेंडेल येथील एका शाळेचा बस ड्रायव्हर. मुलांना घरी सोडून तासभर होऊन गेला होता. आता तो कारने घरी चालला होता. कामावरून तडक घरी न जाता त्याला तासभर उशीर का झाला होता, ते माझ्याशी बोलताना त्याला आठवत नव्हतं. एकोणसाठ वर्षांच्या नीटनेटक्या मर्ट्झला आठवड्यातील बरेच दिवस दोन-तीन मैल धावायला आवडायचं. त्यामुळे तो जॉगिंगला गेला असावा असं त्याला वाटतं किंवा त्याच्या नेहमीच्या वाटेवरील पेट्रोलपंपापेक्षा इतर ठिकाणी स्वस्त दराने पेट्रोल मिळतं का, ते बघायला गेला असावा. किंवा त्याच्या 'सॅटर्न'मधून जाताना रस्त्यावर नव्याने घातलेले उंचाडे स्पीडब्रेकर्स चुकवण्यासाठी तो वेगळ्या रस्त्याने गेला असण्याची शक्यता आहे. कारण काही का असेना, तो कोणत्यातरी भलत्याच रस्त्याने जात का असेना, एक गोष्ट खरी की मर्ट्झ त्याच्या हाउसिंग कॉम्प्लेक्सच्या

नेहमीच्या प्रवेशद्वाराने न जाता कॉलनीच्या मागच्या खासगी रस्त्याने गेला. बहुधा या बदलामुळेच त्याचे प्राण वाचले असावेत.

कॉरी ॲश हा युपीएस ड्रायव्हर त्या बुधवारी दुपारी माल पोहोचवत होता. अचानक त्याला इंजिनाचा भयानक आवाज ऐकू आला. तो आपल्याच गाडीचा असावा, असं त्याला वाटलं. म्हणून तो पटकन उडी मारून बाहेर आला. तेव्हा त्याच्या लक्षात आलं की, तो रस्त्याच्या पलीकडच्या बाजूला असलेल्या 'सॅटर्न'मधून येत होता.


अपघाताचं भयंकर दृश्य होतं ते. त्या छोट्याशा रुपेरी कारने ताडाच्या झाडाला धडक दिली होती. इंजीन कमाल गतीने चालत होतं. ताडाचं झाड आणि त्यापासून काही फूट अंतरावर असलेली, गिलावा दिलेली भिंत या दोघांमध्ये ती कार दामटून बसली होती. केवळ त्यामुळेच ती त्या जागी थांबून राहिली होती. ॲश धावतपळत तिकडे गेला आणि पाहतो तर काय? ड्रायव्हरचे डोळे बंद होते. तो बेशुद्ध असावा असं वाटत होतं. ड्रायव्हरचा पाय ॲक्सलरेटरकडे पाचरासारखा अडकून बसला होता. अडकलेली कार बाहेर निघाली असती तर ॲश चिरडला जाण्याची शक्यता होती. पण तिकडे दुर्लक्ष करून कोसळलेल्या देहाला ओलांडून तो पलीकडे गेला आणि त्याने इग्निशन बंद केलं. त्याने मर्ट्झला फरफटत ओढून कारच्या बाहेर काढलं आणि जमिनीवर झोपवलं. ९११ला फोन करून त्याने सीपीआरला सुरुवात केली. दोन महिन्यांपूर्वीच 'एअर नॅशनल गार्ड' प्रशिक्षण कार्यक्रमात तो सीपीआर शिकला होता.

मैलभराच्या अंतरावर असलेल्या ग्लेंडेल अग्निशामक केंद्र १५४ येथून वेगाने येणाऱ्या रुग्णवाहिनीचा सायरन कानी पडला तेव्हा तर ॲशने मर्ट्झच्या छातीवर आणखी जोराने पंपिंग करायला सुरुवात केली. हृदयविकाराचा झटका आल्यावर एखादा बघ्या मदतीला धावून आला तर तो रुग्ण बचावण्याची शक्यता कित्येक पटीने वाढते, असं या संदर्भात करण्यात आलेल्या अभ्यासात आढळून आलं आहे. तुम्ही खूप काही करत आहात असं बघताना वाटलं नाही तरी फक्त हृदयावर दाब देणं आणि रक्ताभिसरण चालू ठेवणं यामुळे अतिशय फरक पडतो. मर्ट्झला हाच फायदा मिळाला; पण त्याचं नशीब जोरावर होतं म्हणून तो

**७वी आवृत्ती**

# सांजवात

## वि.स.खांडेकर




**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

''तुमची-आमची श्रद्धा आणि गांधींची श्रद्धा यात फार अंतर आहे, वसंत. गांधींची अहिंसेवरील श्रद्धा त्यांच्या आत्मिक शक्तीतून, तत्त्वाकरिता प्राणांचा होम करण्याच्या त्यांच्या तयारीतून निर्माण झाली आहे.
तुमच्या श्रद्धेचा जन्म दुबळेपणाच्या पोटी झाला होता. बंड उभारून ब्रिटिश सत्ता नेस्तनाबूत करण्याची शक्ती तुमच्यात नव्हती म्हणून गांधींच्या अहिंसेवर तुम्ही डोळे मिटून विश्वास ठेवलात. पोटातल्या पाण्याला धक्का न लागता क्रांती हवी होती तुम्हाला!''

ग्लेंडेलमध्येच कोसळला. आपत्कालीन शुश्रूषेत जे क्रांतिकारी बदल घडत आहेत, त्यात ग्लेंडेलमधील 'पॅरॅमेडिक्स' (वैद्यकीय काम करण्याचं प्रशिक्षण घेतलेले पण डॉक्टरीची पदवी नसलेले) आघाडीवर आहेत. वैद्यकीय संस्थांच्या कलाच्या विरोधात जाऊन अगदी साध्या-साध्या गोष्टींमुळेही, हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णाची वाचण्याची शक्यता कशी वाढते, हे त्यांनी शोधून काढलं.

कर्कश आवाज करत आगीचा बंब थांबला. आणि त्यातून रूबिन फ्लॉरेझ या धष्टपुष्ट बंबवाल्याने फुटपाथवर उडी मारली. त्याच्या बरोबरीचे बंबवाले भराभर खाली उतरत असतानाच फ्लॉरेझने तातडीने आणि तालावर मर्ट्झच्या छातीवर ठोसे मारायला सुरुवात केली. दोन मिनिटांत दोनशे वेळा दाब पडेल, याची तो काळजी घेत होता. तेवढ्यात मेडिकलचा एक विद्यार्थी आला. त्याने डिफिब्रिलेटरच्या पॅडलने मर्ट्झला विजेचे झटके दिले.

मग पुन्हा दोनशे वेळा दाब, त्यानंतर विजेचा झटका, पुन्हा दोनशेवेळा दाब, पुन्हा झटका. शेवटी ६०० वेळा ठोसे आणि डिफिब्रिलेटरने तीनदा झटके दिल्यानंतर नाडीचे अस्पष्टसे ठोके पडायला सुरुवात झाली. मर्ट्झ मृत्यूच्या दारातून परत आला. तोंडाने कृत्रिम श्वासोच्छ्वास एकदाही देण्यात आला नव्हता आणि माइक मर्ट्झला एकदाही श्वास मिळाला नव्हता. आश्चर्य म्हणजे तो वाचला त्याचं *खरं कारण* तेच असावं.

प्रत्यक्षात, रुग्णालयाबाहेर हृदयविकाराचा झटका आला तर तो रुग्ण क्वचितच वाचतो! कालपरवापर्यंत देशातील इतर भागांप्रमाणेच ॲरिझोनामधील, हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांचं दीर्घकालीन हानी न होता वाचण्याचं प्रमाण फक्त दोन टक्के होतं. पण २००५पासून ॲरिझोनाच्या आसपासच्या शहरातील लोकांनी काहीतरी नवीन करायला सुरुवात केली. अमेरिकन मेडिकल असोसिएशनची मार्गदर्शक तत्त्वं, तसंच मोठमोठी वैद्यकीय महाविद्यालयं व रुग्णालयं यात जे शिकवलं जातं, त्याच्या हे विरुद्ध होतं. १९७० सालापासून प्रत्येक वायएमसीए, अग्निशामक दल, शाळा, चर्च वगैरे ठिकाणी शिकवल्या जाणाऱ्या सीपीआरसारखी ही पद्धत नव्हती. थोडक्यात म्हणजे हा मूलगामी प्रयोग होता.

या प्रयोगाचा जन्म दोन वेगवेगळ्या विचारधारांमधून झाला : सीपीआरच्या तंत्रात फेरफार करण्याच्या उद्देशाने केलेले जनावरांवरील संशोधन आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने अधिक लोकांना सीपीआरचं प्रशिक्षण देण्याचा प्रयत्न. रस्त्यावरून चालत असताना एखाद्याचं हृदय बंद पडलं तर त्याचा जीव वाचवणारी सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सीपीआरचं तंत्र अवगत असलेला एवढंच नव्हे तर मदत करायला तयार असलेला बघ्या, दुर्दैवाने अशी मदत मिळणं दुर्लभ झालं आहे. प्रसिद्ध झालेल्या संशोधनानुसार बघ्यांनी सीपीआर देण्याचं प्रमाण फक्त २० टक्के आहे. खोलात शिरल्यावर लक्षात येतं की, या आकडेवारीचा आणि मदत करायच्या इच्छेअनिच्छेचा काही संबंध नाही. खरंतर, आतापर्यंत या संदर्भात झालेल्या प्रत्येक पाहणीत आढळून आलं आहे की, दुसऱ्याच्या तोंडावर आपलं तोंड ठेवायची लोकांना भीती वाटते - न जाणो, मरणाच्या दारात पडलेल्या या व्यक्तीच्या आजाराचा संसर्ग आपल्यालाही व्हायचा.

आता या अनिच्छेवर मात करता येते. सिॲटलमध्ये १९७०पासून मोठ्या प्रमाणात प्रशिक्षण देण्यात आलं. लोकांना याबाबत माहिती देण्यासाठी अनेक मोहिमा राबवण्यात आल्या. तिथे बघ्यांनी सीपीआरची मदत देण्याचं प्रमाण ५० टक्क्यांच्या जवळपास आहे. या शहरातील, हृदयविकाराच्या झटक्यानंतर बचावण्याचं प्रमाण जास्त आहे, त्याचं श्रेय याच गोष्टीला जातं. अलीकडच्या काही वर्षांत, जास्तीत जास्त लोकांना, मदत करायला उद्युक्त करणं हे 'अमेरिकन हार्ट असोसिएशन'चं उद्दिष्ट बनलं आहे. पण कसं? तोंडावर तोंड ठेवून श्वास द्यायचा नाही. बस एवढंच. पण खरंच ते पुरेसं आहे?

ट्यूसॉं येथील सर्व्हर हार्ट सेंटरमधील हृदयरोगतज्ज्ञ डॉ. गॉर्डन एवी आणि त्यांचे सहकारी वीस वर्षांहून अधिक काळ सीपीआरवर प्रयोग करत होते. आणीबाणीच्या प्रसंगी रुग्णाला नवजीवन देण्यात कृत्रिम श्वासोच्छ्वासाची भूमिका नक्की काय आहे, ते शोधण्यावर त्यांचा भर होता. आणि दशकाहून अधिक काळ 'कृत्रिम श्वासोच्छ्वासाची अजिबात आवश्यकता नाही', असा वाद घालून एवींनी अधिकारी व्यक्तींची त्रेधातिरपीट उडवली होती.


एवी भांडखोर आणि दुराग्रही आहेत. ते स्वत:च्या मतावर ठाम असतात. दुसऱ्या शब्दांत सांगायचं झालं तर ते शैक्षणिक वैद्यकशास्त्रातील बलशाली व्यक्तिमत्त्व आहे. व्यावसायिकदृष्ट्याही ते निश्चितच बलशाली आहेत. अर्थात त्यांचं ऑफिस झगमगाटापासून हजारो कोस दूर आहे. कॅन्सास विद्यापीठातून पदवी मिळवल्यानंतर त्यांनी जॉर्जटाउन येथे वैद्यकीय रेसिडेन्सी पूर्ण केली. १९७१मध्ये वॉशिंग्टन, डी.सी.मधील प्रशिक्षण पूर्ण केल्यावर, पश्चिमेकडील ट्यूसाँ येथील ॲरिझोना विद्यापीठाचं नवीन अध्यापन रुग्णालय सुरू होत होतं, त्याच्या उभारणीच्या कामात मदत करण्यासाठी ते तिथे गेले. त्यांनी १९९०पासून हृदयशास्त्र विभाग (कार्डिऑलॉजी डिपार्टमेंट) चालवला आहे. अख्ख्या अमेरिकेत हृदयशास्त्र विभागाचा प्रमुख म्हणून त्यांचीच कारकीर्द सर्वांत मोठी आहे.

लोकांना सीपीआरचं अचूक मार्गदर्शन मिळावं म्हणून एवींनी सीपीआरच्या संशोधनाला हात घातला. कित्येक वर्षं चालू असलेल्या पाहणीवरून दिसून आलं आहे की, सोप्या पद्धतीचं सीपीआर करण्यासाठी – उदाहरणार्थ तोंडावर तोंड ठेवून श्वासोच्छ्वास देण्याचा भाग सोडून फक्त छातीवर दाब देणं – लोक एका पायावर तयार असतात. एवींच्या दृष्टीने मार्गदर्शक तत्त्वांमध्ये बदल करण्यासाठी हे कारण पुरेसं होतं; पण बदललेलं तंत्र खरोखरच परिणामकारक होईल का याची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी पाहण्यांतून मिळालेल्या माहितीचा बारकाईने अभ्यास केला, तेव्हा एक विलक्षण गोष्ट त्यांच्या लक्षात आली आणि त्यांना आश्चर्याचा धक्का बसला. फक्त छातीवर दाब दिलेल्या लोकांमधील हृदयविकाराच्या झटक्यानंतर बचावण्याचं प्रमाण हे एएचएची मान्यता मिळालेल्या पूर्ण सीपीआर केल्या गेलेल्या रुग्णांइतकंच नव्हे, तर त्यांच्यापेक्षाही जास्त होतं. सार्वजनिक आरोग्य मोहिमेच्या खात्यावर, केवळ अपघातानेच, हा शोध जमा झाला.

एवींच्या सीपीआरचा सिद्धान्त समजण्यासाठी हृदयविकाराच्या झटक्याचे तीन टप्पे समजून घेतले पाहिजेत. पेनसिल्व्हेनिया विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर रिससिटेशन सायन्स'चे डॉ. लान्स बेकर हे आमचे स्नेही आणि जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठाचे मायरन वायझ्फेल्ड यांनी हे तीन टप्प्यांचं मॉडेल विकसित केलं आहे. हे तीन वेगवगळे टप्पे आहेत – विद्युत,

३ री आवृत्ती

# अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम




**मूळ गुजराथी लेखक:-** दिनकर जोषी

**अनुवाद :-** सुषमा शाळिग्राम

**किंमत :१४०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

रामकथेच्या नावाने आजमितीला वेगवेगळ्या भाषांत, वेगवेगळ्या प्रदेशांत आणि वेगवेगळ्या धर्मांत मिळून सुमारे तीनेकशे रामायणे उपलब्ध आहेत, असा अंदाज आहे. सोळाव्या वर्षी रामाला वैराग्य येते, राम गृहत्याग करतो, वनवासी होतो आणि नंतर कुलगुरू वसिष्ठ त्याची समजूत घालून, त्याला उपदेश करून जीवनाचा अर्थ समजावून देतात अशी कथा आपल्याकडे प्रसिद्ध म्हणता येईल अशा योगवसिष्ठ रामायणात आहे. कृष्णाच्या रासलीलेने अत्यंत भारावून गेलेल्या लेखणीबहाद्दरांनी रासलीला करणारा रामही रंगवायला कमी केलेले नाही. रामायणाच्या नावाखाली हे सगळे चालत आले आहे. पुढे जाता, ललित साहित्य म्हटले जातील असे अनेक असामान्य काव्यात्मक ग्रंथही लिहिले गेले आहेत. भवभूती आणि कालिदासही त्यातच आले.

'समग्र रामकथा हीच मुळात निव्वळ पुराणकथा आहे, यात सत्याचा लवलेश नाही, असा कोणी राम कधी झालाच नव्हता आणि अयोध्या म्हणजे उत्तर प्रदेशातील गाव नाहीच,जावा बेटावरचे जोग्या नावाचे ते एक नगर आहे, थायलंडमधील अयुथ्या (अयोध्या) नावाचे गाव हीच रामजन्मभूमी आहे...' असली विधाने 'पुराव्यांनिशी' करणारेही कमी नाहीत. रामकथा तपासून, पडताळून पाहणे हा प्रस्तुत पुस्तकाचा उद्देश नाहीच.

अभिसरणाचा आणि चयापचयाचा. त्यांपैकी पहिला टप्पा जवळपास चार मिनिटांचा असतो. या वेळात हृदयाचं स्पंदन त्याच्या स्वत:च्या विद्युत्शक्तीच्या जोरावर चालू असतं. पण रक्ताचं पंपिंग होत असतानाची तालबद्धता मात्र निर्माण होऊ शकत नाही. त्यानंतर येणारा अभिसरणाचा टप्पा, झटक्यानंतर जवळजवळ चौथ्या मिनिटापासून ते दहाव्या मिनिटापर्यंत असतो. रक्तात जो काही प्राणवायू होता, तो आतापर्यंत वापरून संपलेला असतो. प्राणवायूच्या अभावी हृदय विद्युत्शक्तीची निर्मिती करू शकत नाही. प्राणवायूअभावी पेशी साठवून ठेवलेल्या शक्तीकडे वळतात. त्यामुळे शरीरभर धोकादायक रासायनिक प्रक्रियांना सुरुवात होते. ठरावीक कालानंतर म्हणजे हृदयविकाराच्या झटक्यानंतर साधारण दहा मिनिटांनी – मध्ये काही हस्तक्षेप झाला नाही असं गृहीत धरल्यास – पेशींना मारणाऱ्या रासायनिक प्रक्रियांचं उधाण शिगेला पोहोचतं. ही मृत्यूच्या वाटेवरील तिसरी पायरी आहे. हा टप्पा चयापचयाशी संबंधित असून या काळात पेशींच्या खऱ्याखुऱ्या मृत्यूला सुरुवात होते.

यादरम्यान केलेल्या हस्तक्षेपाचा उपयोग का होतो, हे या नमुन्यावरून स्पष्ट होतं. विद्युत्टप्प्यात डिफिब्रिलेशन खूपच परिणामकारक ठरतं; पण त्यानंतर मात्र त्याचा विशेष उपयोग होत नाही. कारण डिफिब्रिलेशनमुळे हृदयाला त्याची गेलेली विद्युत्शक्ती मिळत नाही. ते फक्त त्याची तालबद्धता पुन्हा व्यवस्थित करून देतं. संधी मिळताच स्पंदनं पुन्हा सुरू होण्यासाठी हृदयाजवळ पुरेशी शक्ती असेल, तरच त्याचा उपयोग होतो. हे तसं कारच्या बॅटरीसारखं आहे. उसळी घेण्यासाठी आवश्यक ते इंधन त्यात असावं लागतं. नाहीतर आपण कितीही प्रयत्न केला, तरी कामातून पार गेलेली बॅटरी आपण पुन्हा चालू करू शकत नाही.

जेव्हा आपण सीपीआर देतो, तेव्हा आपण हृदयाच्या ऊतीकडे प्राणवायूमिश्रित रक्त पाठवत असतो. हे, डिफिब्रिलेटरची विद्युत्ज्योत प्रज्वलित करण्यासारखं आहे. परंपरागत सीपीआरमध्ये बघे आणि पॅरॅमेडिक्स यांना दिलेल्या प्रशिक्षणानुसार ते प्रथम रुग्णाचा श्वसनाचा मार्ग मोकळा आहे की नाही, ते तपासतात आणि नंतर आळीपाळीने छातीवर दाब आणि तोंडाला-तोंड लावून कृत्रिम श्वासोच्छ्वास असं देतात. याशिवाय पॅरॅमेडिक्सना श्वसनासाठी नळी आत घालण्याचंही

प्रशिक्षण दिलेलं असतं. कृत्रिम श्वासोच्छ्वास हा रक्तात प्राणवायू मिसळण्यासाठी असतो, तर छातीवरचा दाब, त्या प्राणवायूचं अभिसरण व्हावं म्हणून असतो; पण यातले थोडे परिश्रम अनावश्यक असतात, असं एवींच्या लक्षात आलं. तीन टप्प्यांच्या मॉडेलवरून आढळून येतं की, श्वसन थांबल्यावरही पुढची कित्येक मिनिटं रक्तप्रवाहात बऱ्याच प्रमाणात प्राणवायू असतो. मानवी शरीरात, आपल्याला जाणवतो त्यापेक्षा कितीतरी जास्त प्रमाणात प्राणवायूचा साठा असतो, आणि आपलं श्वसन थांबल्यानंतरही तो प्राणवायू आपल्या शरीरात टिकून असतो. इथेच नेहमीच्या सीपीआरला उलटंपालटं करणारा महत्त्वाचा धडा आपल्याला मिळतो : कदाचित कृत्रिम श्वासोच्छ्वासाची आवश्यकताही नसेल.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्या प्राणवायूचं रक्तातून अभिसरण होणं आवश्यक आहे. जर हृदय बंद पडलं असेल, तर कोणीतरी मुद्दामहून छातीवर पंप केलं तरच प्राणवायूचं अभिसरण होईल. जेव्हा कृत्रिम श्वासोच्छ्वास दिला जातो, तेव्हा छातीवर दाब देण्यात खंड पडतो. तीच गोष्ट श्वसनाची नळी आत घालण्याची. ती प्रक्रिया थोडी गैरसोयीची असते आणि त्यात २० ते ३० सेकंद जातात. शॉकच्या बाबतीतही तसंच घडतं. शॉक दिल्यानंतर थोडा वेळ थांबून हृदयाचं स्पंदन तालावर होत आहे का, ते मोजून पाहावं लागतं. कारण त्यावरच शॉकचा उपयोग झाला की नाही, ते ठरतं. उपयोग झाला नसेल तर पुन्हा शॉक द्यावा लागतो. एवींच्या मते, या सगळ्या अतिरिक्त पायऱ्यांमध्ये वेळ वाया जातो. या मौल्यवान वेळापायी कितीतरी प्राणांची किंमत मोजावी लागली आहे.

खरंतर हृदयविकाराच्या झटक्यानंतर वेळ ही किती अमूल्य गोष्ट आहे, हे समजायला तीन टप्प्यांच्या मॉडेलची गरज नाही. प्रत्येक सेकंद निर्णायक असतो. **अमेरिकन हार्ट असोसिएशननुसार सीपीआर किंवा डिफिब्रिलेशनचा प्रयत्न न होता गेलेल्या प्रत्येक मिनिटागणिक रुग्णाचा जीव वाचण्याची शक्यता ७ ते १० टक्क्यांनी कमी होते. दहा मिनिटं गेली तर रुग्ण वाचण्याची आशा नसते. विलंब म्हणजे फक्त वाचण्याची शक्यता कमी होणं एवढंच नसतं. रुग्ण**

**जिवंत राहिला तरी प्राणवायूशिवाय जाणाऱ्या प्रत्येक क्षणामुळे मेंदूची हानी होण्याची शक्यता वाढते. प्रत्यक्ष हृदयालाही धोका असतो.** कार्डिऑलॉजिस्ट्स म्हणतात त्याप्रमाणे ''वेळ म्हणजे स्नायू.'' हृदयाचे स्नायू. जरी एखादा रुग्ण जिवंत राहिला, त्याचा मेंदू शाबूत राहिला तरी प्राणवायूवाचूनची जास्त मिनिटं म्हणजे हृदयाच्या जास्त ऊतींचा अंत. त्यामुळे हृदयाच्या शिरांच्या आजाराची (cardiovascular disease) तीव्रता वाढते आणि भविष्यात हृदयविकाराच्या झटक्याचा धोकाही वाढतो.

एवींच्या मते, छातीवर दाब देऊन रक्त आणि प्राणवायूचं वहन चालू ठेवणं हीच गोष्ट तेवढी महत्त्वाची आहे. सैद्धान्तिकदृष्ट्या या सर्व अतिरिक्त पायऱ्या आणि साधनं जीवनरक्षक आहेत; पण एवींच्या मते ती लक्ष विचलित करणारी असू शकतात. खरोखरच सिॲटलमध्ये रुग्णवाहिन्यांत डिफिब्रिलेटर्स लावले, तेव्हा हृदयविकाराच्या झटक्यानंतर बचावणाऱ्या रुग्णांचं प्रमाण कमी झालं. याचा अर्थ डिफिब्रिलेटर्स उपयोगी नसतात, असा नाही. ते उपयोगी असतात. पण सीपीआरच्या प्रक्रियेचा वेग कोणत्याही कारणामुळे मंदावला, तर समोर एक नवंच आव्हान उभं ठाकतं. ''तुम्ही कशासाठीही थांबलात तरी अनर्थ होतो,'' असं एवी म्हणतात.


'सेंटर फार रिससिटेशन'मधील संशोधन संचालक आणि बेकरचे सहकारी डॉ. बेन ॲबेला थोडं कौतुकाने आणि थोडं खिजवण्याकरिता एवींना 'हृदय-दाब-वेडा' म्हणतात! त्यांचं हे वर्णन यथार्थ आहे. एवींकडून घ्यायचा संदेश हाच की, तुम्ही जर कोणाला हृदयविकाराच्या झटक्याने कोसळताना पाहिलंत तर शक्य तेवढ्या जलदगतीने त्याच्या छातीवर दाब द्यायला सुरुवात करा. मेंदू पूर्णपणे कार्यक्षम राखण्याच्या उद्दिष्टावर जोर देण्यासाठी त्यांनी या पद्धतीला सीसीआर म्हणजेच 'कार्डिओ सेरेब्रल रिससिटेशन' हे नाव दिलं.

एवी आणि कार्डिऑलॉजिस्ट डॉ. कार्ल कर्न यांच्या नेतृत्वाखाली 'सार्वर' पथकाने प्रयोगशाळेत प्राण्यांवर नियंत्रित प्रयोग केले. १९९३मध्ये त्यांनी हृदयविकाराच्या झटक्यानंतर ज्यांना फक्त छातीवर दाब मिळाले त्या प्राण्यांचा आणि ज्यांना छातीवरील दबावाबरोबरच कृत्रिम श्वासोच्छ्वासही दिला गेला अशा प्राण्यांचा तुलनात्मक अभ्यास केला.

५वी आवृत्ती

# टाईमपास

***प्रोतिमा बेदी यांच्या आठवणी***




**संपादन :-** पूजा बेदी

**अनुवाद :-** सुप्रिया वकील

**किंमत : ३४०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

आपल्या समाजानं अगदी काळजीपूर्वक बनवलेला प्रत्येक
नियम न् नियम मी मोडला.
मी कसलीच बंधनं मानली नाहीत.
मला जे जे करावंसं वाटलं, ते ते मी केलं;
अगदी सपाटून केलं.
कोण काय म्हणेल याला मी काडीचीही किंमत दिली नाही.
माझं तारूण्य, माझं लैगिंक जीवन,
माझी बुद्धिमान- सारं काही मी दिमाखानं मिरवलं.
आणि हे सारं काही मी निलाजरेपणे केलयं.
मी खूप जणांवर जीव ओतून प्रेम केलं,
आणि माझ्यावरही
काहींनी खूप प्रेम केलं...

फक्त दबावाचा उपचार मिळालेल्या प्राण्यांच्या संदर्भात दुसऱ्या गटाएवढेच नव्हेत, तर त्याहूनही चांगले परिणाम झाल्याचं आढळलं. हे धक्कादायक निष्कर्ष प्रसिद्ध केल्यानंतरही ते पथक धिमेपणाने काम करत राहिलं. १९९३ ते २००२च्या दरम्यान त्यांनी आणखी सहा प्रकल्प केले. ते डुकरांवर केले होते. यात त्यांनी सीसीआर (फक्त छातीवर दाब) आणि सीपीआर (छातीवर दाब आणि कृत्रिम श्वासोच्छ्वास) यांचा तुलनात्मक अभ्यास केला. त्याचाही निष्कर्ष तोच निघाला : कृत्रिम श्वासोच्छ्वासामुळे कोणताही जास्तीचा फायदा झाला नाही.

एवींच्या निष्कर्षांना त्याच वेळी स्वीकृती मिळाली असती; तर मी वैद्यकीय महाविद्यालयात शिकत असताना मला वेगळ्याच पद्धतीचा सीपीआर शिकायला मिळाला असता; पण खरं सांगायचं तर त्यांच्या मार्गात अजून दोन अडथळे होते. पहिली समस्या म्हणजे त्यांनी प्रयोग केले होते ते डुकरांवर आणि डुकरांना जीवदान देण्याचा प्रयत्न करणाऱ्या डॉक्टरांमध्ये कोणालाही स्वारस्य नव्हतं. दुसरी समस्या म्हणजे इतर संशोधकांनी अशाच प्रकारचे प्रयोग केले आणि त्यांचे निष्कर्ष वेगळेच होते. त्यांची डुकरं मेली. आम्ही एवींना त्याविषयी विचारलं तर त्यांचं उत्तर तयारच होतं. ते म्हणाले, ''दुसरे प्रयोग फसले, कारण त्या संशोधकांनी डुकराच्या छातीचे स्नायू लुळे केले होते. त्यामुळे हृदयविकाराच्या झटक्याच्या वेळी धापा टाकत का होईना पण थोडासाही प्राणवायू त्यांनी आत घेतला नाही. 'वास्तव जगा'तील झटक्यात थोडातरी प्राणवायू श्वसनाद्वारे आत घेतला जातो.''

तरीही, हे निष्कर्ष चुकीचे आहेत म्हणून काही डॉक्टर वाद घालतच असतात. त्यातील माझ्या नजरेत भरलेला मुद्दा म्हणजे डुकराची श्वासनलिका आणि मानवाची श्वासनलिका यांच्या आकारात फरक असतो. त्यावर एवी म्हणतात की, ''टीकाकारांनी अवाच्या सवा मापदंड लावले आहेत.'' एवी मला म्हणाले, ''हृदयविकाराच्या झटक्यांच्या संदर्भात बोलायचं झालं तर लोकांवर स्वैर (randomized), नियंत्रित (controlled) चाचण्या घेणं कसं शक्य आहे?'' डुकरांवर संशोधन करणं हा त्यांच्या मते चांगला पर्याय आहे. ''आमच्या, प्राण्यांच्या नमुन्यावरून आम्ही सीपीआरच्या कित्येक पद्धती शोधून काढल्या आहेत आणि त्यामुळे माणसांना वाचवण्याचं प्रमाण वाढलं आहे.''

अमेरिकन हार्ट असोसिएशनने लोकांना 'तोंडाला तोंड लावून' पुनरुज्जीवन देण्यास सांगणं बंद करावं, असं एवींचं म्हणणं होतं. पण बराच काळपर्यंत एएचएला त्यांचा दृष्टिकोन पटत नव्हता. मार्गदर्शक तत्त्वं तयार करताना एएचए सहा कसोट्या लावतं. त्यापैकी पहिली कसोटी – सर्वोत्कृष्ट प्रमाण म्हणजे माणसांवरील स्वैर आणि नियंत्रित अभ्यास. प्राण्यांवरील अभ्यासाचा क्रमांक सहावा लागतो. त्यांची मतं बदलण्यासाठी एवी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी खऱ्याखुऱ्या रुग्णांवर प्रयोग (real life experiment) करणं आवश्यक होतं. पण ते कसं जमणार? राष्ट्रीय वैद्यकीय संस्थांच्या मार्गदर्शनाशी टक्कर द्यायला कोण सुखासुखी तयार होईल? त्यांना आवश्यकता होती संस्थेबाहेरील व्यक्तीची आणि त्या व्यक्तीने विश्वासाने ही झेप घेण्याची.

आणि नोव्हेंबर २००२मध्ये ध्यानीमनी नसताना संधीने दार ठोठावलं. एवी आणि कर्न यांनी एएचएच्या मार्गदर्शनापासून विभक्त होण्याची इच्छा जाहीर केली. त्यानंतरच्या आठवड्यात ते अमेरिकन हार्ट असोसिएशनच्या, शिकागो येथील सभेला गेले होते. नेहमीप्रमाणेच ती सभा मोठी होती, एखादं छोटसं शहर असावं तशी सभोवार काचा लावलेल्या 'मॅक्कॉर्मिक प्लेस कन्व्हेंशन सेंटर'मध्ये ती भरली होती. गर्दीतून लांब टांगा टाकत पुढे आलेल्या त्या दांडग्या, चष्मिस डॉक्टरना ॲरिझोनाच्या एकाही डॉक्टरने यापूर्वी पाहिले नव्हते.

त्यांनी माइक केलम, इआर डॉक्टर अशी स्वत:ची ओळख करून दिली. सभेच्या ठिकाणापासून कारने दोन तासांच्या अंतरावर असलेल्या दक्षिण विस्कॉन्सिनहून ते आले होते. जवळजवळ दहा वर्षं ते मर्सी हेल्थ सिस्टिमचे इमर्जन्सी सर्व्हिसेस डायरेक्टर होते. या मर्सी हेल्थ सिस्टिममध्ये रॉक आणि वॉलवर्थ परगण्यांतील दवाखाने व छोट्या रुग्णालयांचा समावेश होतो. केलमनी विद्यापीठात काम केलं नव्हतं; पण फावल्या वेळात वैद्यकीय जर्नल्स वाचायची त्यांना आवड होती. एखाद्या तरुणाला लाजवेल अशी शक्ती त्यांच्या अंगात असली, तरी ते जवळपास साठीचे होते. मृतप्राय व्यक्तीला संजीवन देण्याचं संशोधन करण्यात त्यांना प्रचंड रस होता. १९८०मध्ये त्यांनी एक लेख वाचला होता. मृतप्राय कुत्र्यांना कित्येक मिनिटं हार्ट मॉनिटरवर फ्लॅटलाइन करून त्यांच्यात पुन्हा चेतना आणण्यात

यश मिळवलं, याविषयीचा तो लेख होता. तो वाचूनच त्यांना संजीवन संशोधनात रस निर्माण झाला होता.

बऱ्याच वेळा, हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णावर तातडीने उपचार करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या पॅरॅमेडिक्सनी रुग्णावर केलेल्या उपचाराचा विशेष फायदा होत नसे, याची केलमना जाणीव होती. एकापाठोपाठ एक केसरिपोर्ट चाळत, इएमएस डायरेक्टर म्हणून वाटणारी षंढपणाची जाणीव त्यांनी माझ्याशी बोलताना व्यक्त केली. ''हृदयविकाराचा झटका आलेल्या रुग्णांचे केसपेपर्स पाहताना, त्यांचं पुनरावलोकन करताना हेच दिसतं – 'मृत झाला', 'मृत झाला,' एकापाठोपाठ एक हेच दिसतं – 'मृत,मृत,मृत,मृत'. आपण कोणालाही जिवंत करू शकत नाही, तर आपण एवढा वेळ फुकट का घालवत आहोत?''

ॲरिझोनामधून आलेले रिपोर्ट्स वाचून केलमना जाणवलं की, हे बदलता येऊ शकेल. एएचएच्या सभेच्या हॉलकडे जाणाऱ्या मार्गावर त्यांनी एवींना सांगितलं, ''दक्षिण विस्कॉन्सिनच्या सपाट आणि अस्ताव्यस्त पसरलेल्या दुग्धशाळांमध्ये या नव्या मसुद्याचा उपयोग होतो का, ते मला पाहायचं आहे.'' लवकरच ते विस्कॉन्सिनच्या तीन इएमएस डायरेक्टरबरोबर ट्यूसॉला गेले. अप्रसिद्ध डॉक्टरांचा तो छोटासा गट, आपत्कालीन वैद्यकशास्त्राला मोठं आव्हान द्यायला उभा ठाकला होता.

'मर्सी हेल्थ सिस्टिम' हे प्रतिष्ठित शैक्षणिक केंद्र नसलं तरी, मॅडिसनच्या दक्षिणेला तासाभराच्या अंतरावर असणाऱ्या रॉक आणि वॉलवर्थ परगण्यांतील वैद्यकीय सेवा देणारं महत्त्वाचं केंद्र आहे. यात ६३ प्रकारच्या सुविधा उपलब्ध असून वर्षाकाठी ८५,०००हून अधिक रुग्ण याचा फायदा घेतात. केलम यांच्या रुग्णवाहिन्यांच्या ताफ्याला बरीच जमीन चाकाखाली घालावी लागते. जोरजोरात सायरन वाजवत भरधाव गेली तरी जेन्सविलमधील मर्सीच्या मुख्य रुग्णालयापासून रॉक परगण्याच्या पार पश्चिम टोकाला पोहोचायला रुग्णवाहिनीला २० मिनिटं तरी लागतात.

केलमच्या प्रयोगाअगोदरच्या तीन वर्षांत आणीबाणी पथकाने, कोणाच्यातरी समक्ष आलेल्या हृदयविकाराच्या झटक्याच्या ९२ केसेस हाताळल्या होत्या. त्यापैकी फक्त १९ रुग्ण बचावले. त्यांपैकी फक्त चौदा जणांच्या मेंदूवर गंभीर दुष्परिणाम झाला नाही. केलमच्या सहकाऱ्यांनी

लिहिलेल्या प्रबंधात म्हटलं आहे की, ही आकडेवारी फारच भयानक आहे. पण देशाच्या उर्वरित भागातील आकडेवारी पाहता ही आकडेवारी खूपच चांगली आहे, असं म्हणावं लागेल. कोणताही मुलाहिजा न ठेवता सांगायचं झालं, तर उपचारांच्या स्वीकृत दंडकांमुळे बहुसंख्य रुग्ण मरण पावले.

परत आल्यावर केलम आणि इतर इएमएस डायरेक्टरांनी महत्त्वाचा निर्णय घेतला – आणीबाणीच्या स्थितीतील हृदयविकारग्रस्तांवर उपचार करण्याच्या पद्धतीत बदल करण्याचा. तोपर्यंत फक्त डुकरांवरच चाचण्या करण्यात आलेली पुनरुज्जीवनाची पद्धत या रुग्णांच्या बाबतीत अवलंबायचं त्यांनी निश्चित केलं. पॅरॅमेडिक्स, बंबवाले, पोलीस अधिकारी – परगण्याच्या ९११ इमर्जन्सी रिस्पॉन्स सिस्टिमचे जे जे म्हणून सदस्य होते, त्या प्रत्येकाला याचं प्रशिक्षण द्यायचं त्यांनी ठरवलं. मेंदूकडे जाणारा रक्तप्रवाह सुरळीत चालू राहील यावर सगळं लक्ष केंद्रित करायचं होतं. सगळे परिश्रम छातीवर दाब देण्यावर केंद्रित करायचे, मध्ये येणारे व्यत्यय कमीत कमी प्रमाणात ठेवायचे, असं त्यांनी ठरवलं. श्वासोच्छ्वास थांबलेल्या रुग्णाकडे पोहोचल्याबरोबर लगेचच त्याच्या छातीवर, पंधरा नव्हे, तीस नव्हे तर दोनशे वेळा जोराने व जलदगतीने दाब द्यायचा. त्यानंतर इमर्जन्सी रिस्पाँडर्सनी डिफिब्रिलेटरने एकच शॉक द्यायचा. प्रमाणभूत वैद्यकीय कार्यपद्धतीप्रमाणे अनेक शॉक्स न देता फक्त एकच शॉक द्यायचा.

डिफिब्रिलेशन हे जीव वाचवणारं प्रभावी साधन आहे; पण प्रत्येक शॉकमध्ये मौल्यवान वेळ जातो. म्हणून प्रत्येक शॉकनंतर इमर्जन्सी रिस्पाँडर दोनशे वेळा छातीवर दाब देईल. कृत्रिम श्वासोच्छ्वास पूर्णपणे टाळण्यात आला होता. जादा प्राणवायू पंप करण्यासाठी एक छोटं उपकरण तोंडाच्या आत घालायचं, पण नाडीचे ठोके सुरू होईपर्यंत किंवा शॉक आणि छातीवर दाब याच्या तीन फेऱ्या – म्हणजे एकूण सहाशे वेळा छातीवर दाब – होईपर्यंत श्वसनाची नळी आत घालायची नाही.


२००४मध्ये वर्षभर केलम ट्यूसाँला फोन करून अद्ययावत बातमी कळवत होते. सगळं खूपच छान चाललं होतं. नवीन तंत्राचा चांगला उपयोग होत होता, हे स्पष्टच होतं. पॅरॅमेडिक्सनी आतापर्यंत कधी नव्हे तेवढे जीव आता वाचवले होते. एवी अतिशय आनंदित झाले होते. पण

एवढं पुरेसं नव्हतं. हे निष्कर्ष इतरांपर्यंत पोहोचणं आवश्यक आहे, असं एवींना वाटत होतं. त्यामुळे प्रत्येक वेळी केलमचा फोन आला की, त्यांनी हे निष्कर्ष शैक्षणिक जर्नलकडे पाठवावेत, असं एवी त्यांना तावातावाने सांगत असत. माझ्या समोरच्या खुर्चीत बसलेल्या एवींनी खुर्चीवरच उसळ्या मारत त्या फोनची नक्कल करून दाखवली. '' मी त्याला म्हणायचो, 'माइक , तुला आकडेवारी तयार केलीच पाहिजे.' बऱ्याच वेळा त्याने मला फोन केल्यावर मी त्याच्या अंगावर खेकसायचो, 'तुला आकडेवारी तयार केलीच पाहिजे.' तो म्हणायचा, 'मी साधा इआर डॉक्टर आहे. मी हे करू शकणार नाही.' पण अखेरीस मी त्याला भागच पाडलं,''एवी म्हणाले.

शेवटी २००६च्या शरद ऋतूत केलम यांचा लेख (एवी हे सहलेखक होते) *'अमेरिकन जर्नल ऑफ मेडिसिन'*मध्ये प्रसिद्ध झाला. त्याला मिळणारा प्रतिसाद आश्चर्यकारक होता. मागच्या तीन वर्षांत रॉक आणि वॉलवर्थ परगण्यांतील, हॉस्पिटलबाहेर हृदयविकाराचा झटका आलेल्या ९२ रुग्णांपैकी फक्त १५ टक्के लोक वाचले होते आणि त्यांचे मेंदूही कार्यक्षम राहिले होते. नवीन पद्धत अमलात आणल्यानंतर हे प्रमाण तिपटीहूनही जास्त झालं. अचानक आलेल्या, हृदयविकाराच्या झटक्याच्या ३३ रुग्णांपैकी १९ लोक बचावले आणि त्यापैकी १६ जण – म्हणजे ४८ टक्के – धडधाकट होऊन स्वत:च्या पायांनी चालत घरी गेले. एवी मागच्या आठवणी सांगतात, ''हे प्रसिद्ध करताना आमच्या नाकी नऊ आले. हे एवढं चांगलं होतं की, कोणाचा त्यावर विश्वासच बसेना.'' पण या गोष्टीचा पाठपुरावा करणारा आणखी मोठा अभ्यास केल्यावरही पूर्वीच्याशी तंतोतंत जुळणारे निष्कर्ष मिळाले. त्या दरम्यान एवींना आपल्या सिद्धान्ताची चाचणी घ्यायला आणखी मोठं क्षेत्र मिळालं.

❖

६ वी आवृत्ती




# धीरुभाईझम

मूळ इंग्रजी लेखक : **ए. जी. कृष्णमूर्ती**
प्रस्तावना : **मुकेश अम्बानी**
अनुवाद : **सुप्रिया वकील**


**किंमत : ९०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

गुजरातमधील छोट्या खेड्यापासून ते ‘रिलायन्स’च्या साम्राज्यापर्यंतचा अतिभव्य विस्तार हा विलक्षण टप्पा सर करणाऱ्या धीरुभाई अम्बानींच्या कार्यकर्तृत्वाची वेगळी ओळख करून द्यायची गरज नाही. फारसं औपचारिक शिक्षण नसलेले धीरुभाई स्वत:च एक चालतंबोलतं विद्यापीठ होते. त्यांनी स्वत:चं असं एक कार्यविषयक तत्त्वज्ञान व संस्कृती जोपासली होती. भव्य स्वप्नं, खडतर परिश्रमांची तयारी, निश्चयाचं बळ यांच्या जोडीला त्यांनी काही साधी-सोपी तत्त्वं अनुसरली होती. अशक्य कोटीतल्या वाटणाऱ्या स्वप्नपूर्तीसाठी त्यांनी याच तत्त्वांच्या साथीनं मार्गक्रमण केलं आणि त्यात नेत्रदीपक यशही मिळवलं. त्यांची हीच तत्त्वं सर्वसामान्यांच्या जीवनातही आशा जागवतील व मार्गदर्शक ठरतील.

पुस्तक परिचय

# संवाद परमेश्वराशी


*भाग २*



नील डोनाल्ड वॉल्श हे दक्षिण ओरॅगॉन प्रांतात नॅन्सी इथं आपल्या पत्नीसमवेत राहतात.

माणसांना स्वत:चीच ओळख व्हावी, या उद्देशानं या दोघांनी ना नफा तत्त्वावर एक प्रतिष्ठान सुरू केलं आहे. माणसांची वैयक्तिक प्रगती होऊन आध्यात्मिक समज निर्माण करण्याच्या दृष्टीनं हे प्रतिष्ठान काम करतं.

स्वत: वॉल्श संपूर्ण अमेरिकेत फिरून व्याख्यानं देतात आणि कार्यशाळा आयोजित करून 'संवाद परमेश्वराशी' या पुस्तकातील संदेशाचा प्रचार-प्रसारही करतात.




मूळ इंग्रजी लेखक
**नील डोनाल्ड वॉल्श**

अनुवाद
**डॉ. वृषाली पटवर्धन**

# विस्तारित विशेष आवृत्तीसाठी

मार्च २००८मध्ये मी हे शब्द लिहीत आहे. माझ्या या लिहित्या क्षणापासून ते तुम्ही ते शब्द वाचण्यापर्यंत या जगात काही गोष्टी बदलल्या असतील, अशी मी आशा करतो.

दोन्ही वेळी 'आत्ताचा क्षण' असणं किती गमतीशीर आहे नाही? त्या क्षणी ती वेळ कशी बदलते याची मला फार मजा वाटते. 'आत्ता'च आहे. जणू काही काळ पुढे सरकलेलाच नाही. माझं लिहिणं आणि ते तुमच्या हातात येऊन तुम्ही वाचणं यात काही महिने- कदाचित काही वर्षंही गेली असतील. पण त्यात हा एवढा काळ गेला, असं वाटतही नाही.

या मधल्या काळात काय झालं, हे काही माझ्या लक्षात येत नाही. मी आत्ता लिहितोय, पण तुम्हीही आत्ताच वाचताय- तुमच्या लक्षात

येऊ शकेल. माझा 'आत्ता' आणि तुमचा 'आत्ता' आणि तुमची आत्ताची खरी वेळ– २० मार्च २००८ चे सकाळचे ११.२३– यातल्या मधल्या कालावधीकडे तुम्ही मागे वळून पाहू शकता – आणि माझ्या भविष्यात काय घडलंय हेही तुम्ही जाणू शकता.

असा विचार करायला किती छान, वेगळं वाटतंय-

हो ना?

पण चला, आता आपण त्याहूनही मस्त ठिकाणी जाऊ या. आपण दोघे- तुम्ही आणि मी भूतकाळाची सफर करून येऊ आणि भविष्यातही फेरफटका मारून येऊ. तुमच्या आणि माझ्या आत्ताच्या वास्तवाच्या दृष्टिकोनाच्या दृष्टिकोनातून विचार करू, आपल्या दोघांच्याही आधीच्या आणि पुढच्या काळात डोकावून बघू.

तुम्हाला कसं वाटायला हवंय? काही सुचतंय? मला वाटतं तुमच्याही काही कल्पना असतील. कारण, पाहा- आपणच दोघे त्याचे निर्माते आहोत. आपणच तर ते निर्माण करणार आहोत. तुम्ही, मी आणि आणखी काही जण जे इथे आहेत- सगळे आत्ता त्या क्षणी उद्याच्या निर्मितीत सहभागी आहोत. सगळ्यांना आत्ता इथे एकत्र आणून मी या पुस्तकांची प्रस्तावना करतोय. हे पुस्तकही त्यासाठीच आहे. त्यात तुमच्या-माझ्या भूत आणि भविष्याचं प्रतिबिंब दिसेल. 'उद्या'बद्दलच्या आपल्या कल्पना खऱ्या ठरतील. त्यातून तुम्हाला काही सुंदर निरीक्षणं, सूचना, आव्हानं आणि कल्पना मिळतील.

या कारणासाठी या पुस्तकावर तुमच्या उड्या पडतील. तुम्ही हे पुस्तक आधी वाचलं असेल तरीही पुन्हा वाचण्यासाठी आणि आधी वाचलं नसेल तरीही पुन्हा वाचण्यासाठी तुम्ही कदाचित नुसते उत्सुक असाल. कारण हे पुस्तक तुमच्या विचारांना चालना देणारं, तुम्हाला प्रेरणा देणारं आहे. यात मांडलेल्या काही उत्तम कल्पना सत्यात उतरू शकतात, असंही तुम्हाला वाटण्याची शक्यता आहे.

पण एखादी परीकथा, कल्पनारम्य पुस्तक म्हणून तुम्ही हे हातात घ्याल, तर मात्र तुमची निराशा होईल. जे कधीही पुढे- भविष्यात

घडणं शक्य नाही, त्याच्या आशेनं हे पुस्तक वाचाल तर तुमचा अपेक्षाभंगच होईल.

तुम्हाला नक्की हे ठाऊक असेल (किंवा कदाचित नसेलही) की मी बऱ्याच वर्षांपूर्वी हे पुस्तक लिहायला सुरुवात केली. आत्ता हे पुस्तक तुमच्या हातात आहे, पण त्यातला पहिला शब्द मी पंधरा वर्षांपूर्वी १९९३च्या ईस्टर संडेला लिहिला. ही त्याची विशेष आवृत्ती आहे. त्यात जुन्या आवृत्तीपेक्षा बऱ्याच नवीन आणि खासगी गोष्टी आल्या आहेत. हे निर्माण करताना मला फार मस्त वाटलं. कारण, पंधरा वर्षांनंतरही त्यातली विधानं किती खरी आहेत, ती निरीक्षणं किती सत्य आहेत, हे पाहण्याची संधी मला मिळाली. आपण खरंच यातल्या कल्पनांची गांभीर्यानं देवाण-घेवाण करू शकलो, त्या त्यातल्या किती प्रत्यक्षात उतरू शकतात, हेही पाहू शकू.

मूळ तीन पुस्तकांच्या मालिकेतलं हे दुसरं पुस्तकं. समग्र नऊ पुस्तकांच्या मालिकेतल्या या पुस्तकात विशेषतः सद्य काळातील सामाजिक आणि राजकीय मुद्द्यांवर भर दिलेला आहे. एकूणच जीवनाबद्दल चर्चा करणाऱ्या या पुस्तकाच्या संहितेत जीवन कसं जगतोय आणि मानवतेच्या दृष्टिकोनातून ते कसं जगता आलं असतं, याबद्दल त्यात चर्चा आहे. आगामी काळात मानवी संस्कृतीत होणारे बदल हेच सर्वांत मोठं आव्हान असेल. आपण या प्रक्रियेत गुंतले गेलो का, या विशेष दुसऱ्या आणि तिसऱ्या पुस्तकातून विशेषत्वानं उपयुक्त आणि खऱ्या अर्थानं अंतदृष्टी मिळेल, अशी मला खात्री आहे. त्यासाठी मी हॅम्प्टन रोड्स, पब्लिशिंग कंपनीचा आभारी आहे.

त्यांनी नवीन शतकाच्या पहिल्या दशकाच्या शेवटच्या टप्प्यावर हे पुस्तक पुनर्प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला, त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. या संवादांमधून मिळणाऱ्या संदेशावर प्रकाशकांचाही विश्वास आहे. आपण या अनुभव विश्वात जितक्या जास्तीत जास्त माणसांना सहभागी करून घेऊ, तितके आपण आपल्यासाठीच नव्हे, तर आपल्या मुला-नातवंडांच्या उज्ज्वल भविष्यासाठी काहीतरी करू शकतो, (या पुस्तक मालिकेचा सर्वंकष विचार केला तर दुःस्वप्न, संघर्ष, हिंसा, हत्या, निराशा हे संपवून सौहार्दपूर्ण

आनंदी वातावरणातील शांततामय आयुष्याचे चिरंतन स्वप्न साकार करून परस्पर मैत्री व स्नेहाचे बंध निर्माण करू. जरी हे लिखाण १५ वर्षं जुनं असलं, तरी यातील एकही शब्द कालबाह्य नाही. खरंतर याच्या अगदी उलट आहे आणि तेच खरं आहे. हे पुस्तक जेव्हा लिहिलं गेलं, तेव्हा ते काळाच्या बरंच पुढं गेलेलं होतं. यातील शब्द आधीच्या काळापेक्षा आत्ताच्या काळासाठीच सुसंगत, योग्य आहेत. हजारो वाचकांच्या पसंतीला उतरलेलं हे पुस्तक सहजच न्यू यार्कमधील बेस्ट सेलर्स ठरलं आहे.

मूळ पुस्तकावरून या नव्या आवृत्तीबद्दल बरेच मतभेद झाले आहेत. पहिल्या पुस्तकात वैयक्तिक आयुष्यातील समस्या आणि त्यांची उकल होती. या पुस्तकात वैयक्तिक, तसंच जगातील सर्वांसाठी आह. हे वैश्विक समस्यांना स्पर्श करणारं असून, व्यापक मानव समाजाच्या अडीअडचणी, समस्या यांबाबत या पुस्तकात चर्चा केली गेली आहे.

आपला मानववंश पुढील अनेक वर्षं टिकाव धरू शकेल असं गेल्या काही वर्षांतील घटनांवरून दिसतं. पण खरंतर आपण आहोत तसेच खूप काळ राहू शकत नाही... खरंच नाही.

मी हे लिहित असताना इंटनेटवर बातम्यांचा पूर आला असेल- अंटार्क्टिकावर मॅनहॅटनपेक्षा सातपट मोठा बर्फाचा डोंगर कोसळला- इराकमध्ये हिंसाचाराचे अजूनही थैमान- जगातही अराजक मानले. थंड डोक्यानं बारा जणांची हत्या केल्याची पावलॉव या अवघ्या सोळा वर्षांच्या मुलाची कबुली- अत्यंत शांतपणे तो या सगळ्या घटनेचे वर्णन करीत होता. जर तो पकडला गेला नसता, तर त्यानं आणखी जणांचा बळी घेतला असता, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांना दिली. 'ज्यांना मारणं योग्यच होतं, त्यांनाच मी मारलं,' असं हा मुलगा म्हणाला. त्यानं अशा माणसाला मारलं, ज्याला त्याच्या बहिणीबरोबर डेटवर जायचं होतं.

या सगळ्या गोष्टी आपल्या समाजाबद्दल काही सांगतात. आपल्या जगण्याच्या पद्धतीवर भाष्य करतात. आपण आपल्याला आपल्याबद्दल सांगितलेली ही गोष्ट आहे- ती आपण आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवत असतो.

नाही. हे योग्य नाही. आपल्या वैश्विक समाजानं एक तर पुन्हा जन्म घ्यावा, नवनिर्माण करावं, नाही तर पूर्ण नष्ट तरी होऊन जावं.

आपण नवनिर्माणाची निवड केलीत, तर ही विशेष आवृत्ती तुमच्यापुढे काही धाडसी पर्याय ठेवते. आधीच्या सर्व कल्पनांना छेद देणारी आणि मानवजातीला वेगळी दिशा देणारी मार्गदर्शक दृष्टी देते. आधीचा काळा भूतकाळ पुसून उज्ज्वल भविष्यकाळ देते.

आता आपण आपल्या एकूणच भूतकाळाकडे एक नजर टाकू...

आपण त्याला इतकं घट्ट धरून ठेवावं, असं या पठ्ठ्यानं आपल्याला काय दिलंय? सर्वमान्य धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक तसंच तात्त्विक कल्पनांनी असा काही चमत्कार करून ठेवला आहे की आपण त्यात किंचितही बदल सहन करू शकत नाही.

मी स्वतः त्याचं एकही कारण सांगू शकत नाही. मला असं वाटतं की, माणुसकीची धारणा बदलण्यासाठी प्रत्येक जण आपल्या कल्पनेत थोडा बदल करू शकतो. आपल्यातील मतभेदांचंही पुनरवलोकन केल्यानं त्यातून काही चांगलं निर्माण होऊ शकतं. आपली सगळी मूल्यं कितीही पवित्र असली तरी त्यांचा प्रामाणिकपणे विचार करून ती अधिक उदात्त स्वरूपात स्वीकारायला हवीत. त्यांना काळानुसार बदलण्यासाठी धैर्य हवं.

उदा:- मृत्युदंडाच्या धाकानं खरंच पुढचा, भावी हिंसाचार टाळता येईल का? खरंच सांगा- आपण भले खूप चांगले आहोत; पण चुकीच्या धर्माचं पालन केलं तर देव आपला स्वीकार करणार नाही, आपल्याला पोटाशी घेणार नाही, असं खरंच तुम्हाला मनापासून वाटतं का? म्हणजे पाहा- एखाद्या राजकीय, सामाजिक, धार्मिक स्वार्थापायी निरपराध नागरिकांची हत्या करणं न्यायाला धरून आहे, असं तुम्हाला वाटतं का? प्रगत सामाजिक, धार्मिक वा राजकीय उद्दिष्टापोटी अशा कृत्यांचं समर्थन करावं का?

आपण कधी विचारी होणार? मोठे होणार? देवाबद्दलच्या आपल्या कल्पना -देव म्हणजे काय? तो कोण आहे? त्याला काय आणि का हवे आहे?

संवाद परमेश्वराशी- भाग-२ - असं धाडस दाखवते. या पुस्तकाच्या आधीच्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत जे म्हटलं आहे, तेच पुन्हा सांगतो. मानवजात आपला कल बदलेल, एवढी मी तुम्हाला खात्री देतो. बदल घडेल की नाही हा प्रश्न नाही; पण तो कशाचा तरी परिणाम म्हणून येईल. तो सहकार्यामुळे येईल, खुल्या विचारांनी येईल की खुल्या मनानं येईल, हे पाहायचं!

जगण्याचे आणि सहजीवनाचे अन्य पर्याय आपल्याला नकोत, असं म्हणण्याची गरज नाही. पण आता इथून कुठं जायचं, त्याला काय पर्याय आहे, हा प्रश्न आहे. हे पुस्तक या चर्चेला व्यासपीठ मिळवून द्यायचं काम करीत आहे. त्यातून येणारे निष्कर्ष कदाचित आपल्या पूर्वापार कल्पनांना धक्का देणारे ठरू शकतात. आणि या संवादाचा उद्देशही हाच आहे, हेही खरं. इथं आलेला नवा मजकूर, नवीन मतप्रदर्शन मला नवा उत्साह देतं, नवं चैतन्य आणि नवा निश्चय देतं- हा मजकूर जास्तीत जास्त वेगानं लोकांपर्यंत पोहोचवण्याचं बळ देतं.

चला तर मग – संवादांना सुरुवात होऊ द्या– संवाद– इथला, संवाद– तुमचा तुमच्या हृदयाशी आणि अंतरात्म्याशी, तुमच्या कुटुंबाशी तुमच्या मित्रमंडळींशी. होय– हा संवाद सुरू होऊ दे आणि तो सगळीकडे– सर्वांपर्यंत पोहोचू दे, पसरू दे, शेवटी तोच तर कायम असणार आहे आणि तोच नेहमी या जगात बदल घडवून आणणार आहे...

विशेषतः जेव्हा हा संवाद परमेश्वराशी असेल, तेव्हा...!

**– एनडीडब्ल्यू,**
**मार्च २८, २००८**
**अशलँड, ओरेगॉन.**

◆

५ वी आवृत्ती

# हिरवळ

## वि.स. खांडेकर




**किंमत : ८०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

लघुनिबंध हा ललित वाङ्मयाचा अत्यंत आधुनिक असा प्रकार आहे. या नव्या वाङ्मयप्रकाराची दोन प्रमुख वैशिष्ट्यं आहेत: स्वैर कल्पनाविलास आणि साध्या विषयातून मोठा आशय शोधून काढण्याची शक्ती !

चमत्कृती हाही लघुनिबंधाचा एक विशेष आहे. ही चमत्कृती बहुधा विषयाच्या निवडीत असते; कधी ती मांडणीत असते, कधी कल्पनेची असते, कधी भावनेची, तर कधी सूचित केलेल्या तत्त्वाची असते. मानवी जीवनाचं जिव्हाळ्यानं केलेलं चिंतन व त्यातून स्फुरलेला तात्त्विक विचारविलास हा या अशा लेखनाचा आत्मा असतो.

परंपरा, बहुमत, लघुकथा या संज्ञेशी असलेलं साम्य आणि केवळ लालित्य अथवा मर्यादित आत्मपरता यांच्यावरच भर न देता, कल्पना, भावना आणि विचार यांचा या वाङ्मयप्रकारात आपल्या व्यक्तित्वाचा स्वच्छंद विलास दाखवण्यासाठी, मधुर व मनमोकळ्या आविष्कारासाठी मिळणारा अवसर या सर्व दृष्टींनी या प्रकाराला लघुनिबंध हे नाव अधिकच अन्वर्थक ठरलं आहे.

मोहक व्यक्तित्वाचा मार्मिक व मनोहर आविष्कार असणाऱ्या लघुनिबंध या वाङ्मयप्रकाराशी ओळख होऊन, त्याच्याशी जवळीक निर्माण होण्यासाठी चौदा निवडक लघुनिबंधांचा सिद्ध केलेला हा संग्रह वाचकांना नक्कीच आवडेल, असा आहे.

## आगामी विचार

(प्रकरण १ ते प्रकरण ७)

'कॉन्व्हर्सेशन विथ गॉड' या पुस्तक मालिकेबद्दल एक गोष्ट सांगायला हवी. यातील दुसरं पुस्तक इतक्या वर्षांनी पुन्हा वाचल्यावर मला जाणवलं की, यात सर्वंकष मानवतेच्या अनुभवांवर अत्यंत बुद्धिमत्तापूर्ण, चपखल, सयुक्तिक आणि मर्मभेदी भाष्य आहे. आत्तापर्यंत मला असा कधीच अनुभव नव्हता. त्याहूनही सर्वांत महत्त्वाचं म्हणजे- आपण कोण आहोत, कुठे आहोत आणि आपल्याला कुठं पोहोचायचं आहे, यासाठीही यातून प्रेरणा मिळते तेव्हा हे फक्त भूतकाळाचं निरीक्षण, अवलोकन नाही, तर आपल्या उद्याचा- भविष्याचा मार्गदर्शकही आहे, वाटाड्याही आहे. मानववंशाचं जतन आणि विजय याबद्दल हे पुस्तक सांगतं.

हे सगळं मी अत्यंत विनम्रपणे सांगतो आहे कारण, हे पुस्तक मी लिहिल्याचा मला अनुभव नाही. मी प्रश्नांची भेंडोळी फक्त उलगडत गेलो आणि त्याची उत्तरं उतरवून घेत गेलो.

आता हे मी लिहून घेतलेलं पुस्तक इतक्या वर्षांनी पुन्हा वाचतोय, तेव्हा माझा माझ्यातच घडलेला बदल मला जाणवतोय. यातल्या विचारांची व्यापकता, स्पष्टता आणि या आश्चर्यकारक संवादातील दूरदृष्टी यांचा मी प्रथमच वाचल्यासारखा आनंद घेतोय.

या पुस्तकात ज्या वेगळ्या विषयांचा ऊहापोह केला आहे, ते विषय पाहा– वेळ, अंतराळ, अवकाश, सत्य, गुणमापन, जागरुकता, सदसद्विवेक, भीती, कर्म, लैंगिक संबंध, पैसा, आयुष्याचा उद्देश, नातेसंबंध, स्वर्ग-नरक, प्रकाशमानता (उन्नती), आत्मोन्नती, हिटलर, योग्य आणि अयोग्य, स्त्रीवाद, आणि पुरुषवाद, मनाचे स्वरूप, जागतिक अर्थव्यवस्था, वैश्विक सजीव सृष्टी आणि भोवतालची परिस्थिती, शिक्षणातील नवे मार्ग इत्यादी अनेक– अर्थातच देवाबद्दलच्या टिप्पणीसह धावत्या वर्णनासह...

देवाची इच्छा-मुक्त इच्छा-माझी इच्छा आणि या तिघांतील

आंतरसंवादानं या पुस्तकाची सुरुवात होते. इथे यात काय फरक आहे? काही फरक आहे का? मग विषय येतो तो आपल्या आयुष्याला अर्थ देणारे आणि आपल्या भोवतालच्या जगात काही बदल घडवणारे रोजच्या आयुष्यातले निर्णय आणि निवड कशी करतो हा. नंतर लगेचच हा संवाद आपल्याला 'संधी' आणि 'निवड' क्रिया आणि प्रतिक्रिया यांच्याकडे घेऊन जातो. या गोष्टी आपल्या निर्णयप्रक्रियेत महत्त्वाच्या असतात.

हे सगळं पहिल्या फक्त सव्वीस पानांत...

नंतर ही संहिता तुम्हाला फेरफटका मारायला घेऊन जाते. यातल्या काही गोष्टी कदाचित तुम्हाल मंजूर नसतीलही. खरं तर देवाला कोण आहे, हे सांगण्यापेक्षा आपल्याला काय व्हायचं आहे, याबद्दल संवाद साधण्यात जास्त रस आहे.

हे पुस्तक म्हणजे बायबलच्या नव्या करारातील शेवटचा भाग नसून, ही एक निर्मितीची क्रिया आहे.

या नव्या आवृत्तीचे दुसऱ्या भागाचे ढोबळमानाने तीन भाग पाडले आहेत- प्रकरण १ ते ७, मग ८ ते १५, आणि शेवटी १६ ते २०.

संहितेचा तिसरा भाग जास्त आकर्षक आहे; कारण, त्यात अनेक विषयांचा धावता आढावा घेतला गेला आहे. आधीच्या प्रस्तावातल्या त्रासदायक भागावरून हा भाग एकदम सत्यावर उडी घेतो. तिसऱ्या प्रकरणाची सुरुवात बघितलीत की तुम्ही आधीच किती गोष्टींची माहिती करून घेतलीय, ते लक्षात येईल.

तुम्ही यातल्या बऱ्याच गोष्टी ऐकल्या आहेत, असंही वाटेल... पण तुम्ही हा सगळा काळजीपूर्वक वाचावा असं मी म्हणेन- कारण असं वाचलं नाहीत, तर 'मला हे सगळं आधीच ठाऊक आहे,' असं म्हणून तुम्हाला या संवादाचं फारसं महत्त्व वाटणार नाहा- आणि तिथंच चूक होईल.

आयुष्य ही निरंतर प्रक्रिया आहे, असं पाहिल्या पुस्तकातल्या संवादात म्हटलं आहे. जुन्या पार्श्वभूमीवर देवाचा संवाद नव्या पद्धतीनं कसा होतो, हे पाहणं फार आकर्षक आहे. उदाहरणार्थ– तुमचं मन

बदलणं थांबवा, असा सल्ला दिलाय, तो मला अगदी आतपर्यंत भिडलाय. इतर 'संवाद परमेश्वराशी'च्या लिखाणात त्याच्यावर इतका केंद्रिभूत विचार मांडलेला नव्हता. त्यामुळे अचानक आयुष्य म्हणजे निरंतर चालणारी प्रक्रिया आहे, याचा नवा अर्थ लक्षात आला. जुन्यापेक्षा नव्या संदर्भात याचा अर्थ उलगडत गेला.

सातव्या प्रकरणातल्या (तिसऱ्या पुस्तकात) मानवी जवळिकीबद्दल नवीन अर्थ सांगणारे जादा परिच्छेद आहेत. शारीरिक संबंधातबाबत इथं श्वास रोखून धरायला लावणारी माहिती आहे. दृष्टिकोनातून त्याचं मूल वर्णन आहे.

दुसऱ्या प्रकरणातला एक परिच्छेद पुन्हा वाचताना मला खूप छान वाटलं. त्यात देव मला म्हणाला- 'तू काय करतोस हे बघायला मी तुला बोलावलंय. तू तुझ्या शारीरिक जीवनातच पुरता अडकला आहेस. तू तुझ्या आत्म्याकडे फारच कमी लक्ष दिलं आहेस.'

मी माझ्या बचावाचं समर्थन दिलं– 'तो आव्हानात्मक काळ होता.' त्यावर देव उत्तरला – 'या प्रक्रियेत तू आत्म्यासह आणखी बरीच कारणं घुसडलीस.'

'स्पष्ट दिसतंय ते सांगावं.'

मग देव क्लृप्तीनं म्हणाला, ''माझी मदत घेतली असतीस, तर या आधीचे काही महिने सुरळीत पार पडले असते. तुझे संबंध तुटू नयेत, म्हणून मी काही सुचवू का?''

'नक्कीच!'

'कॉन्व्हर्सेशन्स विथ गॉड'च्या संदेशाचं पूर्ण पालन करत जगायचं हे मला मोठं आव्हान वाटलं होतं. मी काही त्यात गडबड करायला बघत नाहीये. आता मला तुझ्यासमोर हे सांगायला हवं की निदान असा प्रामाणिक प्रयत्न करायचा मी विचार तरी केला होता; पण 'कॉन्व्हर्सेशन्स विथ गॉड'मालिकेतल्या दुसऱ्या पुस्तकाच्या पुनर्वाचनानं मला अजून किती चालायचंय हेच लक्षात आणून दिलं.

आता त्यासाठी मी धीर गोळा करतोय. खरंतर हा सगळा मला अंजन घालणारा, जागं करणारा, प्रेरणा देणारा, उद्युक्त करणारा अनुभव वाटतोय. मी हेच अनुभवतोय.

१२वी आवृत्ती

# वन फॉर द रोड

## वपु काळे




**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

उभ्या-आडव्या महाराष्ट्रातच नव्हे तर  त्याबाहेरही मराठीचे प्रेम जेथे जोपासले जाते तेथेही, वसंत पुरुषोत्तम काळे हे नाव लोकप्रिय आहे. त्या नावाशी एक प्रतिमा निगडित आहे. देखणी, प्रसन्न, उत्साहवर्धक, ती कथा-कथनकाराची. पण ती प्रतिमा म्हणजे त्यांच्या कथेचेच प्रतिबिंब आहे, इतकी ती कथा आणि  तिचे लेखक आणि ती कथन करणारे कलावंत एकरुप झालेले आहेत. कथा पुण्या-मुंबईच्या मध्यमवर्गी  (आणि मध्यममार्गी) मराठी माणसाची.  तिला ग्रामीण मेकअपचा सोस नाही, की अत्याधुनिकतेच्या होषात अंतर्मनात सूर मारून व्यथांचे पापुद्रे हाताळण्याचा (किंवा व्यथात सूर मारून अंतर्मनाचे पापुद्रे चिवडण्याचा).

पण तिला आपला खास, अकृत्रिम ढंग आहे. ती साध्याही विषयात आशय शोधते, आणि तो विनोदाच्या अंगाने सजवते. तिला व्यथा वर्ज्य नाही, पण तिचे फार कौतुककी नाही. ती ‘नॉर्मल’ माणसाची नॉर्मल कथा आहे. ती त्याला खुलवते, हसवते. सांसारिक आपदांचा विसर पाडते.  म्हणून ती त्याला एवढी प्रिय. वसंत पुरुषेत्तम काळ्यांचा हा चोविसावा संग्रह.

**- मं. वि. राजाध्यक्ष**

हा खेळ संपायला अजून वेळ आहे आणि हा खेळ ज्यांना आवडतो, त्यांच्यासाठी ही कायमच छान बातमी आहे.

काही जणांना माझं आयुष्याला 'खेळ' मानणं योग्य वाटणार नाही. पण माझा हा नेहमीचा अनुभव आहे. देवांनीच हा खेळ खेळायला मला आवतण दिलंय आणि हा खेळ नेमका काय आहे? हा स्व-निर्मितीचा अंत नसलेला खेळ आहे- अनंत खेळ आहे.

हा खेळ आत्मज्ञानाहून वेगळा आहे. आत्मज्ञानात आपण स्वतः खरंच कोण आहोत, याचा शोध घेत त्याचा अनुभव घेण्यसाठी धडपड केली जाते. ही आपण खरंच कोण आहोत हे ठरवण्याची आणि अनुभवण्याची प्रक्रिया आहे. फक्त देवच हे करू शकतो. यातला पहिला भाग विद्यार्थी करू शकतो; पण दुसरा भाग मात्र फक्त त्यातील तज्ज्ञ करू शकतो. यातला विरोधाभास हा आहे की, जेव्हा दुसरी गोष्ट होते, तेव्हा पहिली आपोआपच त्याबरोबर होऊन जाते.

मला तरी हा खेळच वाटतो. मी खेळ म्हणूनच याच्याकडे बघतो – अगदी मुद्दाम खेळला तरी. मी काय म्हणतोय, हे तुम्हाला ठाऊक असेल तर, अगदी मनापासून- अटीतटीनं खेळणारी मुलं तुम्ही कधी बघितली आहेत का? ती त्यात अगदी गुंगून गेलेली असतात. थोडा वेळ त्यांचं निरीक्षण करा. ती हे किंवा ते अगदी खरं असल्याचं मानतात. ती सगळ्या गोष्टी खऱ्याच असल्यासारखं खेळतात का? त्यांच्या 'अभिनया'बद्दल खरं असल्याचं भासवण्याबाबत ते एवढे प्रामाणिक का असतात? कारण, तो भासचा खरा असल्याचं ते सोंग करत असतात! आणि कशासाठी, तर त्यांना ते सत्य अनुभवता यावं म्हणून!

आपणही सगळे असंच करतोय. आपण प्रौढ आहोत, वयानं मोठे आहोत, त्यामुळे आता खेळ थांबवायला हवेत, असं आपल्याला वाटतं. खरंतर याच्या उलट 'खरं'आहे. आपण मोठे असल्यानं आपल्याला खरीखुरी मोठी खेळणी दिली गेलीत. तेव्हा सुरू करू या खेळ!

लहानपण हे आपलं प्रशिक्षण असतं. कसं खेळायचं हे आपण शिकतो. लहानपणी हे आपण इतकं छान शिकतो की आत्ता तसंच

करतो आणि ते आपल्याला कळतही नाही. हेच खरं आहे, असं आपण समजतो.

असो. आपल्यापैकी बरेच जण असं करतात. पण ज्यांना ही जाणीव आहे, असे फार थोडे जण असं करत नाहीत. 'हे सत्य नाही, आपण खेळतोय' हे ज्यांना समजतं, त्यांच्यासाठी आयुष्य सहज सोपं होऊन जातं. आयुष्याला हलकंफुलकं करण्याचा मार्ग त्यांना सापडतो. अवघड- सर्वांत कठीण प्रसंगातही तसं राहण्याची विलक्षण क्षमता त्यांच्यात असते. इतरांनाही तशी प्रेरणा देण्याची त्यांची पात्रता असते. स्वयंप्रकाशी होण्याचा वस्तुपाठच ते घालून देतात. दुसऱ्या पुस्तकातला प्रारंभीचा भाग माझ्यासाठी 'डोझी' होता. या सात प्रकरणांनी जागं केलं पुन्हा. कदाचित माझ्याकडून ते पहिल्यांदा उतरवले गेले, तेव्हापेक्षा जास्त!

आजही सगळं काही देवावर सोपवण्याचा मला मोह होतो, हे मी आधीच सूचित केलं आहे. आयुष्याबद्दलचे माझे विचार, कल्पना आणि माझ्या आयुष्यात अचानक उद्‌भवलेल्या अत्यंत कठीण अन् आव्हानत्मक परिस्थितीला तोंड देताना त्यांचा कसा उपयोग झाला, हेही मी नमूद केलं आहे. या पुस्तकाचा पहिला भाग पुन्हा वाचताना हे सगळं मला जाणवलं. म्हणून माझ्याकडून मी थोडासा खचलो, नाराज झालो, हे मला कबूल करायला हवं.

नंतर माझी प्रेयसी व्हिडीओ स्टोअरमधून एक सिनेमा घेऊन आली आणि तो 'आपण दोघांनी एकत्र बसून बघू' असं म्हणाली. तिची खरंच तशी इच्छा होती असं तिनं सांगितलं. तिनं तो आधी बघितलेला होता आणि आता तिला तो पुन्हा माझ्याबरोबर बघायचा होता. तो सिनेमा आध्यात्मिक गुरू रामदास यांच्यावर होता.

१९९०च्या शेवटी शेवटी रामदास यांना अर्धांगवायूचा झटका आला होता, हे कदाचित तुम्हाला माहीत असेल. या सिनेमात (फीअर्स ग्रेस हा अत्यंत सुंदर असा माहितीपट- जो मी प्रत्येकाला पाहायला सुचवत होतो.) हा अत्यंत दयाळू सद्‌गृहस्थ उघडपणे ही गोष्ट मान्य करतो आणि त्यामुळे श्रद्धेच्या वादाच्या भोवऱ्यात सापडतो.

आयुष्यातला कलाटणी देणाऱ्या या अनुभवातून गेल्यानंतर त्याला

आपण आपल्या शिकवणुकीपासून, जगाला देवाबद्दल आपण सांगितलेल्या गोष्टींपासून आणि दैनंदिन जीवनात आत्म्याच्या अचूक अनंत प्रवासाबद्दल सांगितलेल्या तत्त्वांपासून  एक पाऊल मागे आल्याचं जाणवलं. आता इथं तो चाकाच्या खुर्चीवर खिळलेला, शरीराच्या अर्ध्या भागावर नियंत्रण नसलेला, नीट स्पष्ट शब्द उच्चारू न शकणारा- जीभ आतल्या आत घोळून बोबडी वळणारा असा माणूस झाला होता.

या सिनेमात रामदासांचा दमनापासून नकारापर्यंत क्षमायाचनेपर्यंत, प्रतिकारापासून प्रगतीपर्यंतचा प्रवास आहे. त्यांच्या आधीच्या आध्यात्मिक जीवनापासून, आधीच्या गृहितांपासून, शिकवणुकीपासून ते कसे पुढे गेले हे त्यात आहे. त्यांच्या जाणिवा विस्तारल्या. त्यांनी आशेचा किरण दाखवला की आपल्या आयुष्यात काहीही होवो, उत्तर आयुष्यात गलितगात्र झालो, अगदी सगळ्या नाही, पण अनेकांच्याबाबतीत तरी आपली आध्यात्मिक मुळं घट्ट पकडून ठेवायची आणि उदात्तपणे चांगल्या गतीसाठी उन्नत होण्यासाठी त्यातून ऊर्जा घ्यायची.

'कॉन्व्हर्सेशन विथ गॉड'चा ही अर्थात हाच संदेश आहे, सिनेमातला एका मेसेंजर दुसऱ्याला सांगतो, तसाच मीसुद्धा एक दूत म्हणून यातून तुमच्याशी बोलतोय- तुम्हीही दूत आहात असे समजू. आपण सगळेच असे संदेशवाहक असल्याने मानव जातीच्या उन्नयनाच्या, उत्क्रांतीच्या प्रक्रियेत आपल्या उत्तमोत्तम कल्पना या बदलत्या जगाच्या अंतापर्यंत एकमेकांपर्यंत पोहोचवत राहू.

आणि ही अतिशय चित्तथरारक, सूक्ष्म आणि अनंत प्रक्रिया रोजच सुरू असते- एका वेळी एक अनुभव- एक निरोप्या. (होय- माझे प्रिय रामदास?  बरोबर?)

या पुस्तकाबद्दल पश्चात विचार केल्यावर एक गोष्ट माझ्या लक्षात आली ती ही की- तिसऱ्या अध्यायात देवाचं एक विधान आहे- तू परिपूर्ण, एकदम बरोबर आहेस- तू जसा आहेस तसा तू योग्य आहेस- हे वाचून मला फार अवघडल्यासारखं वाटलं. काही सुचेना.

या आधी मी शंभरदा ते वाचलं होतं. पण तरीही ते पचनी पडायला त्रास होत होता. त्यासाठी मला अनेक गोष्टी सोडून द्याव्या लागणार होत्या आणि ते माझ्यासाठी वाटतं तितकं सोपं नव्हतं.

**४थी आवृत्ती**

# उखडलेली झाडे

## आनंद यादव




**किंमत : १९५/-रु. । पोस्टेज :३०/-रु.**

'उखडलेली झाडे' या संग्रहात आनंद यादवांची कथा विकासाच्या एका विशिष्ट टप्प्यावर भेटते.

ग्रामीण भागातील वर्तमान वास्तवाचे, समाजमनाचे, शहर व खेडे यांच्या अनेकविध संबंधांचे यादवांचे भान इथे प्रखर आणि मर्मभेदी झालेले जाणवते. ग्रामीण भागात सुधारणांच्या हेतूने आलेले शिक्षण, उद्योगीकरण, विकास योजना, पाणी योजना, पंचायत परिषदा, ग्रामविकास, शेतीविकास इत्यादींचा ग्रामीण जीवनावर प्रत्यक्षात कसा विपरीत आणि विकृत परिणाम होत चालला आहे आणि त्यात सगळा अधस्तरीय ग्रामीण समाजच कसा पिळून, भरडून निघत आहे, कायमचा उखडला जात आहे, याचे अस्वस्थ करणारे अतिशय कलात्म दर्शन ते घडवीत आहेत.

याचबरोबर एकूण मराठी समाजातील जाती-वर्गांचे परस्पर संबंध, शहर आणि खेडे, बुद्धिजीवी मध्यमवर्ग यांचे सांस्कृतिक नातेही ते शोधू पाहत आहेत.

त्यांचा हा संग्रह म्हणजे 'वर्तमान मराठी खेड्यावरचे' आणि त्या संदर्भात एकूणच मराठी समाजावरचे प्रातिनिधिक भाष्य वाटावा, अशा योग्यतेचा आहे.

**डॉ. दत्तात्रय पुंडे**

आयुष्यात अनेक गोष्टींत मी अडकलेला होतो- मी परिपूर्ण नाही, माझ्यात काही उणिवा आहेत- हा विचार ही त्यातली एक गोष्ट.

माझ्याच अनेक गोष्टी मला आवडत नाहीत, असं मला रोज दिसतं. माझ्यासाठी त्या चांगल्या नाहीत, असंही वाटतं. तरीही मी त्या तशाच वाटू देतो. त्या चांगल्याच आहेत, असं मी वाटवून घेतो- नाहीतर मला त्यांच्याबरोबर राहणं शक्यच होणार नाही. असं वाईट वाटून घेणं मला इतकं चांगलं का वाटतंय, असा आव्हानात्मक प्रश्न मी मलाच विचारतो.

त्यानं माझ्या स्वत:बद्दलच्याच आधीच्या कल्पना पूर्ण होतात. माझ्याबद्दलची सत्य परिस्थिती, माझं वास्तव- ज्याच्याबद्दल इतरांनी आधीच सांगितलं होतं- तेच अधोरेखित होतं. माझ्या धर्मानं मला सांगितलं. माझ्या पालकांनी सांगितलं. माझ्या कुटुंबानं आणि मित्रांनी मला सांगितलं. अगदी अशांनीसुद्धा सांगितलं ज्यांनी माझ्यावर खूप प्रेम केलं; ज्यांनी माझी  शय्यासोबत केली होती. प्रत्येकानंच माझ्या चुका, उणिवा, समस्या, प्रश्न माझ्यातल्या वाईट गोष्टी मला सांगितल्या. मग मी इतर गोष्टींवर विश्वास कसा ठेवणार? माझ्याबद्दलच्या चार चांगल्या गोष्टी (ज्या मी इतरांकडून फार कमीच ऐकल्या) खऱ्या आहेत, असं कसं मानणार?

आणि इथं हा देव स्वतः येऊन मला सांगतोय की मी अगदी परिपूर्ण आहे, असं त्याला वाटतंय... मी अगदी जसा आहे तस्सा- परिपूर्ण आहे...

ओह! मी स्वतःशीच म्हटलं असणार - देवबिव येऊन असं काही म्हणणार नाही. हा स्वतःचाच अहंकार देवाचं सोंग घेऊन आला असणार. हो नक्कीच तसं असणार. हे सगळे माझ्या मनाचेच खेळ आहेत. जगाचं मला नाकारणं न स्वीकारणारं माझं मन... लुडबुडणारं मन. आत्ता मी जसा आहे, तसा अगदी योग्यच आहे असं चित्र रंगवून माझा वाईटपणा- सत्यापासून माझं रक्षण करणारं मन.

काय मूर्खपणा आहे! केवढा गर्व! अहंकार! घमेंड! कुठला देव मला असं सांगणार आहे?

असं सगळं सुरू असतानाच आतून एक अत्यंत गोड, कोमल,

मृदू मुलायम स्वर मला ऐकू आला. अशानं तू मला त्रिवार नाकारतोयस- मग मोठा पॉज- जर तसं नाही केलंस तर...?

हे माझ्या पुढचं आव्हान आहे, - कोणावर विश्वास ठेवावा? देवावर की माणसावर?

पण मी हे पुस्तक पुन्हा वाचल्यावर या प्रश्नावर रेंगाळायला उसंतच मिळाली नाही. हा संवाद खूपच वेगवान आहे आणि तो तसाच चालू ठेवायला तोच मला बळ देतोय. हिटलर, तो स्वर्गात कसा आणि का गेला याबद्दल मला आश्चर्यचकित करणारे संदेश हे 'कॉन्व्हर्सेशन विथ गॉड' पुस्तक पुन्हा वाचता पुन्हा मिळत गेले.

आणि पुन्हा एकदा माझ्या अस्तित्वाचं आव्हान माझ्यासमोर आहे. हे खरं कसं होणार? आणि जर ते खरं नसेल, तर मग आपल्याला कुठल्या आशेचा आधार आहे? मग आपण इथं कशाबद्दल बोलतोय... श्रेणीबद्दल? आणि देवाच्या प्रेमाची नेमकी श्रेणी, जात प्रमाण तरी काय आहे? आणि मग काय, नंतर काय होतं?

पुस्तक – २ या असामान्य संवाद पुस्तकात पुन्हा एकदा रंगून गेल्यावर हे सगळे प्रश्न पुन्हा एकदा फेर धरू लागले. तुम्हाला सांगतो- हे सोपं नव्हतं.

आणि पुन्हा हे वाचताना मी भावनांच्या भोवऱ्यात फिरत असताना, मी ५व्या प्रकरणाच्या शेवटाला पोहोचलो.

आयुष्याची न उलगडलेली कोडी सोडवण्यात, रहस्य उलगडण्यात आजच्या वर्तमानातले मौलिक क्षण उगाच वाया घालवू नका.

मस्त! किती छान आहे नाही हे?

तेव्हा- चला, पुढे चला- आता पहिले सात भाग वाचा. ते तुम्ही आधी वाचले असतील, तर परत वाचा. तुम्हाला आधी मिळालं नसेल, असं खूप काही आता तुमच्या हाती लागेल, असं मी खात्रीनं सांगतो किंवा दुसऱ्यादांही किंवा अगदी तिसऱ्यादांही.

तुम्ही ही संहिता किती वेळा वाचता याला माझ्या लेखी महत्त्व नाहीये. प्रत्येक वेळी काहीतरी नवीन तुमच्या पदरात पडणार आहेच!

माझी खात्री आहे, मी तसं वचनच देतो!

❖




# सूचीकार शरद साठे...

गेले सुमारे पाव शतक मराठी ग्रंथसूचीचे काम अत्यंत नेटाने व निष्ठेने करत असलेल्या शरद साठे यांचे १ ऑक्टोबर २०१५ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठी सूचीकार्यक्षेत्राची फार मोठी हानी झाली आहे यात शंकाच नाही. १८०० ते १९५० या दीडशे वर्षांत प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांची सूची दोन खंडात प्रकाशित केली होती. त्या खंडित कामाची पालखी पुढे नेण्याचा संकल्प १९९० च्या दशकात शरद साठे यांनी केला. त्याला कोणी प्रकाशक मिळेल किंवा नाही याची फारशी क्षिती न बाळगता त्यांनी आपल्या परीने कामाला सुरुवात केली. सुदैवाने राज्य मराठी विकास संस्थेच्या पहिल्या संचालक डॉ. सरोजिनी वैद्य यांनी त्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे ठरवले आणि आतापर्यंत १९५१ ते ६२, १९६३ ते ७०, १९७१ ते ७८ आणि १९७९ ते ८५ असे मराठी ग्रंथसूचीचे साठे यांनी संपादित केलेले चार खंड राज्य मराठी विकास संस्थेमार्फत प्रकाशित झाले आहेत. १९८६ ते ९३ या काळात प्रकाशित झालेल्या मराठी ग्रंथांच्या सूचीचा खंडही बराच सिद्ध झालेला आहे.

साठे बँकेत चांगल्या पदावर आणि पगारावर नोकरीवर होते. ती नोकरी चालू असतानाच त्यांनी 'अमृतानुभवाचा पद संदर्भ कोश' (प्रकाशक - मराठी संशोधन मंडळ व मुंबई विद्यापीठ) 'ज्ञानेश्वरीची ओवी सूची' (मुंबई विद्यापीठ प्रकाशित ज्ञानदेवीच्या तिसऱ्या खंडात समाविष्ट) या प्रकाशित सूच्या आणि मर्ढेकरांची कविता, निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई व ज्ञानेश्वर यांच्या अभंग गाथा, चांगदेवांची अभंगगाथा व चांगदेव पासष्टी या ग्रंथांच्या शब्द व चरण सूच्या

(अप्रकाशित) केल्या होत्या. या प्रत्येक अप्रकाशित सूचीची एकेक झेरॉक्स प्रत अभ्यासकांसाठी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयात त्यांनी ठेवलेली आहे. सूचीचे काम हा त्यांचा श्वास होता.

ग्रंथसूचीचे अत्यंत अवघड व किचकट काम अंगावर घेतल्यानंतर त्यांनी बँकेतील सुस्थिर नोकरीतून स्वेच्छानिवृत्ती घेऊन स्वत:ला ग्रंथसूचीच्या कार्यात झोकून दिले. शं. गो. दाते यांनी प्रत्येक नोंदीसाठी सूचीत दिलेले (पुस्तकाचा आकार सोडून) सर्व तपशील त्यांनी दिलेच; शिवाय प्रत्येक नोंदीला स्वतंत्र अनुक्रमांक दिला. त्यामुळे मागील निर्देश सूची नोंदींचा नेमका क्रमांक मिळतो. यामुळे संदर्भ सुलभता वाढली आहे. या शिवाय त्यांनी प्रकाशक, प्रकाशनस्थळ, अनुवादित ग्रंथ, टोपण नाव इत्यादी अनेक प्रकारच्या निर्देशसूच्या देऊन ग्रंथसूचीचे संदर्भमूल्य वाढवले आहे.

साठे सामान्यत: प्रसिद्धी व गाजावाजा यापासून दर राहिले. इतके की, त्यांच्या निधनाची बातमी वृत्तपत्रांना कळवूनही तिला प्रसिद्धी मिळू शकली नाही असे ऐकले. साठे डोंबिवलीला काम करत होते, डोंबिवलीला म.सा.प.ची शाखा आहे. तरीही डिसेंबर मध्ये तयार झालेल्या महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या अंकात संपादकांनी ज्यांना श्रद्धांजली वाहिली आहे त्यात शरद साठे यांचा समावेश नाही. आपल्या साहित्य विश्वाला सूचीकार्याबद्दल कितपत आस्था आहे हेच या उपेक्षेवरून दिसते असे म्हणता येईल का?

असो, राज्य मराठी विकास संस्थेला साठ्यांच्या सारखाच तळमळीचा सूचीकार मिळो आणि मराठी ग्रंथसूचीचे काम अखंड चालू राहो. असे झाले तर शरद साठे यांना मराठी साहित्य जगाने खरी श्रद्धांजली वाहिली असे होईल.

**शरद गोगटे**
९८६०८८०४०३
sharad_gogate@hotmail.com

### ✻ निदा फाजली यांचे निधन

‘होशवालों को खबर क्या, बेखुदी क्या चीज है...’, ‘आ भी जा, आ भी जा, ऐ सुबह आ भी जा...’ अशा लोकप्रिय गझलांचे शायर निदा फाजली (वय ७८) यांचे मुंबईत हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. अंधेरीत

सात बंगला येथे ते राहत होते.

या वेळी गझल गायक तलत अजीज, कुलदीप सिंग, लेखक अतुल तिवारी यांच्यासह काही लेखक व उर्दू व हिंदीतील कवी, गीतकार, उपस्थित होते.

### ✳ लेखक दिपा महानवर यांचे निधन

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित झालेल्या 'विमुक्ती' पुस्तकाचे लेखक दिपा महानवर हे निवृत्त प्राचार्य होते. २ ऑगस्ट १९४० रोजी लगडवाडी, सातारा या डोंगराळ खेड्यात एका गरीब निरक्षर कुटुंबात त्यांचा जन्म झाला. अत्यंत खडतर परिस्थितीतून त्यांनी एमएससी पर्यंतच्या शिक्षणाचा पल्ला गाठला. २२ वर्षे प्राध्यापक आणि १४ वर्षे प्राचार्यपदाची जबाबदारी त्यांनी सांभाळली.

महानवर हे सामाजिक कार्यातही नेहमी पुढेच राहिले.

अतिशय लहान गावात रस्ता, शाळा, वीज, एसटी सुविधा, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती मंडळ इ. विविध समाजोपयोगी कामांमध्ये त्यांचा महत्त्वाचा पुढाकार राहिला आहे.

निरनिराळ्या सहकारी संस्था, प्राध्यापक संघटना यांचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. 'पुक्टो' 'एम्फक्टो' 'आयफॅक्टो' अशा प्राध्यापक संघटनांचे सदस्य, सरचिटणीस, अध्यक्ष म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला होता. विविध वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके यात त्यांचे लेखन प्रकाशित झाले होते. 'पुक्टो बुलेटिन' मुखपत्राचे ते संस्थापक, संपादक म्हणून काम केले होते.

अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक प्रतिष्ठान, कराड यांच्यातर्फे साहित्यरत्न पुरस्कार (२०१०), आठवे ग्रामीण साहित्य संमेलन, अहमदनगर– 'शब्दगंध साहित्य पुरस्कार'(२०१०), सोमेश्वर वाचनालय व साखर कारखाना यांच्या विद्यमाने आयोजित साहित्य संमेलनात साहित्य साधना पुरस्कार (२०१०), संगमनेर इतिहास संशोधन मंडळातर्फे देण्यात येणारा कवी अनंत फंदी राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार (२०१०) अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना कार्य गौरविण्यात आले होते.

❖




## पैज जिंकली छोट्याने आणि इतर कथा

# उंटावरचा शहाणा

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट. कीर्तिचंद्र नावाचा राजा होता. तो शूरवीर होता. दयाळू आणि उदार होता. त्याशिवाय तो विद्याप्रेमी होता. राज्यातील हुषार विद्यार्थी आणि विद्वान माणसे, यांचा तो आदर करीत असे. सन्मान करीत असे. त्यामुळे आसपासचे सगळे राजे कीर्तिचंद्राला खूप मान द्यायचे. त्याची स्तुती करायचे.

पण राजा प्रमत्तसेनाला मात्र कीर्तिचंद्राचा मत्सर वाटायचा.

इतकंच काय, त्याचा कधीतरी अपमान केला पाहिजे असंही प्रमत्तसेनाला वाटायचं. पण कीर्तिचंद्राला कुठं नाव ठेवायला जागाच नव्हती. त्यामुळे प्रमत्तसेन नुसता चडफडत असे. तो खूप उद्धट आणि गर्विष्ठ होता. त्यामुळे त्याला त्याच्या प्रधानाची किंवा सरदारांचीही साथ मिळायची नाही. फक्त एकच माणूस- सरदार दुर्जनसिंग- हा प्रमत्तसेनाच्या बाजूला होता.

प्रमत्तसेनाने बराच विचार केला आणि एक युक्ती शोधून काढली. त्यानं दुर्जनसिंगाला खास दूत म्हणून कीर्तिचंद्राकडे पाठवलं. त्याच्यासोबत एक खलिता दिला. त्यात लिहिलं होतं- 'आपण मोठे विद्याप्रेमी आहात. तर आमच्या एका प्रश्नाचं उत्तर द्यावं. प्रश्न असा- उंटाला कुबड का असतं? प्रश्नाचं उत्तर द्यावं किंवा हार कबूल करावी.'

हा खलिता पाठवला आणि प्रमत्तसेनाला अगदी खूप खूप बरं वाटलं. तो मनाशी म्हणाला, 'आपल्या या प्रश्नाचं उत्तर मुळी कुणालाच देता यायचं नाही. अन् कीर्तिचंद्राला मुकाट्यानं हार कबूल करावी लागेल! मग काय, कीर्तिचंद्राची नुसती फटफजिती उडून जाईल. सगळ्या राजेरजवाड्यांना ही हकीकत कळेल. मग कुणीही कीर्तिचंद्राला मान देणार नाही. त्याची भली खोड मोडेल. अगदी गर्वाचं घर खाली होईल!' प्रमत्तसेन आता स्वत:वर अगदी खुश होऊन गेला.

इकडे दुर्जनसिंग कीर्तिचंद्राच्या दरबारात पोचला. त्यानं आपला खलिता सादर केला. अमात्यानं तो वाचून दाखवला. ऐकता ऐकता राजा, प्रधान, सरदार- सगळेजण गोंधळून गेले. काय विचित्र प्रश्न हा! म्हणे, उंटाला कुबड का असतं? म्हणजे काय? हत्तीला सोंड असते. सिंहाला आयाळ असते. तसंच उंटाला कुबड असतं! देवानंच दिलेलं. पण- पण का असतं? कीर्तिचंद्र मनातून गडबडून गेला. पण तरीही शांतपणानं दुर्जनसिंगाला म्हणाला-

''आम्ही या कूटप्रश्नाचं उत्तर अवश्य देऊ, पण आपण आल्यासारखं चार दिवस थांबावं. आपला पाहुणचार करण्यात आम्हाला आनंद वाटेल.''

दुर्जनसिंगाला चार दिवस ठेवून घ्यायचं. त्या दरम्यान कुणाला तरी या प्रश्नाचं उत्तर नक्की सापडेल असं कीर्तिचंद्राला वाटलं. मग त्यानं नगरीतल्या विद्वानांना बोलावून घेतलं. सगळी हकीकत सांगितली. विचारलं- उंटाला कुबड का असतं? या प्रश्नावर सगळे विद्वान गप्प! नुसते एकमेकांच्या तोंडाकडे बघत राहिले. कीर्तिचंद्र म्हणाला, ''आपल्या राज्याच्या इभ्रतीचा प्रश्न आहे हा. तुम्ही सगळे विद्वान आहात. या प्रश्नाचं उत्तर शोधा.''

मग सारेजण त्याच कामाला लागले. जुन्या पोथ्या, बाडं, भूर्जपत्रं धुंडाळू लागले. रात्रभर जागून ग्रंथ वाचू लागले. पण व्यर्थ. उंटाला कुबड का असतं या प्रश्नाचं उत्तर कुणालाच येईना. शेवटी राजा कीर्तिचंद्र गुरुदेवांना भेटायला गेला. हे गुरुदेव लांब गावाबाहेर

एका लहानशा आश्रमात रहायचे. दिवसभर ते मुलांना शिकवायचे. पहाटे उठून वेगवेगळे ग्रंथ वाचायचे. गुरुदेव नक्कीच आपल्याला मदत करतील असं कीर्तिचंद्राला वाटलं.



तो म्हणाला, ''सांगा गुरुदेव, उंटाला कुबड का असतं? या प्रश्नाच्या उत्तरासाठी आम्ही फार चिंतेत पडलो आहोत.''

तेवढ्यात राजासाठी फळं घेऊन गुरुदेवांचा एक शिष्य तिथं आला. तो उत्साहानं म्हणाला- ''गुरुदेव, गुरुदेव, मी सांगू याचं उत्तर? अगदी सोपं आहे.''

त्या पोराचं बोलणं ऐकून कीर्तिचंद्र चकितच झाला. हा-हा एवढासा पोरगा. याला या कूटप्रश्नाचं उत्तर येतंय? त्याचा विश्वासच बसेना. त्या छोट्या मुलानं आपलं उत्तर भूर्जपत्रावर लिहिलं आणि ते आपल्या गुरुदेवांना दाखवलं. गुरुदेव कौतुकानं हसले. म्हणाले, ''राजन, उद्या दरबारातच याचं उत्तर मिळेल. मी याला घेऊनच येतो.''

त्याप्रमाणे दुसरे दिवशी दरबार भरला. त्यासाठी सर्व नागरिकांनाही बोलावलं होतं. सगळ्यांना उत्सुकता लागली. काय असेल त्या कूटप्रश्नाचं उत्तर? दुर्जनसिंग तर फारच चकित झाला होता. गुरुदेव उच्चासनावर बसले होते. जवळच दुसऱ्या एका लहानशा आसनावर तो लहानसा शिष्य बसला होता. सारे लोक त्या लहान मुलाकडे बघत होते. कोण हा मुलगा? याचं इथं काय काम? योग्य वेळी गुरुदेवांनी बोलायला सुरुवात केली.

''उंटाला कुबड का असतं या प्रश्नाचं उत्तर फारच सोपं आहे. त्यामुळे आमच्या आश्रमातला सर्वांत लहान छात्र त्याचं उत्तर देईल. आनंद, ये बाळा. सांग तुझं उत्तर.''

जेमतेम बारा वर्षांचा आनंद आपल्या लहानशा आसनावरून उतरला. सर्वांना नमस्कार करून धीटपणानं म्हणाला, ''फारच सोप्पंय. उंटाला कुबड असतं कारण त्याची पाठ सरळ नसते.'' एवढं बोलून आणि हात जोडून तो अदबीनं उभा राहिला. त्याचं उत्तर ऐकून सारा दरबार चकित झाला.

''शाबास आनंद! वाहवा!'' असे कौतुकाचे उद्‌गार उमटले. सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आनंदने पुन्हा एकदा सर्वांना नमस्कार केला. गुरुदेवांना आणि महाराजांना खाली वाकून वंदन केलं.

मग गुरुदेव दुर्जनसिंगाला म्हणाले,

''मिळालं ना तुमचं उत्तर? आता आमचा प्रश्न ऐका. एवढ्या सोप्या प्रश्नाच्या उत्तरासाठी तुमच्या महाराजांना राजदूत पाठवावा लागला. त्यांनी एवढे कष्ट का बरं घेतले?''

गुरुदेवांच्या या प्रश्नावर सगळेजण हसू लागले. दुर्जनसिंग काय बोलणार? खाली मान घालून गप्प बसला झालं! आला होता कीर्तिचंद्राची फजिती करायला. त्याऐवजी त्याची स्वत:ची आणि प्रमत्तसेनाचीच फटफजिती झाली. इकडे साऱ्या दरबारात उत्साह उसळला होता.

''शाबास आनंद शाबास! गुरुदेवांचा विजय असो! महाराज कीर्तिचंद्राचा विजय असो!'' अशा घोषणा दुमदुमू लागल्या. जयजयकाराच्या निनादातच दरबार बरखास्त झाला.

बालमित्रांनो, एखाद्याचा राग करून आपल्याला कधीच मोठेपणा मिळत नसतो. मोठेपणा मिळवण्यासाठी स्वत: सद्‌गुण जोपासावे लागतात.

❖